पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक -५

सभावृत्तांत

दिनांक :- २०.६.२०१२ वेळ:-दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जून-२०१२ ची मासिक मा.महापालिका सभा बुधवार दि.२०.६.२०१२ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१७. मा.जगदीश शेट्टी
१८. मा.बाबर शारदा प्रकाश
१९. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
२०. मा.सौ.मंगलताई अशोक कदम
२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२२. मा.पवार संगीता शाम
२३. मा. उबाळे सुलभा रामभाऊ
२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२६. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२८. मा.भारती फरांदे
२९. मा.आर.एस.कुमार
३०. मा.जावेद रमजान शेख
३१. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
३२. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३३. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३४. मा.नंदा विकास ताकवणे
३५. मा.नेटके सुमन राजेंद्र
३६. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३७. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३८. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३९. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
४०. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४१. मा.लोंढे गणेश नारायण
४२. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
४३. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
४४. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४५. मा.अपर्णा निलेश डोके
४६. मा.अनंत सुभाष को-हाळे
४७. मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे
४८. मा.जयश्री वसंत गावडे
४९. मा.पवार मनीषा काळूराम
५०. मा.प्रसाद शेट्टी
५१. मा.अविनाश (दादा) टेकावडे
५२. मा.काळभोर वैशाली जालिंदर
५३. मा.शेख अस्लम शैकत
५४. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५५. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५६. मा.वाबळे संजय मल्हारराव
५७. मा.मडिगेरी वर्षा विलास
५८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५९. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६०. मा.सुपे आशा रविंद्र
६१. मा.चंद्रकांत (भाऊ)साहेबराव वाळके
६२. मा.अजित दामोदर गव्हाणे
६३. मा.गोफणे अनुराधा देविदास
६४. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६५. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६६. मा.महेशदादा किसन लांडगे
६७. मा.फुगे सीमा दत्तात्रय

६८. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६९. मा.लोंढे शुभांगी संतोष
७०. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
७१. मा.सावळे सिमा रविंद्र
७२. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
७३. मा.भोसले राहूल हनुमंतराव
७४. मा.पालांडे सुजाता सुनिल
७५. मा.बहल योगेश मंगलसेन
७६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७७. मा.कदम सदगुरु महादेव
७८. मा.गिता सुशील मंचरकर
७९. मा.कैलास महादेव कदम
८०. मा.छाया जगन्नाथ साबळे
८१. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
८२. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
८३. मा.आसवाणी सविता धनराज
८४. मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
८५. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
८६. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
८७. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
८८. मा.काळे विमल रमेश
८९. मा.पाडाळे निता विलास
९०. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
९१. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
९२. मा.विमलताई सुरेश जगताप
९३. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
९४. मा.बारणे निलेश हिरामण
९५. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९६. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
९७. मा.बारणे माया संतोष
९८. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९९. मा.यमुनाताई रमणनाना पवार
१००. मा.कलाटे स्वाती मयुर
१०१. मा.चौंधे आरती सुरेश
१०२. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१०३. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
१०४. मा.बोकड रामदास गेणभाऊ
१०५. मा.जवळकर वैशाली राहुल
१०६. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१०७. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०८. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१०९. मा.जगताप नवनाथ दत्तु
११०. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१११. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
११२. मा.जम सोनाली पोपट
११३. मा.प्रशांत शितोळे
११४. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
११५. मा.काटे रोहित अप्पा सुदाम
११६. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११७. मा.शेंडगे आशा सुखदेव
११८. मा.मोटे किरण बाळासाहेब
११९. मा.संजय केशवराव काटे
१२०. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१२१. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
१२२. मा.पाटील सुजित वसंत
१२३. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१२४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-महापालिका आयुक्त,मा.प्रकाश कदम-अति. आयुक्त,मा.सावंत-सह.आयुक्त,मा.मुंढे,मा.गायकवाड,मा.गावडे,मा.दुरगूडे-सहा.आयुक्त, मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक, मा.चाकणकर -प्र.नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण-सह शहर अभियंता, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.काची-उपशहर अभियंता, मा.दुधेकर, मा.निकम, मा.पाटील, मा.जाधव, मा.कपिले, मा.साळवी, मा.पठाण-कार्य. अभियंता, मा.ओव्हाळ-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ),मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.माछरे-विशेष अधिकारी, मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरवात करणेत येत आहे.

मौजे वाकड येथील ३० मी. व १८ मी.रुंदरस्त्याकरीता जमिनीचे भूसंपादन करणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ११० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.महापौर :- नामनिर्देशित पाच सदस्यांचे व मा.आयुक्त यांचे सभागृहात स्वागत करणेत येत आहे.

(मा.महापौर यांचे हस्ते पुष्पगूच्छ देवून स्वागत करणेत आले.)

(मा.डॉ.श्रीकर परदेशी-महापालिका आयुक्त यांनी त्यांचा परिचय सभागृहास करुन देवून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत काम करण्याची शासनाने संधी दिल्याबद्यल शासनाचे मनपुर्वक आभार मानले.)

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार, हा दिव्य संदेश देणारे, गरीबांना वरदान, श्रीमंतांना आधार व संपूर्ण विश्वाला उपयुक्त धर्मातीत व शाश्वत जीवनविद्येचे तत्वज्ञान देणारे, सर्वांचे सदैव शुभ चिंतणारे, यशस्वी व सुखी जीवनाचा मूलमंत्र देणारे सद्‌गुरु -वामनराव पै, नीरा येथे पालखी मार्गात झालेल्या अपघातात मृत्यू पावलेले ९ वारकरी, खालापूर येथील एक्सप्रेस हायवेवरील अपघातात रस्टन कॉलनीतील खरात कुटूंबातील ४ मृत पावलेल्या व्यक्ती, हरिहरेश्वर येथे चिंचवडमधील यशस्विनी इन्स्टिटयूटमधील वुडून मृत्यू पावलेले ३ प्राध्यावक, माजी महसूलमंत्री-शांताराम घोलप, ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक-प्रकाश मोहाडीकर, ज्येष्ठ कवी-दत्ता हलसगीकर, जागतिक ख्यातीचे गझलसम्राट-मेहंदी हसन, नगरसेवक रामदास बोकड यांच्या मातोश्री-जनाबाई बोकड, समाजसेवक ज्ञानेश्वर सोपान गवळी, गंगूबाई फुगे, नाना गुजर यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून सोमवार दि.९/७/२०१२ रोजी दुपारी ४.०० पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

मा.आशा सुर्यवंशी :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देते.

मा.महापौर :- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.महापौर:- उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या संमतीप्रमाणे सोमवार दि. ९.०७.२०१२ रोजी दुपारी ४.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
मा.महापालिका सभा
कार्यपत्रिका क्रमांक -५
सभावृत्तांत
( दि. २०.६.२०१२ ची तहकूब सभा )

दिनांक :- ९.७.२०१२ वेळ:-दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि. २०.६.२०१२ ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि.९.७.२०१२ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.थोरात वनिता एकनाथ
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१५. मा.जगदीश शेट्टी
१६. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१७. मा.उल्हास शेट्टी
१८. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१९. मा.पवार संगीता शाम
२०. मा. उबाळे सुलभा रामभाऊ
२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२३. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२४. मा.आर.एस.कुमार
२५. मा.जावेद रमजान शेख
२६. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२७. मा.पांढरकर निलेश शंकरराव
२८. मा.नेटके सुमन राजेंद्र
२९. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३०. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३१. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३२. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३३. मा.लोंढे गणेश नारायण
३४. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३५. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
३६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३७. मा.अपर्णा निलेश डोके
३८. मा.अनंत सुभाष को-हाळे
३९. मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे
४०. मा.जयश्री वसंत गावडे
४१. मा.पवार मनीषा काळूराम
४२. मा.प्रसाद शेट्टी
४३. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४४. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४५. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४६. मा.शेख अस्लम शैकत
४७. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४८. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४९. मा.वाबळे संजय मल्हारराव
५०. मा.मडिगेरी वर्षा विलास
५१. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५२. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५३. मा.सुपे आशा रविंद्र
५४. मा.चंद्रकांत (भाऊ)साहेबराव वाळके
५५. मा.अजित दामोदर गव्हाणे
५६. मा.गोफणे अनुराधा देविदास
५७. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५८. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५९. मा.महेशदादा किसन लांडगे
६०. मा.फुगे सीमा दत्तात्रय
६१. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६२. मा.लोंढे शुभांगी संतोष
६३. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६४. मा.ननवरे जितेंद्र बाबा
६५. मा.सावळे सिमा रविंद्र
६६. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६७. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६८. मा.पालांडे सुजाता सुनिल
६९. मा.बहल योगेश मंगलसेन
७०. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७१. मा.कदम सदगुरु महादेव
७२. मा.गिता सुशील मंचरकर
७३. मा.कैलास महादेव कदम
७४. मा.छाया जगन्नाथ साबळे
७५. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
७६. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
७७. मा.आसवाणी सविता धनराज
७८. मा.वाघेरे सुनिता राजेश
७९. मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
८०. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
८१. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
८२. मा.काळे विमल रमेश
८३. मा.पाडाळे निता विलास
८४. मा.विनोद जयवंत नढे
८५. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८६. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८७. मा.विमलताई सुरेश जगताप
८८. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८९. मा.बारणे निलेश हिरामण
९०. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९१. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
९२. मा.बारणे माया संतोष
९३. मा.ओव्हाळ शेखर अशोक
९४. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९५. मा.यमुनाताई रमणनाना पवार
९६. मा.कलाटे स्वाती मयुर
९७. मा.नांदगुडे विलास एकनाथ
९८. मा.चौंधे आरती सुरेश
९९. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१००. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
१०१. मा.बोकड रामदास गेणभाऊ
१०२. मा.जवळकर वैशाली राहुल
१०३. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१०४. मा.जगताप राजेंद्र गणपत
१०५. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१०६. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०७. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०८. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०९. मा.प्रशांत शितोळे
११०. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१११. मा.काटे रोहित अप्पा सुदाम
११२. मा.गायकवाड संध्या सुरदास
११३. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११४. मा.शेंडगे आशा सुखदेव
११५. मा.मोटे किरण बाळासाहेब
११६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
११७. मा.संजय केशवराव काटे
११८. धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
११९. गावडे हनुमंत बाळासाहेब
१२०. पाटील सुजित वसंत
१२१. बो-हाडे अरुण तुकाराम
१२२. लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-महापालिका आयुक्त, मा.कदम-अति.आयुक्त, मा.सावंत-सह.आयुक्त, मा.मुंढे, मा.पवार, मा.गावडे, मा.दुरगूडे, मा.कुलकर्णी, मा. बंब-सहा. आयुक्त, मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक, मा.चाकणकर-प्र.नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण-सह शहर अभियंता, मा.डॉ.जगदाळे-प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.काची-उपशहर अभियंता, मा.दुधेकर, मा.निकम, मा.इंगळे, मा.पाटील, मा.जाधव, मा.कपिले, मा.जाधव, मा.साळवी, मा.पठाण, मा.पिरजादे, मा.कुलकर्णी-कार्य. अभियंता, मा.ओव्हाळ-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ),मा.चव्हाण- आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.शिंपी-नगररचनाकार, मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरवात करणेत येत आहे.

(अमोल गुरव, नंदकुमार धुमाळ व मंगेश जाधव यांचा विशेष कार्याबद्यल मा.महापौर,मा.उपमहापौर, मा.आयुक्त, मा.पदाधिकारी, मा.गटनेते व मा.नगरसेवक यांचे हस्ते सत्कार करणेत आला)

मा.महापालिका सभा क्र. ४ दि. १९/५/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.प्र.नगरसचिव :- प्रश्नोत्तरे- मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे, मा.वर्षाताई विलास मडिगेरी, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांनी विचारलेले प्रश्न.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रामधुन पवनानदी व इंद्रायणीनदी वाहते. यामध्ये होणारे प्रदूषण आणि त्यामध्ये टाकलेल्या भरावाच्या संदर्भात आणि बांधकामाच्या संदर्भात या सभागृहाला, प्रामुख्याने प्रशासनाला सुध्दा माहिती व्हावी त्यादृष्टिकोनातून आजच्या सभेमध्ये प्रश्न विचारलेले आहेत. पवनानदीची सुरवात या शहरात रावेत पासून होते. रावेत ते सांगवी पर्यंत पवनानदीचे जे पात्र आहे त्यात अनेक वर्षापासून प्रामुख्याने भराव टाकला जातो. त्या संदर्भात गेल्या एक-दोन वर्षात मोठयाप्रमाणात ही प्रक्रिया झाली. या सगळया गोष्टी होत असताना प्रामुख्याने महापालिकेचे अधिकारी त्यामध्ये दुर्लक्ष करत होते आणि दुर्लक्ष केल्यानंतरच नदीपात्रामध्ये मोठयाप्रमाणात भराव टाकला गेला त्यामुळे नदीचे पात्र अरुंद झाले आणि त्याठिकाणी मोठमोठया इमारती बांधल्या गेल्या. यात १०० टक्के प्रशासनाचे दुर्लक्ष झाले. रावेत ते सांगवी पर्यंत पवना नदीचे पात्र किती किलोमीटर आहे, नदीपात्राच्या क्षेत्राची मोजणी केली आहे का नदी पात्रामध्ये अतिक्रमण झाले आहे का असल्यास संबंधित नावाची यादी द्यावी असा मी प्रश्न विचारलेला होता. प्रामुख्याने उत्तर देत असताना मला सांगीतले गेले की नदीपात्राची मोजणी व नदीपात्रातील अतिक्रमणे या बाबी महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत येतात. प्रामुख्याने नदीपात्र येथे रुंद असल्यामुळे ही महापालिकेची जबाबदारी आहे. आज नैसर्गिक समतोल साधत असताना नदी अरुंद होऊ नये, त्याठिकाणी राडारोडा टाकून दुषित पाणी सोडू नये ही जबाबदारी महापालिकेची आहे ती टाळता येणार नाही. परंतु या संपुर्ण उत्तरामध्ये प्रशासनाने आपली जबाबदारी टाळून ती जबाबदारी राज्यशासनावर टाकलेली आहे. राज्यशासनाच्या पाटबंधारे खात्याचे अधिकारी सुर्वे हे मध्यंतरी दादा व विभागीय आयुक्त यांच्या बैठकीला होते त्यावेळेस त्यांनी सांगीतले की नदीपात्रातील संपुर्ण जबाबदारी महापालिकेची आहे. प्रश्न विचारल्यानंतर महापालिकेचे अधिकारी आपली जबाबदारी झटकून टाकतात. आयुक्त साहेबांनी या महापालिकेत नव्याने चार्ज घेतलेला आहे नंतर पुढे या गोष्टी समजतील. परंतु ब-याचशा प्रमाणात नदीपात्र बुजविण्यामध्ये नागरीक जेवढे जबाबदार आहेत तेवढेच महापलिकेचे अधिकारी सुध्दा जबाबदार आहेत. कारण गेल्या अनेक वर्षामध्ये नदीपात्रात भराव टाकणा-या ११ नागरिकांवर यापुर्वी उपद्रव शोध पथकामार्फत कारवाई करुन र.रु. ८५ हजार दंड वसुल केलेला आहे असे उत्तर दिलेले आहे. रावेत ते सांगवीपर्यंत पवना नदीची लांबी २४.३० कि.मी. आहे. या नदीपात्रामध्ये भराव टाकत असताना प्रामुख्याने हे एक ते दोन कि.मी. केलेले नाहीतर माझ्या माहितीप्रमाणे २४.३० कि.मी.मध्ये १० ते १५ कि.मी. चे पात्र हे अरुंद केलेले आहे. आणि हे ११ व्यक्तिने अरुंद केले का ही गोष्ट गांभीर्याने घेतली पाहिजे. आज पवनानदीची परिस्थिती दयनीय आहे याला आपणच जबाबदार आहोत. ही जबाबदारी झटकून टाकता कामा नये. नदीच्या पात्रामध्ये ब्ल्यूलाईन आणि रेड लाईन आखन्यात आली आहे. मी विचारले मनपा नदीपात्रामध्ये तसेच पुरनियंत्रण रेषेमध्ये अनाधिकृत बांधकामे किती झाली आहे त्यावेळेला अधिका-यांनी बांधकामाची माहिती दिली. मी करसंकलन विभागाला याची माहिती विचारली त्यानी माहिती दिली अनाधिकृत बांधकाम हे आता एकत्रितपणे सांगता येणार नाहीत परंतु अधिकृत १२२ बांधकामे आहेत असे सांगीतले. १८/७/२०११ मध्ये महापालिकेकडून माहिती मागीतली होती त्यात प्रामुख्याने मला माहिती दिली ते मी सांगतो. पुरनियंत्रण रेषेमध्ये चालू असलेल्या बांधकामाची माहिती मला मिळाली, प्रामुख्याने जवळपास ६३० ठिकाणी महापालिकेच्या आरक्षीत

जागेवर अनाधिकृत बांधकामाची माहिती देत असताना २४ हजार बांधकाम नदीपात्रामध्ये झालेले आहे अशी माहिती प्रशासनाने दिलेली आहे व ती माझ्याकडे आहे ती नंतर देतो. आता मी करसंकलन विभागास माहिती विचारली २००८ नंतर ४० हजार बांधकाम अनाधिकृतपणे झालेले आहेत अशी माहिती मिळाली आहे. ही माहिती विचारण्यामागे एकच हेतू आहे की या महापालिकेचे अधिकारी जागे राहिले पाहिजेत. आपण चार्ज घेतल्यानंतर आपण कार्यवाही चालू केली त्यामध्ये सर्वसामान्य नागरीक भरडला जातो असे निदर्शनास येते. महापालिकेच्या नदीपात्राचा आपण प्रत्यक्षदर्शनी सर्व्हे केलातर त्यानंतर आपल्या लक्षात येईल ब-याचशा मोठयाप्रमाणावर नदीपात्रा लगत बांधकाम झालेले आहे व ते काम करत असताना राजकीय पाठबळ सुध्दा मिळालेले आहे. या सगळया गोष्टी संगनमताने झालेल्या आहेत व यामध्ये गरीब नागरीक भरडला जात आहे. आज जी अवस्था झालेली आहे त्यामध्ये महापालिकेचे अधिकारी सुध्दा मोठया प्रमाणावर जबाबदार आहेत. आपली जबाबदारी झटकून टाकता कामा नये. पवना नदीमध्ये मोठे व छोटे असे किती नाले येऊन मिळतात असे मी विचारलेले होते. या अनुषंगाने दिलेले उत्तर आहे. अतीशय बेजबाबदारपणे महापालिकेचे अधिकारी यासंदर्भात वागतात, मला जे उत्तर दिलेले आहे त्यात सांगीतले पवना नदीमध्ये मोठे २२ व छोटे १० असे एकूण ३२ नाले येऊन मिळतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये जवळपास २६४ एमएलडी सांडपाणी तयार होते त्यातील २१० एमएलडी पाणी ट्रिट केले जाते. मी मध्यंतरी तत्कालीन आयुक्तांना पत्र लिहिलेले होते पवनानदी दुषित होण्यामागे महापालिकेचे अधिकारी जबाबदार आहेत याचे मला लेखी उत्तर आरोग्य विभागाच्या माध्यमातून दिले. अ प्रभागामध्ये नाला फुटल्यामुळे २८ ठिकाणाहून पाणी जाते, ब प्रभागामधुन १५ ठिकाणाहून पाणी जाते, क प्रभागातून ४० ठिकाणाहून पाणी जाते व ड प्रभागामधुन ३६ ठिकाणाहून पाणी नदीपात्रामध्ये थेट जाते. गेल्या २० तारखेला जी.बी. होणार होती त्यादिवशी मी सकाळी नदीपात्रातील काही फोटो काढलेले आणले होते. त्यामध्ये नदीपात्र प्रदुषीत होण्यामागे आपण किती जबाबदार आहोत हे आपण जाणले आहे. आज २१० एमएलडी पाणी ट्रिट होते असे उत्तर दिलेले आहे. मैलाशुध्दीकरण करुन पाणी नदीपात्रात सोडले जाते परंतु तशी वस्तुस्थिती नाही. आपला एसटीपी २४ तास कार्यरत राहतो का हे पाहिले पाहिजे. कारण ब-याचशा प्रमाणात मैलाशुध्दीकरण करण्यासाठी आलेले पाणी हे थेट नदीपात्रामध्ये जाते आणि त्याठिकाणी पाणी गेल्यानंतर संपुर्णपणे नदीपात्र दुषित होते. आज सुध्दा महापालिकेचे अनेक पंप आहेत ते पंप नदीच्या पात्रा लगत लावलेले आहेत जेणेकरुन ते पाणी महापालिकेच्या मैलाशुध्दीकरण केंद्रापर्यंत पाहचले जाते परंतु लाईट गेल्यानंतर ते पंप बंद असतात आणि ते पाणी नदीपात्रामध्ये जाते. चिखली मैलाशुध्दीकरण केंद्र हे ज्यांना चालविण्यासाठी दिलेले आहे त्यांची मुदत ३१ मे ला संपली आहे. मी त्याठिकाणी ३ जूनला भेट देण्यासाठी गेलो, ते मैला शुध्दीकरण केंद्र बंद होते, कुलकर्णी यांना सुध्दा फोन केला. तेथील मैला थेट इंद्रायणीनदीला जात होता आणि तेथे एक रोकडे नावाचा सफाई कर्मचारी होता त्यास विचारले किती दिवसापासून हे पाणी असेच चाललेतर त्यांनी सांगीतले चार दिवसापासून असे चालले आहे. आज सुध्दा त्याठिकाणी दोन कर्मचारी आहेत ते बारा बारा तासाच्या डयुटया करतात. आयुक्त साहेब आपण सुध्दा त्याठिकाणी गेलेला होता परंतु प्रत्यक्षदर्शीनी मैलाशुध्दीकरण केंद्रापर्यंत आपण पोहचलेला नाहीत किंवा आपल्याला तेथपर्यंत पोहचू दिलेले नाही. त्याठिकाणचा मैला

थेट नदीपात्रामध्ये जातो. यासाठी आपण कोटयावधी रुपये खर्च करतो, लाईटसाठी खर्च करतो एवढा खर्च करत असताना प्रामुख्याने प्रदुषण आहे तसेच आहे. आज नदीपात्राचे सगळे चेंबर बघा ते फुटलेले आहेत व त्याचे पाणी थेट नदीपात्रा मध्ये जाते. ते रिपेअर केले जात नाही. या शहरामध्ये अंडरग्राऊंड ड्रेनेजच्या लाईन्स टाकलेल्या आहेत. चेंबरच्या आतून प्लास्टर केलेले नाही. ते पाणी पिंण्याच्या पाण्यामध्ये मिसळले जाते, राडारोडा चेंबर मध्ये जातो, त्याठिकाणी अनेक घुशी जातात असे निकृष्ट दर्जाचे काम केले जाते. मोठमोठे चेंबर जोडले जाते. हे मैला शुध्दीकरण केंद्राचे काम आपण कागदावर पाहतो. २१० एमएलडी पाणी ट्रिट करतो असे म्हणतात परंतु प्रत्यक्षात तेवढे पाणी ट्रिट होत नाही. नदीला पाणी आल्यानंतर तो मैला तसाच सोडला जातो. आज सुध्दा नदीपात्र खराब झाले त्यासंदर्भात महापालिकेनी आपल्यावर जबाबदारी घेतलेली नाही. महापालिकेची जबाबदारी असताना दुस-यावर जबाबदारी टाकणे ही दुर्दैवाची बाब आहे. संपुर्ण नदीपात्र खराब झालेले आहे. नदीपात्रामधील घाण काढण्यासाठी यंत्रणा आहे का असे विचारलेतर अशी यंत्रणा नाही असे सांगीतलेले आहे. महापालिकेच्या प्रभागनिहाय निवीदा काढल्या जातात. हायसिंथसाठी निवीदा काढल्या जातात परंतु ते काढले जात नाही. नदीपात्रामध्ये काही ठिकाणी कचरा वाहून आलेला आहे, निर्माल्य असते यासाठी वेगळी यंत्रणा नेमायला पाहिजे व हे सर्व एका ठिकाणी जमा झाल्यानंतर पाण्याखाली दबले जाते, गाळ दबला जातो त्यामुळे मच्छर होतात, वास येतो आणि त्याठिकाणी राहणा-या नागरीकांना त्याचा त्रास होतो. हा प्रश्न गेले अनेक आयुक्त येवून गेले त्यावेळेस अनेकवेळा निघाला परंतु कोणी सुध्दा याची जबाबदारी घेतलेली नाही. या महापालिकेत नवीन आयुक्त आल्यानंतर अशाचप्रकारच्या भेटी दिल्या नालेसफाई बाबत ऐकल्यानंतर दुस-या आयुक्तांची आठवण झाली. याठिकाणी बंड म्हणून आयुक्त होते ते आल्यानंतर त्यांनी सफाई करण्याचे चालू केले त्यांचा फोटो पेपरला आला, पेपरला फोटो येवून काय होते प्रत्यक्षात काम व्हायला पाहिजे. असे फोटो गेली १५ ते २० वर्षात अनेक आयुक्तांचे पाहिले परंतु प्रत्यक्षात काम होत नाहीत. घोषणा होतात परंतु प्रत्यक्षात काम होत नाहीत. नदीपात्राजवळचा परिसर आपण पाहिला, आपण आल्यानंतर अधिका-यांनी कारवाई केली परंतु ही कारवाई होत असताना महापालिका किती जबाबदार आहे हे सुध्दा समजले पाहिजे. आज महापालिकेच्या डीपी रिझर्व्हेशनमध्ये अतिक्रमण झाले आहे त्याला जबाबदार कोण हे सुध्दा पाहिले पाहिजे. ही संख्या ६५० आहे. महापालिकेच्या जेवढया इमारती आहेत त्या पाहिल्यातर मनपाचे कार्यालय २४, व्यापारी संकुल २८, चालविण्यास दिलेले उपहारगृह १२, सांस्कृतीक केंद्र ४९, भाजीमंडई, मच्छिमार्केट २२, शाळा इमारत १०४, कर्मचारी निवासस्थान २१, व्यायामशाळा ६४, पाण्याच्या टाक्या जलशुध्दीकरण केंद्र ३५, रुग्णालये २८, जलतरण तलाव १०, केंद्र २, उदयाने १३१ ही सगळी माहिती घेतली हे अनाधिकृत आहेत. यासाठी महापालिकेनी इमारत बांधण्यासाठी परमिशन किंवा पुर्णत्वाचा दाखला कधी घेतला. महापालिकेचे ३ नाटयगृह, महापालिकेच्या इमारतीत हा हॉल आणि सिटि इंजिनिअर बसतात हे अधिकृत आहे बाकी नाही. पिंपरीचा तलाव, भोसरीचे जिमनॅशियम हॉल, मनपाच्या इमारतीचे वाढीव बांधकाम हे अधिकृत आहे बाकी अनाधिकृत आहे. महापालिकाच अनाधिकृत असेलतर सर्वसामान्य माणसाचा कुठे दोष येतो. आपण आपली जबाबदारी घेत नाहीत, प्रामुख्याने सर्वसामान्य गरीब माणसावर जबाबदारी टाकतात. शेवटी आपल्यापासून ही सुरवात करायला पाहिजे. मिलिंदनगरचा

प्रकल्प चालू होत असताना मी सांगीतले होते हा प्रकल्प पुरनियंत्रण रेषेमध्ये येतो तरी तो प्रकल्प करण्यात आलेला आहे. पुर नियंत्रण रेषेमध्ये महापालिकेनी अनेक बांधकाम केलेले आहेत. महापालिकेनी सांगीतले नदीपात्र राज्यशासनाच्या अखत्यारीत येते मग महापालिकेनी नदीपात्रामध्ये संडास किंवा मोठमोठे उपसा केंद्र, स्मशानभूमी हे बांधले त्याला राज्यशासनाची परवानगी घेतलेली आहे का. आपण चुकायचं आणि नागरीकांकडे बोट दाखवायचं. तुम्ही चुकला आहात तुमच्या पासून  शासन करण्यास सुरवात करावी. रिझर्व्हेशन आपण ताब्यात घेतलेले नाही  ६५७ रिझर्व्हेशनमध्ये २५ हजार २३९ बांधकाम झाले, हे बांधकाम होत असताना महापालिकेचे अधिकारी सुध्दा तेवढेच जबाबदार आहेत.  शेवटी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन या दोघांचीही जबाबदारी आहे, आपण आपली जबाबदारी झटकून मोकळे होता. आपण निकृष्ट काम करतो, चेंबर व्यवस्थीत करत नाहीत, त्यांना प्लास्टर करत नाहीत, नदीपात्रामध्ये चेंबर टाकतो ते चेंबर उखडले जाते अशा ठिकाणी चेंबर करतो. ते उखडल्यानंतर पाहत नाहीत. नाल्याचे पाणी थेट नदीमध्ये जाते. छोटया छोटया नाल्यावर सुध्दा एसटीपी करुन पाणी ट्रिट केले पाहिजे. २१० एमएलडी पाणी ट्रिट करतो, उदयानाला देतो असे सांगतो. कोणत्या उदयानाला पाणी जाते. शेवटी जबाबदारी झटकून आपण मोकळे होतो. सर्वसामान्य माणसावर कारवाई केली, वेठीस धरले म्हणजे आपण बाजी मारली, शुरपणा केला असे आपल्याला वाटते. आपली जबाबदारी आहे या जबाबदारी पासून आपण दुर गेलेला आहात. या राज्यामध्ये ठाणे आणि पिंपरी चिंचवड शहर झपाटयाने वाढलेले आहे हे आज झालेले नाही. दहा ते बारा वर्षापासून तुमची सत्ता आहे. जाहिरनामा सांगीतलेला आहे. १ लाख ८० हजार अनाधिकृत बांधकामे नियमीत करण्याचा संकल्प केलेला आहे. ही जबाबदारी आपली सर्वांची आहे. सर्वसामान्य माणसाला वेठीस धरले जाते.  आपण शांतपणे बसतो हे या शहराचे दुर्दैव आहे. एवढया मोठयाप्रमाणावर बांधकाम होत असताना ते वेळीच रोखले असतेतर सर्वसामान्य माणसाचे नुकसान झाले नसते. याचा अर्थ अनाधिकृत बांधकाम व्हावे असे मी म्हणत नाही. परंतु ते होत असताना आपली सुध्दा जबाबदारी होती ते थांबविण्याची, ते केलेले नाही. कोणीतरी अधिकारी नंतर येते आणि आपल्याला सांगते हे बांधकाम अनाधिकृत झालेले आहे. बांधकाम उभे राहताना त्याकडे लक्ष दिले पाहिजे, त्यांना सुध्दा शासन झाले पाहिजे.  ही जबाबदारी सगळयांची आहे भविष्यात चुकिच्या पध्दतीने काम होणार नाही हे पाहिले पाहिजे त्या अनुषंगाने मी प्रश्न विचारलेले आहे, नुसती चर्चा होवुन थांबता कामा नये, यामध्ये तोडगा निघाला पाहिजे. नदीपात्रामध्ये येणारे पाणी थांबले पाहिजे, भराव टाकतो त्यांना शासन झाले पाहिजे.  अरुंद नदीपात्र झालेले आहे ज्यांच्यामुळे नदीपात्र अरुंद झाले आहे त्यांना सुध्दा शासन झाले पाहिजे. माझे प्रश्न आपण स्विकारले, चर्चा करता आली याबद्यल आभार मानतो आणि थांबतो.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, आप्पानी पोटतीडकीने प्रश्न विचारलेले होते परंतु तेवढया पोटतीडकीने अधिका-यांनी उत्तर दिलेले नाही. याचा निषेध सुध्दा केलेला आहे. आयुक्त साहेब आपण नवीन आहेत. पुररेषेमध्ये अतिक्रमण होते, मुळात ही पुररेषा पावणे दोन कोटी रुपये खर्च करुन आपण आखुन घेतली आहे. त्यावेळी सभागृहाची मान्यता घेतली नाही कुठल्याही सदस्याला विश्वासात घेतले नाही आणि आता म्हणतात आपण पुररेषेच्या आतमध्ये आहेत. त्याठिकाणच्या अधिका-यांचा फारमोठया प्रमाणात

भ्रष्टाचार चालतो. ज्यावेळेला आपण पुररेषा आखुण घेतली त्यावेळेला प्रचंड मोठे रणकंदन झालेले आहे. सर्वात मोठा पुर आला जीवीत हानी झाली त्यानंतर सर्व सदस्यांनी त्या विषयाला मंजूरी दिली. प्रशासनाला विचारणा केली आपण बांधकाम परवानगी देत असताना पुणे पाटबंधारे खात्याला का पाठविता त्यावेळेला सांगीतले त्यांनी नकाशा दिलेला आहे, पुररेषा आखुण घेतलेली आहे आता त्यांची एनओसी न घेता येथेच बांधकाम परवानगी देणार. परंतु आता सुध्दा पाटबंधारे खात्याचे जे.ई.बोलवतो, आपले जे.ई.असतात. पुररेषा डीपी वर सुध्दा आणत नाही. वारंवार विषय मांडून  सांगत आहे ३७ करा आणि नकाशावर पुररेषा आणा. इतर ठिकाणचे अनधिकृत बांधकाम जसे पाडले तसे पिंपरी गावातील स.क्र.११/२ मधील त्या चार अनधिकृत इमारतींवर कधी कारवाई करणार. बांधकाम परवानगी विभागाने सांगीतले आम्ही बांधकाम परवानगी दिलेली नाही. एक बांधकाम एक दिवसामध्ये उभे राहत नाही. पहिले बांधकाम होऊ द्यायचे त्या ठिकाणी पैसे कमवुन घ्यायचे असे चालले आहे. राजकीय बागूलबुवा करतो. २००९ रोजी राज्य सरकारने अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी बीट निरीक्षक नेमण्याचा अध्यादेश काढला होता. त्यांनी अनधिकृत बांधकामाची नोंद घेवून प्रभाग अधिका-यांना द्यायची असे असताना बीट निरीक्षकांनी असे काम केले नसेलतर त्यांच्यावर काय कारवाई करणार. त्यानंतर आता २३ मार्च २०१२ रोजी राज्यसरकारने एमआरटीपी कायद्यात सुधारणा केलेली आहे त्याचा अध्यादेश काढून निदर्शनास आणून दिल्यानंतर अतिक्रमण कारवाई न करणा-या अधिका-यांवर ३ महिने सक्षम कारावास व २० हजार रुपये दंड आणि शिक्षा एकाच वेळी देण्याचे जाहीर केले आहे. ज्या अधिका-याच्या अखत्यारीत हे बांधकाम झालेले आहे त्यांना निलंबीत केले पाहिजे.  ३ हजार स्क्वे.फुटामध्ये  ९ हजार स्क्वे.फुटाचे बांधकाम होते त्यावेळेला आपले अधिकारी कुठे जातात त्यांना माहित नसते, असे नाही तर त्यांना सुध्दा हे माहित असते. त्याकडे जाणुनबुजून दुर्लक्ष केले जाते. आणि एखादया माणसावर कारवाई करुन आपण काय साध्य करतो. असे अनधिकृत बांधकाम जेथे होतात तेथील संबंधीत अधिका-यांना काय शिक्षा करणार आहेत. ( कलम ५६ क वाचन केले.)  असा पदनिर्देशित अधिकारी कलम ५३,५४,५५,५६ च्या तरतुदीन्वये कारवाई करण्यास कसुर करत असेलतर त्याच्यावर २० हजार दंड अशी एमआरटीपीमध्ये तरतूद केलेली आहे. आयुक्त साहेब आपण ज्यावेळेला आलात त्यावेळे पासून कारवाई चालू केलेली आहे. जो माणूस स्वत:साठी घर बांधतो त्याला विरोध नाही परंतु ३ हजार स्क्वे.फुट जागेवर ९ हजार स्क्वे.फुट बांधकाम करुन ते विकतो. तेथे राहण्यास जाणारे नागरीकच असतात त्यांस कोण जबाबदार आहे. दापोडी पुलावरुन सांगवीला जाताना डाव्या बाजुला पाहिलेतर नदीपात्रामध्ये भराव टाकून दोन मजली इमारत चालू आहे हे आपल्या अधिका-यांना माहिती नाही का. हे माहिती असुन सुध्दा कारवाई करत नाहीत. याठिकाणी चुकिच्या कामाना प्रोत्साहन द्यायचे आणि  दुसरीकडे सांगायचे मी वाचवितो आणि वाचवायचे नाही अशी दुटप्पी भूमिका घेतलेली आहे. मी आपल्याकडे नावानिशी तक्रार केलेली आहे त्यावर आपण कारवाई करावी.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, आप्पा आपले मी अभिनंदन करते. आपण अभ्यासपुर्वक माहिती गोळा केली त्यावर अभ्यास करुन तो विषय मांडलेला आहे. मी आपले कौतूक करते. याठिकाणी त्यांच्याच प्रश्नावर बोलते. त्यांनी जे प्रश्न विचारलेले

आहेत त्याला उत्तर दिलेले आहे. बांधकामाची सद्यस्थिती काय याचे उत्तर बांधकाम पुर्ण झालेले आहे असे सांगीतले. यांनी बांधकामाला परवानगी दिलेली आहे. बांधकामाला परवानगी दिली याचा अर्थ म्हणजेच नदीमध्ये परवानगी दिली का. रिव्हरसाईडला रिसॉर्ट आहे त्याठिकाणी नदीत टाकलेली भर आहे. मी १९७० साली याठिकाणी आले त्याठिकाणी खडकावर धुणं धुण्यासाठी जायचे. त्यावेळेला पाण्याचे नळकनेक्शन खुप कमी होते. त्याठिकाणी आज पाहिलेतर खुप भर घातलेली आहे, नदीमध्ये भर पडलेली आहे याला मी साक्षीदार आहे. त्याठिकाणी नदी वाहत असताना तो सर्व्हे नंबर नदीमध्ये कसा काय गेला, मग जागा मोजणीमध्ये चुक आहे का, पुन्हा ही जागा मोजून घ्यावी. ज्याठिकाणी नदी वाहत होती त्याठिकाणी नदीमध्ये भर घालून त्याठिकाणी बेट तयार करुन, त्याठिकाणी बेट आहे हे बांधकाम परवानगी विभागाला दिसते तरी सुध्दा त्यांनी याठिकाणी यादी दिलेली आहे यासाठी परवानगी दिलेली आहे. याची अगोदर चौकशी करावी. नदीमध्ये भर टाकलेल्या जागेवर परवानगी दिलेली आहे का याचा खुलासा करावा. नदीमध्ये जी भर टाकलेली आहे त्यावर यांच्या परवानगीची भर पडलेली आहे का, याचे उत्तर द्यावे. एकमेकांवर आरोप करुन चालणार नाही. आता सन्मा.सदस्यानी सत्तारुढ पक्षाचा जाहिरनामा म्हणाले, धन्यवाद. आपण लोकांना आश्वासन दिलेले आहेत, ज्यावेळेला हे सर्व घडत होते त्यावेळेला हे सर्व सन्मा.सदस्य या सभागृहामध्ये होते. या प्रश्नोत्तराचा असाच दहा वर्षापुर्वी अभ्यास केला असतातर आज लोकांचे जे बांधकाम पाडलेले आहे निदान ते दुःख तरी त्यांना झेलावे लागले नसते. नगरसेवक कुठे कचरा पडलातर स्वच्छता विभागाच्या कर्मचा-यांना फोन करतात. सकाळी आणि संध्याकाळी नळाला पाणी आले नाही, ड्रेनेज फुल झाले ते रस्त्याने वाहू लागले असे सांगतात. आपल्याला कोणाला नरकामध्ये जायचे का असे कोणी विचारलेतर मी एकच उत्तर सांगेल की उदयोगनगर, चिंचवड याठिकाणी नरकात जशी घाण असते तशी त्याठिकाणी चेंबरला उखळी फुटत असते. या रस्त्यावरुन त्या घाणी मधुन टू व्हिलरवर जाणारे दोषीच आहेत त्याना त्या रस्त्यावरुन दोन पाय वर करुन गाडी घेवून जावी लागते आणि पायी चालणा-यांना तेथील घाण अंगावर घ्यावीच लागते त्यासाठी दररोज आम्ही फोन करतो. काल सुध्दा गड्डूवारसाहेब माझ्या बरोबर होते. भयानक अशी ड्रेनेजची परिस्थिती आहे. अधिका-यांनी काय काम करावे आणि आम्ही काय करावे याच्यामध्ये काही वेगळेपणा असेलतर अधिका-यांनी समजावून सांगावे. आपण एवढया सगळया प्रश्नाला उत्तर दिलेले आहे. बांधकामाची सद्यस्थिती पुर्ण झालेली आहे. या कामाला तुम्ही बिल्डींग परमिशन दिलेले आहे का. याठिकाणी १४ नंबरला चिंचवड पवना असे लिहिले आहे त्याठिकाणच्या बांधकामाला परवानगी दिलेली आहे का हे सांगावे.

मा.काची (उपशहर अभियंता) :- मा.महापौर साहेब, १२२ बांधकाम परवानगी घेतलेले आहेत त्यांचे नंबर टाकलेले आहेत. ही बांधकाम परवानगी पुररेषा येण्याच्या अगोदर दिलेली आहे.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, कमिन्समेंट सर्टिफिकेट देत असताना आपण अधिकारी जागेवर पाहणी करतो तशी याठिकाणी पाहणी केली आहे का. त्याठिकाणी स्वतंत्र अधिकारी गेलेले होते का. ज्युनिअर इंजिनिअर व डेप्युटी इंजिनिअर हे पाहणी करतात. ते नदीतून उतरुन गेले का, तेथील कठडी पार करुन गेलेले आहेत का. ते

कसे काय गेले तो भराव आहे हे त्यांच्या निदर्शनास आलेले नाही का. आपण कधी जाता का, आता जरी गेलाततरी दिसेल त्याठिकाणी भराव टाकून नदीचा प्रवाह बदलण्याचा प्रयत्न केलेला आहे हे चिंचवडकराना दिसते, सर्वाना दिसते हे बिल्डींग परमिशन अधिका-यांना दिसले नाही का. उलट नदीमध्ये टाकलेल्या भरावावर परमिशन दिलेले आहे. याचा अर्थ ते कुठे बघतात, काय बघतात, कशाप्रकारे परमिशन देतात हे आपल्या लक्षात आलेले असेल. पुररेषा आता झालेली आहे, नदीमध्ये बांधकाम परवानगी दिलेली आहे हे तुम्ही सांगता. तुम्ही पुर्वीच्या नदीचे नकाशे काढता का, डिपीचा रिमार्क घेता. अशाप्रकारचा नदीचा प्रवाह वळून जागा तयार करुन तेथे परवानगी देता परंतु नाले डीपी परवानगीमध्ये गडप केलेले आहेत. नाला दाखविलेला नाही, नदी लुप्त होते असा भुगोलामध्ये अभ्यास करतो आणि नंतर ती १०० कि.मी. ला उगम पावते. असे नाले आपल्या नकाशामध्ये गडप झालेले आहेत आणि पुढे उगम पावलेले आहेत. डीपी प्लॅनमधील नाले गायब आहेत. नाला नसल्यामुळे बिल्डींग परमिशनवर तो नकाशा आला. त्याठिकाणी प्रत्यक्ष जागेवर जावुन पाहिलेतर ते फक्त कागदच बघतात, जागेवर गेल्यानंतर त्यांना समजेल की नाला नाही. १० फुट जागा सोडलेली असते असा नियम आहे. सर्व नियम धाब्यावर बसविलेले आहेत. प्रत्यक्ष पाहणी होत नाही. हा सर्व कागदाचा खेळ आहे एवढेच लक्षात घ्यायचे आहे. पुररेषेमध्ये व्यायाम शाळा, पुररेषेमध्ये सांस्कृतीक भवन, पुररेषेमध्ये स्विमिंग टँक एवढया फ्लडलाईनला आपण परवानगीच दिली कशी. यासाठी महापालिकेनी पैसे दिलेले आहेत. चाफेकर चौकापर्यंत पुर येतो गावक-यांनी त्यांची घर तशीच गळत ठेवायची का व कटोरे घेवून गावामध्ये भीक मागायची का. सन्मा.सदस्यांनी पुररेषेचा सुध्दा अभ्यास करायला पाहिजे. एकिकडे पुररेषा येते चाफेकर चौकापर्यंत व पाठिमागे वाल्हेकरवाडीपर्यंत रेड झोन आहे. प्राधिकरण आहे, सगळे गावठाण पुररेषेमध्ये गेलेले आहे याचा पुनर्विचार करण्यासाठी सभागृहाने शासनाला कळविले पाहिजे. ब्ल्यू लाईनमधील बांधकामावर आपण हातोडा मारलेला आहे. त्याठिकाणी लाईट, पाणी दिलेले आहे यासाठी कोणीचीही परवानगी न घेता आपण दिलेले आहे. आपण केलेले सगळे बरोबर आणि आम्ही केलेले चुकीचे असे आपल्याला म्हणायचे का. आपण केलेले बांधकाम बरोबर आहे आणि नागरीकांनी केलेले चुकिचे आहे. तुम्ही म्हणलेले बरोबर आहे ते आम्ही स्विकारायचे आणि आमचे नाकारायचे.

मा.राजेंद्र जगताप :- मा.महापौर साहेब, नदीपात्राचा विषय आला त्यामध्ये नदीपात्र पाण्याच्या पातळीपासून किती मिटर आहे हे सभागृहाला सांगावे. २५ मी. का ५० मी. हे सांगावे. कारण एका बाजुला नदीपात्राला लागून महापालिकेचा नकाशा आहे त्याठिकाणी काही सर्व्हे नंबर आहेत. सर्व्हे नंबर २ पिंपळेगुरव याठिकाणी मालकी हक्काच्या जमिनी आहेत त्या ३ हजार हेक्टर १७ आर आहेत. दुसरा स.नं. ३४ आहे यामध्ये २ एकर १३ आर जमिन आहे. या नदीपात्राच्या जमिनी मालकी हक्काच्या आहेत. पिंपळेगुरवची १० हे. ९ आर जमिन असेलतर रावेत पासून सांगवीपर्यंत कितीतरी हेक्टर जमिनी मालकी हक्काच्या आहेत. याचा ७/१२ आपल्याकडे आहे त्याप्रमाणे चिंचवड पासून सांगवीपर्यंत कितीतरी जमिनी मालकी हाक्काच्या आहेत त्याठिकाणीच ड्रेनेज लाईन, स्मशानभूमि महापालिकेनी केलेले आहे. संरक्षण भिंत बांधलेली आहे. महापालिकेनी अतिक्रमण

केलेले आहे असे मी म्हणेल. मालकी हक्काच्या जमिनीवर परवानगी न घेता  हे केलेले आहे.  आतापर्यंत नदीपात्रालगत मालकी हक्काला विश्वासात न घेता हे कामकाज केलेले आहे.  आतापर्यंत जे महापालिकेनी बांधकाम केलेले आहे परंतु एकाही शेतक-याला विश्वासात न घेता हे केलेले आहे. आम्ही सतत प्रसिध्दीसाठी धडपडत असतो. सर्वांना हे दिसत नाही की नदीमध्ये गाळ आहे, जलपर्णी आहे, पाणी दुषित आहे त्यासाठी प्रसिध्दी मिळवावी.  फक्त आपण म्हणतो नदीमध्ये राडारोडा टाकून नदी बुजविली आहे आणि प्रसिध्दी मिळवितो. मालकी हक्काच्या स.नं. मधील ही जागा आहे. रावेतपासून सांगवी पर्यंत अशा हजारो एकर जमिनी मिळाल्यातर याचा विचार करावा. सीमा रेषासुध्दा नदीपात्रात नाही, असेलतर तसे दाखवावे. नदीपात्राजवळील जमिन मालकांना अंधारात ठेवून केलेले भूसंपादन बेकायदेशिर आहे. ३० जूनला पेपरला आलेले आहे त्या मालकांना विश्वासात घेवून नियमानुसार स्थानीक पेपरमध्ये नोटिस द्यावी त्याच्यानंतर हे भूसंपादन करावे असे पेपरला आलेले आहे. या सभागृहात ज्या ज्या वेळेस भूसंपादनाचा विषय येत असतो त्यावेळेस मालकी हक्काच्या जमिनीचा  मोबदला दिल्यानंतरच आपले अधिकारी त्या जमिनीमध्ये येतात.

मा.धनंजय आल्हाट :- मा.महापौर साहेब, आप्पानी दोन प्रश्न विचारलेले होते पहिला प्रश्न नदी प्रदूषणाचा आणि दुसरा प्रश्न नदी संदर्भातील पुरनियंत्रण रेषेतील अतिक्रमणचा आहे.  मी आयुक्तांच्या आणि सभागृहाच्या निदर्शनास काही गोष्टी आणुन देतो. महापालिका क्षेत्रामध्ये इंद्रायणीनदीचा तळवडे, च-होली येथपर्यंत  ९ कि.मी. चा भाग आपल्या महापालिकेत येतो आणि  सर्वात महत्वाची गोष्ट आपल्या महाराष्ट्राचे तीर्थक्षेत्र आळंदी, हे आपल्या महापालिकेच्या जवळच्या क्षेत्रामध्ये येते. आजची तेथील पाण्याची परिस्थिती आपल्याला माहित आहे तेथील प्रदुषणामध्ये मोलाचा वाटा पिंपरी चिंचवड महापालिकेनी उचललेला आहे. त्याठिकाणी जे काही यात्रेकरु आळंदीमध्ये येतात आणि फारमोठया श्रध्देने  तेथील पाणी पितात त्या श्रध्देला फार मोठा तडा महापालिकेनी दिलेला आहे. आपल्या महापालिकेच्या कचराडेपोमध्ये ६०० टन कचरा त्याठिकाणी डंपींग केला जातो व फक्त त्याठिकाणचा १०० टन कचरा मॅटेलीक प्रकल्पासाठी वापरला जातो तो सुध्दा मॅटेलीक प्रकल्प अर्धवट आहे. प्रत्यक्ष पाहिलेतर १०० टन कचरा प्रोसेसमध्ये जातो.  त्याठिकाणी खताचे ढिगारे लागलेले आहेत. दुस-या बाजूला कच-यामध्ये असलेले वेस्टेज आहे त्याचे ढिगारे लागलेले आहेत. बीव्हीजीवाले कच-याची वाल्हेवाट लावतात परंतु त्या कच-याच्या प्रती कच-यामधून त्याठिकाणी ढिग निर्माण झालेले आहेत.  त्याच्यावर कोणीही गांभीर्याने लक्ष घातलेले नाही ते तसेच पडून आहेत. आणि उर्वरीत ५०० टन डंपीग केलेला कचरा अणि निर्माण झालेल्या या कच-याचे ढिग यामुळे काळं प्रदुषित वेगळयाप्रकारचे विषारी पाणी इंद्रायणी नदीला जाते. संपुर्ण शहराचा कचरा त्याठिकाणी प्रोसेस साठी जमा केला जातो. त्याठिकाणी सुधारीत परिस्थिती आहे परंतु त्यावर थांबले नाही पाहिजे कारण  वीस वर्षानंतर गंभीर परिस्थिती निर्माण होणार आहे. शहरात असे कचरा डेपो ठिकठिकाणी निर्माण केलेतर बरे होईल. संपुर्ण कचरा डेपो एकाच ठिकाणी असल्यामुळे एकाच भागातील नागरीकांवर हा अन्याय होत नाही का. याचा आपण गांभीर्याने विचार करावा आणि चारही प्रभगा मध्ये आपले आरक्षण आहेत त्याठिकाणी झालेले अतिक्रमण काढलेतर त्याठिकाणी प्रति कचराडेपो तयार होतील आणि शहरातील कच-याची विल्हेवाट लागेल व नागरीकांच्या

आरोग्याचा प्रश्न सोडविला जाईल. पुरनियंत्रण रेषा संपुर्ण भागामध्ये समाविष्ट भागात आहे. जी आखली आहे ती वादाची आहे. शेतक-यांना तर या पुरनियंत्रण रेषेची काही माहितीही नाही. बाहेरची मंडळी जागा घेण्यासाठी येतात त्यावेळेला त्या रेषेचा विचार होतो व त्यानंतर शेतकरी जागा होतो. संबंधीत पुररेषा आखत असताना जुन्या मंडळीने सांगीतले पुररेषा अशी आखली आहे की आमच्या बापदादाच्या हयातीमध्ये सुध्दा याठिकाणी कधी पुर आलेला नाही अशी पुररेषा आखलेली आहे. असली कशाला सुरक्षा केलेली आहे. लोक भूमिहिन झालेले आहेत. शहराचा विकास केलाच पाहिजे परंतु यामधुन अशाप्रकारची पुररेषा आपल्याला परवडणारी नाही. जेथे पुर आलाच नाही त्याठिकाणी पुररेषा म्हणून सिध्द करणे चुकिचे होईल. ज्यावेळेस आरक्षणा संदर्भात हरकती व सूचना मागवितो त्यावेळेला त्या बातम्या रद्दी पेपरला येतात, जे पेपर नेहमी वाचण्यात असतात त्या पेपरला या बातम्या येत नाहीत. धमाका, कात्रजचा बोगदा अशा पेपरला हरकतीच्या संदर्भातील बातम्या आल्यातर ते नागरीक कधीही वाचत नाही अशा पेपरला येतात याची दखल घ्यावी आणि पुरनियंत्रण रेषेचा पुनरसर्व्हे करावा आणि भूमिहिन नागरीकांचा विचार करावा. ज्याठिकाणी पुररेषेमध्ये अतिक्रमण आहे त्यास आम्ही विरोध करणार नाहीत कारण ती शहराची गरज आहे परंतु आम्हांला असे वाटते गव्हा बरोबर किडेही रगडले जातात. जे गरीब कामगार या शहरामध्ये आहेत त्यांच्या एक गुंठयाला परमिशन द्यायचा नियम नाही. एक गुंठयामध्ये प्लॅन बसत नाही ते किती जागा सोडणार आणि कसे घर बांधणार. त्यावेळेसच आपण पॉलीसी ठरविली पाहिजे. सर्वसामान्य नागरीकांवर आपण असा अन्याय केलातर त्याला फ्लॅट बुक करावा लागेल आणि सर्वसामान्य माणूस खड्डयात गेल्याशिवाय राहणार नाही तरी आपण एक पॉलीसी राबवावी. शहरात अनाधिकृत बांधकाम हे एक कॅन्सरसारखे आहे. एक गुंठयामध्ये सर्वसामान्य नागरीकांचे घर आहेत त्यांच्यासाठी पॉलीसी ठरवून द्यावी जेणेकरुन ते रस्त्यावर येणार नाही आणि जनहिताचे काम केल्यासारखे होईल.

मा.गौतम चाबुकस्वार :- मा.महापौर साहेब, श्रीरंग बारणे यांचे मी अभिनंदन करतो. त्यांनी पवनानदीच्या प्रदुषणा बाबतीत बरीचशी माहिती विचारलेली आहे आणि त्याचे उत्तर त्या पध्दतीने मिळालेले आहे. पिंपरीमध्ये पवना जी वाहते ती साधारणात: चिंचवड ते डेअरी फार्म पर्यंत ८ ते ९ कि.मी. चा परिसर आहे, या परिसरामध्ये पाहिलेतर पवनानदीचे जास्तीत जास्त प्रदुषण या भागामध्ये आहे त्याचे कारण असे आहे की या भागामध्ये याठिकाणी २२ मोठे नाले आहेत यापैकी ३ ते ४ मोठे नाले या परिसरातून वाहतात त्यापैकी भाटनगरचा नाला आहे, एमआयडीसीच्या कारखान्याचे काही पाणी या नाल्याच्या माध्यमातून सोडले जाते ते ट्रिटमेंट न करता केमिकलचे पाणी या नाल्यामधुन पवनानदीमध्ये जाते. पावसाचे पाणी नदीच्या पाण्यावर पडले की फेसाचे ढग तयार होतात व केमिकलचे मोठमोठे फुगे दिसतात. या परिसरामध्ये एच.ए. कंपनीचा मोठा नाला आहे त्यामधील पाणी विदाऊट ट्रिटमेंट करुन सोडले जाते. काही पाणी तात्पुरते ट्रिटमेंट करुन सोडतात परंतु पाहटेच्या ४ ते ७ च्या दरम्यान विदाऊट ट्रिटमेंट केलेले पाणी या पवनानदीमध्ये सोडले जाते. मी कंपनीमध्ये जाऊन आलो त्यावेळेला त्यांनी सांगीतले आम्ही पाणी ट्रिटमेंट करुन सोडतो. पाणी ट्रिट करण्यासाठी इलेक्ट्रीकसाठी फार खर्च होतो आणि आज पाहिलेतर एच.ए.कंपनीची परिस्थिती नाजूक आहे. या पवनानदीमध्ये जे पाणी सोडले जाते त्याची अशुध्दता किती आहे. पिंपरीच्या

टेस्ट सॅंपल घ्या त्यामध्ये प्लॅस्टीकच्या बॅगा, थर्माकूल हे प्रचंड प्रमाणात वाहते. पवनानदी ३ ते ४ मी. पुर्ण हे थर्माकूल असलेली दिसेल. याठिकाणी सगळयात महत्वाचा प्रश्न म्हणजे ज्यामुळे पवनेचे प्रदूषण होते ते यापुर्वी माजी आयुक्त डिग्गीकर असताना, श्रीनिवास पाटिल असताना त्यांना सुध्दा पवनेचे पाणी प्रदुषीत का राहते हे सांगीतले. तेथील मिलिटरी डेअरी फार्मचा एक बांध आहे तेथे पाणी अडविले जाते. त्यामुळे हे पाणी नेमके कशामुळे प्रदुषीत होते याचे कारण लक्षात येईल. जर पावसाळयामध्ये पुर आलातर आणि पवनेचे पाणी त्या बांधावरुन गेलेतर हे पाणी प्रदुषीत होते अन्यथा १० ते ११ महिने ते पाणी तसेच डम्प असते. या डम्प केलेल्या पाण्याचे सर्क्यूलेशन होत नाही. अकरा महिने सगळया गटाराच्या पाण्यापासुनची अशुध्दता या पवनानदीच्या पाण्यामध्ये येते आणि म्हणून आजुबाजूला रोगराई होते. पिंपरी, काळेवाडी, चिंचवडमध्ये पवनेच्या प्रदुषणामुळे रोगराई होते, डास, मलेरियावाले रुग्ण याठिकाणी आढळून येतील. म्हणून हा जो बांध आहे त्यातील पाणी गेली २५ वर्षे डिस्चार्ज होत नाही व केंद्रशासन त्यात लक्ष घालत नाही. कारण तेथील जनावरांना पाणी त्यांना द्यावे लागते. गेल्या २५ ते ३० वर्षे हा बंधारा बंद आहे त्यामुळे प्रदुषण वाढलेले आहे. याठिकाणी फ्लड लाईनचा फेरविचार व्हावा. ज्यावेळेला जास्तीत जास्त पुर आला अशावेळी त्याचे अंतर किती होते याचा सुध्दा पुन्हा एकदा महापालिकेनी फेर विचार करावा. याठिकाणी मी विनंती करतो की पवनेच्या प्रदुषणा बाबतीत एक मास्टर प्लॅन तयार करुन नियोजन करावे, त्यासाठी दोन-चार वर्षे गेले तरी चालेल परंतु परफेक्ट मास्टर प्लॅन तयार करावा व पवनानदीच्या प्रदुषणापासून शहराला मुक्त करावे.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, याठिकाणी संपुर्ण शहरात आयुक्तांची एण्ट्री सलमान खानच्या दबंग पिक्चरसारखी झाली अशी शहरात चर्चा आहे. आता त्यांना हिरो म्हणायचे का व्हिलन म्हणायचे असे प्रश्नचिन्ह सगळयापुढे उभे राहते की काय अशी भिती वाटते. पवनेला न्याय मिळतो असे वाटते त्याबद्यल आप्पांना धन्यवाद देते. आठवण गांवापासून पवनेचा उगम होतो. त्याठिकाणचे पाणी बाटलीत आणले होते आणि पिंपरी चिंचवडचे पाणी घेतलेतर पवनेवर पिंपरी चिंचवड अन्याय करते असे दिसते. पुर रेषा व पवना प्रदुषण हे दोन वेगवेगळे विषय आहेत त्यात पवना प्रदुषण हा महत्वाचा विषय आहे. अगोदर पुररेषेची मागणी केली आता ती कमी करा म्हणतो ही विसंगती आहे. जायचे मुंबईला परंतु पुण्याची दिशा दखवितो. संपुर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये कुठेच पुररेषा नाही. पिंपरी चिंचवड भागात “आ बैल मुझे मार” असे झालेले आहे. पुर रेषेची मागणी केली, पुररेषेच्या भीतीमुळे अनेक लोकांनी जमिनी विकल्या. त्याठिकाणी बिल्डींग बांधल्या गेल्या. कुठली नैसर्गिक आपत्ती येईल हे सांगता येणार नाही. दुबईला पामबीच बघितलातर समुद्रामध्ये मोठमोठया इमारती उभा राहिलेल्या आहेत. त्याठिकाणी तांत्रिक सल्ले घेतले असतील. आपल्याकडे तीन आमदार आहेत त्यांची मदत घेवून जे जाहिरनाम्यामध्ये सांगीतले त्यासाठी त्यांची मदत घ्यावी. याठिकाणी महापौरांच्या घरातही आमदार आहेत, एक नगरसेवक आहेत. हि एकत्रित जबाबदारी आपल्यावर आहे. मोठमोठया इमारतीवर कारवाई करावी आम्ही तुमच्या बरोबर आहोत परंतु गरीब लोक आहेत त्यांना झोप येत नाही. सकाळी नगरसेवकांच्या घरासमोर लोकांची लाईन लागते. एक गुंठयावाल्यांना खर्च परवडत नाही आणि आपण सांगीतले २४ तासाच्या आत हे बांधकाम पाडून टाका. मंत्रालयामधील फाईल जळाल्या, पुन्हा फाईल देवू

म्हणाले. मोठमोठया बांधकामावाल्यांना व्हेन्टीलेटरवर ठेवले जाते तसे लहान लहान बांधकामवाले आहेत त्यांना थोडी संधी द्या. मोठया इमारतीवर कारवाई करा व लहान बांधकामाना वेळ द्या. जे बिल्डींगचे कम्प्लेशन घेत नाही त्यांचा दुसरा प्लॅन मंजूर करता येत नाही असे शर्मा साहेबांनी सांगीतलेले आहे त्यावर काय कारवाई झालेली आहे. या पुढील काळात कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता कारवाई करावी. बिल्डर एकच प्लॅन करत नाही त्यांनी पहिल्या बिल्डींगचे कम्प्लेशन घेतलेले नसेलतर त्यांचा दुसरा प्लॅन का मंजूर करता. जखम डोक्याला आणि मलमपट्टी गुडघ्याला करतो, अशाप्रकारचे कामकाज करु नये. छोटेछोटे बांधकामवाले आहेत त्यांना समज द्या. त्यांचे बांधकाम थांबवा आणि मंत्रालयातून आल्यानंतर करा आम्ही सुध्दा त्या लोकांना थंबावे म्हणून सांगतो. आता निवडणूका आलेल्या आहेत. लोकांची दिशाभूल होते. लोक भितात, तेथे आमचे अधिकारी, बीट निरीक्षक जातात, दबाव असतो परंतु तुम्ही आल्यानंतर पैसे घेण्याचे डेअरींग आता कोणामध्ये राहिले आहे असे वाटत नाही. परंतु दुर्दैवाने यात गरीब जनता भरडली जाते. तुमचा मागचा इतिहास बघुन असे कोण काम करेल. छोटया छोटया बांधकामाना, वैयक्तिक बांधकामाना समज द्यावी.

मा.अनंत को-हाळे :- मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे की जे काही नदीपात्रामधील बांधकाम आहेत, ब्ल्यू लाईन म्हणतो त्याचा नियम करा. ते कुठपर्यंत आहे. त्याच्या शेजारी जागामालक आहेत त्यांच्या जागा आहेत ते त्या जागेमध्ये भराव टाकतात तो भराव योग्य आहे का अयोग्य आहे. नदीपात्राची रेषा आखली जाते त्यांना मोबदला द्या, जागा फिक्स करा. कारण माझ्या ऐरियामध्ये रोज ट्रक भरुन येतात. मी निकम साहेबांना सांगीतलेतर ते म्हणतात भराव टाकणा-यावर आम्ही कारवाई करत नाहीत. अधिका-यांना जेव्हा जेव्हा या विषयावर बोलतो तेव्हा ते बांधकाम विषयी बोलतात, भरावा विषयी बोलत नाहीत त्यांच्यावरही कारवाई झाली पाहिजे. पुररेषेमधील बांधकामावर आपण कारवाई करतो. आप्पानी चांगले मार्गदर्शन केलेले आहे परंतु कारवाई काय होणार. गोरगरीबांनी छोटेछोटे बांधकाम केलेले आहेत त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. माझ्या भागामधील पुर्ण बांधकाम जमिनदोस्त झालेले आहे. काही भागामध्ये फक्त ओरबडले आहेत. कारवाई करण्याची नेमकी पध्दत काय आहे. काही ठिकाणी कारवाई झाली व परत बांधकाम चालु केलेले आहेत. अधिकारी वर्ग प्रामुख्याने आता तुम्ही आल्यानंतर जागा झालेला आहे. याच्या अगोदर त्यांना याविषयी भिती नव्हती. आयुक्त साहेब नवीन आहेत असे नागरीकांना सांगीतले जाते व पाच-सहा महिने भिती आहे असे म्हणतात. अधिका-यांवर कारवाई होत नाही परंतु योग्य सुधारणा आपल्यापासून करावी. महापालिकेचे बांधकाम हे पुररेषेमध्ये आहे ती आपल्यापासून सुरवात करावी. माझ्या भागामध्ये वाचनालय आणि सांस्कृतीक भवनाचे असे बांधकाम आहे. मी त्यांना विचारले हे कसे काय तर ते म्हणाले हे चालते. या गोष्टी सुध्दा विचारात घ्याव्यात. आपण लोकांना सांगीतलेतर ते म्हणतात महापालिकेनी येथे बांधलेले आहे. आयुक्त साहेब आमची तुमच्याकडून अपेक्षा आहे. कारवाई करताना समान असावी.

मा.विलास नांदगुडे :- मा.महापौर साहेब, महाराष्ट्र राज्यात ज्या महापालिका आहेत त्या सर्व महापालिका पुररेषेचे इम्प्लीमेंटेशन करतात का, का फक्त पिंपरी चिंचवड महापालिकाच करते याचा खुलासा करावा.

मा.भदाणे (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महापालिकेनी फेब्रूवारी २००९ मध्ये पुररेषेची आखणी करुन घेतलेली असल्यामुळे ती आपल्यावर बंधनकारक आहे आणि आपण इम्प्लीमेंटेशन करतो. इतर महापालिकेबद्यल मी माहिती घेवून सभागृहाला सांगेल.

मा.विलास नांदगुडे :- मा.महापौर साहेब, फक्त पिंपरी चिंचवड महापालिकाच त्याचे इम्प्लीमेंटेशन करते. डी.पी.प्लॅन घोषीत केल्यानंतर पुररेषेचे इम्प्लीमेंटेशन करतो हे चुकिचे आहे. याला सभागृहाची मंजूरी घेतलेली नाही, नियमाप्रमाणे कारवाई केलेली नाही. या सर्व पुररेषेमुळे एवढे मोठे लोक अडचणीत आलेले आहेत. दोन-दोन कि.मी. पुररेषा आतमध्ये जाते त्याठिकाणी बिल्डींगचा प्लॅन मंजूर केला जात नाही. ज्या लोकांनी जागा घेतल्या त्या तशाच पडलेल्या आहेत, अनेक प्रश्न उपस्थित झालेले आहेत. महापौर साहेब, आयुक्त साहेब तुमच्या कारकिर्दीत याचा फेरविचार करावा. आपणच का इम्प्लीमेंटेशन करायचे. करायचे असेलतर नदीपात्रापासून ३० ते ५० मी.पर्यंत असे करा त्यावर सभागृहामध्ये चर्चा करा व ३७ प्रमाणे ही कारवाई करावी. हे चुकिचे चालले आहे त्यामुळे सर्वसामान्य नागरीकांना त्रास होतो आहे. गौतम चाबुकस्वार यांनी सांगीतले ४ ते ५ मी. प्लॅस्टीक नदीमध्ये साठलेले आहे ते काढावे हे महत्वाचे आहे.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, प्रश्नोत्तराच्या निमित्ताने शहरातील ब-याचशा अडचणीच्या बाबतीत आपण चर्चा करतो. सगळयात महत्वाचा प्रश्न म्हणजे पवना आणि इंद्रायणी नदी परिसरातील अनाधिकृत बांधकामाचा, रेडलाईनचा त्यामध्ये असलेल्या अतिक्रमणाचा आहे. खरेतर आपले शहर हे तीन नदीच्या तीरावर बसलेले शहर आहे. पवनेची गरज दाखवित असताना त्याच्यावर अतिक्रमण होणे हे योग्य नाही. गेल्या काही वर्षात अतिक्रमणाचे प्रमाण वाढलेले आहे हे आपण बघतो. परंतु आपले शहर आठ ते दहा वर्षात झपाटयाने वाढत आहे त्याप्रमाणात विकास होतो. चुकिची गोष्ट झाली असे म्हणायचे कारण नाही. आपले शहर का वाढले हे विसरायला नाही पाहिजे. आप्पासारख्या व्यक्ति मोठया पदावर बसुन गेलेल्या आहेत. पदावर बसल्यानंतर याची जबाबदारी काय असते हे त्यावेळेला समजते. काम करणारा चुकतो, नाही करणारा चुकत नाही. आयुक्त साहेब तुम्ही नवीन आहेत. तुम्ही ज्या प्रमाणात प्रशासनावर आणि सर्वसामान्य जनतेवर अनाधिकृतपणे केलेल्या कामाच्या बाबतीत जी कारवाई केलेली आहे त्याबद्यल सर्वानी धसका घेतलेला आहे. आमच्या सुध्दा मनामध्ये शंका आहे. आम्हाला सुध्दा वाटत नाही अडचणीचे काम समोर यावे म्हणून. आमची सुध्दा अशी मानसीकता आहे की वाकडे तीकडे काम सांगू नका असे आम्ही लोकांना म्हणतो. परंतु जे झालेले काम आहेत त्यांना नियमांच्या चौकटीमध्ये बसवून ते कसे नियमित करता येतील यासाठी प्रयत्न करावा. कोणतेही चुकिचे काम राजआश्रय असल्याशिवाय होत नाहीत परंतु त्याला प्रशासनाची सुध्दा साथ असते. मी या सभागृहामध्ये दहा वर्षापासून आहे. योगेश बहल २० ते २५ वर्षापासून आहेत, आर.एस.कुमार ३० वर्षापासून काम करतात. या लोकांनी खुप उन्हाळे पावसाळे पाहिलेले आहेत. आता आप्पानी सांगीतले आहे आपण ज्या बिल्डींगमध्ये बसलो आहोत ती सुध्दा अनधिकृत आहे परंतु त्यावेळेस नगरपालिका असेल असे काहीतरी कारण असतील. याला पाठिशी सुध्दा घातले नाही पाहिजे. पालकमंत्र्यानी सुध्दा कारवाई करण्याचे आयुक्त साहेब आपल्याला आदेश

दिलेले आहेत. विकासाला कुठल्याही प्रकारची अडचण येता कामा नये असा सुध्दा त्यांचा दृष्टिकोन असतो हे विसरता कामा नये. या शहराचे औद्योगिकीकरण वाढले त्यामुळे निवासी घर वाढलेले आहेत. याठिकाणी येणारे नागरीक कशामुळे येतात हे सुध्दा बघितले पाहिजे. याठिकाणी रस्त्याचे जाळे खुप चांगल्याप्रकारे आहे. आपल्या पिंपरी चिंचवड मधील रस्त्याप्रमाणे इतर ठिकाणचे रस्ते विकसीत झालेले नाहीत. आपण नियोजन करुन, प्लॅनिंग करुन विकास का केला कारण आपल्या शहराचे मुल्य वाढावे, आपल्या शहराला चांगला चेहरा प्राप्त व्हावा म्हणून केलेले आहे. हे करत असताना केवळ अधिका-यांनी केले असे म्हणून चालणार नाहीतर त्याला चांगल्या राजकारण्यांची साथ होती म्हणून हे झालेले आहे. कुठल्याही चांगल्या, वाईट कामाला रथाचे दोन्ही चाक चांगले असतीलतर काम चांगले होतात. आपले शहर हे दोन, तीन नदीच्या मध्ये आहे. अनेक प्रकल्प अधिकृत, अनाधिकृत झालेले आहे. रेड लाईन आल्यानंतर हे समजले आहे. पुररेषा नदीच्या आजुबाजूला होती. २००४-०५ ला सगळयांना पुरपरिस्थिती आठवत असेल. आमच्या अजोबानी, पंजोबानी सुध्दा असा पुर पाहिलेला नाही. परंतु रेषेची बॉर्डर दिलेली आहे ती १०० टक्के चुकिची आहे. रेडलाईन, ब्ल्यू लाईनमध्ये आपलेच शहर का जाते इतर ठिकाणी सुध्दा पुर येतो. तुमची जबाबदारी नाही का रेडलाईन रिव्हाईज करुन आणायची. आपल्या शहरातील लोकांना त्रास होवु नये अशा सुधारणा तुम्ही करुन आणायला पाहिजेत. त्यासाठी आमची मंजुरी पाहिजे असेलतर ती आम्ही देऊ परंतु असे व्हायला नाही पाहिजे. मा.उपमुख्यमंत्री यांनी रेडलाईन, ब्ल्यू लाईनच्या बाबतीत स्वत: बैठक घेतलेली आहे. अधिकारी जबाबदारी घ्यायला तयार होत नाहीत. १०० टक्के जबाबदारी पीडब्ल्यूडीची आहे. मला वाटत नाही त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन केलेले आहे, नकाशा बघितला त्याप्रमाणे केलेले आहे. जागेवर ऑफिसमध्ये बसून ही रेषा आखलेली आहे. १२२ बांधकामाला परवानगी दिली असे सांगीतले ते अगोदरचे आहे. रेडलाईन, ब्ल्यूलाईनमध्ये ज्या परवानग्या द्यायला पाहिजे होत्या त्या दिल्याच पाहिजेत. ब्ल्यू लाईनमध्ये परवानगी देता येत नाही असे काहीच नाही. शेतक-यांचे प्लॉट निवासी भागामध्ये येत असतीलतर त्याला परवानगी दिली पाहिजे. ब्ल्यू लाईनमध्ये परवानगी देता येत नाही असे कुठेच नाही. त्या शेतक-यांचे प्लॉट निवासी भागामध्ये येत असतीलतर परवानगी दिली पाहिजे. तुम्ही परवानगी देत नाहीत म्हणून लोक अनाधिकृत बांधकाम करतात. अर्ध्या बांधकामाला सुध्दा परवानगी देत नाहीत. परंतु अर्ध्या एक्करला परवानगी देत असताना एक एक्करला परवानगी घेतात की काय असे वाटते. प्रशासनाचा नागरीकांवर बडगा दिसतो म्हणून लोकांनी अनाधिकृत बांधकाम केलेले आहेत. त्यांना भिती वाटते आयुष्याची पुंजी बांधकामामध्ये लावलेली असते. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी सुध्दा याबाबतीत विचार करुन निर्णय घेण्यास सांगीतलेले आहे. परंतु हे होत असताना आमच्या नागरीकांनी समोर जायचे पाप केलेले आहे का. आजपर्यंत झालेले चुकिचे काम नियमात बसवावे. दिड ते पावणेदोन लाख बांधकाम अनाधिकृत आहेत हे हायकोर्टाच्या निर्णयाला अधिन राहून निर्णय घ्यावा लागेल. उल्हासनगर सारख्या शहरात १०० टक्के पाडण्याची वेळ आली होती तसे तुम्ही करणार नाहीत. तशी वेळ तुम्ही येऊ देणार नाहीत. आयुक्त साहेब याचा तुम्ही विचार करावा. नदीपात्राच्या बाजुला मैलाशुध्दीकरण प्रकल्प केलेला आहे. २५० एमएलडी चा प्रकल्प आहे व २१० वर ट्रिटमेंट करतो असे आप्पानी सांगीतलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे १५० एमएलडी पाण्यावर ट्रिटमेंट केले जाते व उर्वरीत सर्व

पाणी नदीपात्रामध्ये सोडले जाते म्हणून नदी घाण आहे. ट्रिटमेंट केलेले पाणी उदयानामध्ये वापरतो व उर्वरीत आहे ते पाणी नदीपात्रामध्ये सोडतो. पुर्वीच्या पध्दतीत आणि आताच्या पध्दतीमध्ये काय फरक राहिला आहे. आता नदीपात्र एवढे घाणेरडे आहे की आपण स्वच्छ पाणी सोडतो की काय असे वाटते. १७ ते २० कोटी ट्रिटमेंट प्लॅनसाठी खर्च होतो हे पाण्यामध्ये घालवितो असे वाटते. पीडब्ल्यूडी, पीसीएमसी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची बैठक झालेली होती मी सुध्दा त्याठिकाणी होतो. आपण ट्रिट केलेले पाणी आहे एमआयडीसीला १०० एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे त्यांनी सांगीतले आम्ही इन्डस्ट्रीला पाणी देवू. त्यांच्या येथील दर २७ रु. प्र.ह.ली. याप्रमाणे झालातर हे पाणी वाचेल. एसटीपी प्लॅन आहे २०० ते २५० एमएलडी पाणी ट्रिट करतो हे पुर्ण झालेतर हा १०० टक्के फायदा होईल. दुबईला समुद्रामध्ये सिटि आहे त्याठिकाणी वापरले जाणारे पाणी रियुज करुन वापरले जाते. कारण त्याठिकाणी मुळातच पाण्याची कमतरता आहे. आपल्याकडे असलेल्या गोष्टी सुध्दा चांगल्या प्रकारे वापरल्या पाहिजेत. आपणही अनेक चांगल्या गोष्टी केलेल्या आहेत, स्वस्तात घरकुल दिलेले आहे. आम्ही जे करतो ते सर्वसामान्य नागरीकांसाठी करतो ते करत असताना आमच्या शब्दात बदल होणार नाही. बेस्ट सिटीचा पुरस्कार मिळालेला आहे यामध्ये सर्व लोकांचे सहकार्य आहे म्हणूनच आम्ही करतो, ते चुकिचे आहे आणि तुमचे बरोबर आहे असे म्हणणे चुकिचे आहे. बरेचसे काम नियोजन पध्दतीने केलेले आहे. पुढचे चित्र असे व्हायला नको की हे लोक ओरडले म्हणून कारवाई झाली आणि ते लोक ओरडले म्हणून कारवाई थांबली असे होऊ नये. शहराची मानसीकता तुमच्यावर अवंलबून आहे. त्यामुळे आयुक्त साहेब तुम्ही घेतलेले डिसीजन चुकले नाही पाहिजे. आपल्या शहराचा व्यवस्थित विचार करावा त्यानंतर या शहराची मानसीकता चांगली राहिल.

मा.बाबासाहेब धुमाळ :- मा.महापौर साहेब, ख-या अर्थाने आज समजले बाहेर काय आणि आत काय. आम्ही बाहेर असताना याठिकाणी काय झाले हे पेपरमध्ये समजायचे. आता असे वाटू लागले आहे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ब-याच इमारती बेकायदेशिर आहेत. कारण आप्पानी आता इतिहास वाचला त्याला कोणीही विरोध केला नाही. आप्पानी केवळ विरोध करायचा म्हणून हे मांडले नाहीतर यावर पठाणताई बोलल्या, प्रशांत शितोळे बोलले त्यावेळेस याठिकाणी पक्ष कोणीच मांडलेला नाही हे मला बरे वाटले. पाऊस का पडत नाही हे आज समजले कारण पाऊसासाठी नदीच राहिली नाही. परवा आम्ही चिंचवड गांवामध्ये यज्ञ केला त्यादिवशी पाऊस पडला परंतु तो कमी पडला आता परत यज्ञ करावा लागेल. पिंपरी चिंचवडच्या बाजुला पाऊस पडू नको परंतु नदी, धराणाच्या बाजुला पड असे म्हणावे लागेल. आयुक्त साहेब तुम्ही आलात त्यावेळेला मी पत्र दिलेले होते या नगरीमध्ये आपले स्वागत व तुमची कारकिर्द या शहराला आदर्शवादी घडो. गेल्या तीस वर्षाची घाण काढण्यासाठी या आयुक्तांचा वेळ जाईल त्यात तीन वर्षे कधी जातील हे समजणार नाही. हे काम करत असताना या महापालिकेमध्ये कशाप्रकारे काम चालतात हे प्रत्येक नगरसेवकाला माहित आहे. त्यांचे ऐकले जाते का त्यांना गप्प केले जाते. प्रत्येक विषय मांडताना त्याचा विचार करणे आवश्यक आहे. प्रश्नांचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे. पुररेषा कुठल्याही महापालिकेमध्ये नाही. विधानसभा, विधानपरिषदेमध्ये चर्चा होते आम्ही ऐकतो त्या

विषयाच्या प्रश्नाचे उत्तर दिले जाते त्याचे सकारात्मक उत्तर मिळेपर्यंत पाठपुरावा केला जातो. तसे येथील सर्व आमदार, खासदार यांना याठिकाणी बोलवावे सर्वांनी बसुन हे प्रश्न सोडवावेत. या शहराचा विकास करायचा असेलतर एकत्रित नियोजन करणे आवश्यक आहे. माझी एक इच्छा आहे या सभागृहाचे पावित्र्य सर्वानी राखणे आवश्यक आहे. विषय मांडतांना व त्यावर कारवाई करतांना त्यामध्ये वैयक्तिक कुठलाही स्वार्थ असता कामा नये. पुररेषेच्या बाबतीत याची श्वेतपत्रिका काढा. आप्पानी सांगीतलेले सर्वाना मान्य आहे. असे केलेतर चांगले होईल. मी गेल्या ४० वर्षापासून ट्रान्सपोर्टमध्ये काम करतो. बीओटी तत्वावर रस्ते केले त्यावेळेला मी सांगीतले होते एकच रस्ता, ब्रिज करा की तो बोपोडीपर्यंत करा. फॅारेनमध्ये असेच आहे. आपण बिल्डींगला परवानगी देतो परंतु तेवढे झाल्यानंतर संपले का, परवानगी घेतल्यानंतर ते व्यवस्थीत केलेले आहे का हे बघितले पाहिजे. आज कितीतरी वर्षे झाले पुर येत नाही मग पुररेषा कशासाठी. ज्यांच्या जागा जातात त्यांनाच समजते, त्या जागामालकांना पैसे मिळाले पाहिजे. अतिक्रमण तुम्ही केलेले आहे, शेतक-यांना बोलू शकत नाहीत. त्यांनी एखादे घर केलेतर ते तुम्ही पाडता. मग सर्व बेकायदेशिर जे घर बांधलेले आहेत ते सर्व पाडा, सांगवीपासून प्राधिकरणापर्यंतचे अतिक्रमण पाडा. पुढच्यावेळेस बोलण्यास मला जास्त वेळ द्यावा.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, आज याठिकाणी मा.श्रीरंग बारणे यांनी प्रश्न विचारले होते. नदी पात्रातील घरे बांधकामासंदर्भात, मैलासंदर्भात सभागृहासमोर प्रश्न उपस्थित केला. त्याअनुषंगाने सभागृहात चर्चा झाली आहे. त्यात प्रामुख्याने एक मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. मा.राजेंद्र जगताप यांनी मांडला आहे. पूररेषेचे डिक्लरेशन केले. त्यावेळी पिंपळे गुरव पासून रावेत पर्यंत, मोशी पासून तळवडे पर्यंत जागामालकांच्या, अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी यात जाणार आहेत. भविष्यकाळात या जागांचा उपयोग कशासाठी करता येणार नाही. अशा वेळी जागामालक तेथे अनधिकृत ॲक्टीवीटीज् सुरु करतो. पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही राज्यातील एकमेव महापालिका आहे जिने स्वत:हून पूररेषा आखणीची मागणी केली आहे. यातून लोकांवर अन्याय केला आहे. मुंबईला यासंदर्भात अशा प्रकारची पूररेषा आखण्याचा विषय कधीच सभागृहात आला नाही. पुणे मनपात सुद्धा पूररेषा नाही. आपण पुढाकार घेऊन आपल्या लोकांवर अन्याय करतोय. अशा पद्धतीने अन्याय करत असताना आपण नवीन आहात. आयुक्त साहेबांनी दबंगच्या सलमान खानप्रमाणे एंट्री चांगली केलेली आहे. पण कुठेतरी चांगल्या गोष्टी तपासून पाहील्या पाहिजेत. १२० बांधकामांना पूररेषेत बांधकाम करायला आपल्याकडून परवानग्या दिलेल्या आहेत. बिल्डींग परमिशनची कशाप्रकारची चूक आहे. प्लॅन पास केले गेले, नियमाने बांधकामे केली गेली. त्यानंतर पूररेषेचे डिक्लरेशन केले गेले. आपण लोकांवर अशाप्रकारे अन्याय करतोय. अशी भूमिका योग्य होणार नाही. बांधकामाला परमिशन देताय हे ठिक आहे. ॲक्विझिशन केले नाही म्हणून त्या जमिनीचा उपयोग करुन घेता येतो. मा.श्रीरंग बारणे यांनी मुद्दा मांडला. त्याठिकाणचे सदस्य बोलतात. पिंपरी चिंचवड शहराचा विकास सगळ्यांच्या डोळ्यासमोर झालेला आहे. चांगल्या गोष्टींचे श्रेय सगळे घेतात, काही चूकले तर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नावाने ओरडतात. आपण अतिशय चांगला मुद्दा मांडला. आपण याची काळजी न करता पिंपरी

चिंचवडमधील निर्देशित वॉर्डातसुद्धा काम केले जाते. वर्जित क्षेत्रात सुद्धा कामे केली जातात. लोक अनधिकृत बांधकामे का करतात? इथे ८०% अनधिकृत बांधकामे आहेत मग कारवाई करताना याचा अभ्यास केला पाहीजे. पुणे, ठाणे मनपांत मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे वाढली आहेत. इथे एम.आय.डी.सी. मोठ्या प्रमाणात आहे. कामगार देशाच्या कानाकोपऱ्यातून रहायला येतात. हक्काचे घर असावे ही त्यांची भावना असते. अशावेळी अनधिकृत घर घेण्याशिवाय त्यांच्यापुढे पर्याय नाही. आपल्याकडे एक दीड गुंठ्यांची मोजणी करण्यासाठी अख्ख्या सर्वे नंबरची मोजणी करावी लागते. सामान्य माणूस हा खर्च करु शकत नाही. एन.ए. कशासाठी पाहीजे आहे. इथून पुढील काळात महापालिकेतूनच एन.ए. दिले जावेत, ते लवकर काढता येतील. आत्ता सुद्धा किती हेलपाटे मारावे लागतात. डी.पी. प्लॅनमध्ये रेडझोन दाखवला आहे. अधिकृत बांधकाम करीत आहोत, असे असताना एन.ए.साठी फाईल जाते. क्लीन नाही म्हणून अधिकारी शोधतात. रहिवासी झोनमध्ये येते. येथे ही मुळात पिळवणुक आहे. २००४ पर्यंतचे आहेत. डी.पी. प्लॅन नंतर सॅन्क्शन केला. हीच परिस्थिती चिंचवड, तळवडे, भोसरी इथे आहे. हजारो एकर जमिनी पडलेल्या आहेत. घरे बांधता येत नाहीत. अशा वेळी प्रशासनाकडून अपेक्षा आहे. तुमची भूमिका महत्वाची आहे. दुसऱ्या बाजूने आपली बांधकामे कशी अधिकृत होतील, नियमांत शिथिलता कशी होईल अशी भूमिका घेतला पाहीजे. लोकांची घरे अधिकृत कशा पद्दतीने करता येतील अशी विनंती करतो. सगळ्या नगरसेवकांची हीच भावना आहे. अधिकारी नोटीस देणार. असे कळाले पाहीजे जोपर्यंत नावावर होत नाही, तोपर्यंत विनामंजूरी उल्लेख पाहिजे. १२,००० बांधकामे अधिकृत करण्याचा आमचा प्रयत्न आहे. आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचा हा विचार आहे, भूमिक आहे. आदरणीय पवार साहेब सगळ्यांचे नेते आहेत. शहरातील गोरगरीबांची बांधकामे देखील अधिकृत करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न चालू आहेत. म्हणजे जोपर्यंत निर्णय होत नाही, तोपर्यंत शासनाची पूर्वीची जी काही पात्रता आहे, नियम आहेत, त्या तारखेपर्यंत कोणत्याही प्रकारे निकष जागेला लावु नये, ही कार्यवाही पुढील काळात प्रत्यक्षात मंजूर करावीत. दुसरीकडे बांधकामे अधिकृत कशी होतील, नियमात शिथिलता येईल. अनेक अडचणी निर्माण होत आहेत. आपल्या शहरात १०/१२ रस्त्यांवर BRT टाकली आहे. रस्त्यांवर अधिकृत बांधकाम करता येत नाही. त्याठिकाणी जागा मालकाला अधिकृत बांधकाम करता येत नाही. जेव्हापासून डिक्लरेशन केले आहे, त्या तारखेपासून आजपर्यंत किती प्लॅन्स् सॅंक्शन झाले. आमच्यामुळे अनधिकृत बांधकामे पडणार आहेत. नियम सुट्टे करा. फ्लड लाईनबाबतीत शासन स्तरावर बैठक घ्यावी. ३ आमदार, महापौर, पक्षाचे नेते मा.योगेश बहल यांनी मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करावेत. आदेश द्यावा अशी विनंती आहे. चांगल्या कामाची सगळे कड घेतील, चुकीचे झाले तर आमच्यावर येईल. म्हणून सगळ्यांना विश्वासात घेऊन कामे करावीत. आपापसांत सहाय्य करण्याच्या दृष्टीकोणातून काम करावे. आपण या संदर्भात ताबडतोब बैठक लावावी अशी विनंती आहे.

मा.कैलास कदम :- मा.महापौर साहेब, आप्पानी शहरामधील मुद्दे मांडलेले आहेत. विलास नांदगुडे यांनी मुद्दा मांडलेला आहे. या सभागृहामध्ये माहिती देण्यात आलेली आहे याठिकाणी १२२ बांधकामांना परवानगी दिलेली आहे. या परवानग्या देत असताना

आपल्याला तशा परवानग्या देता येतात का. ही औद्योगिकनगरी आहे, या औद्योगिकनगरीमध्ये अनेक कामगारांनी एक ते अर्धा गुंठा जागा घेवून त्यांच्या प्रपंचाचा उदरनिर्वाह करतात. आपण आल्यानंतर कारवाई सुरु केलेली आहे. याठिकाणी रेडलाईनमध्ये बांधकाम येत असल्यामुळे अनाधिकृत बांधकामावर कारवाई करतो हे ठिक आहे परंतु याठिकाणी आपला मुलगा आणि दुस-याच कारट अशा पध्दतीने करु नये. याठिकाणी केमिकल कंपन्याचे नाले पवनानदी मध्ये मिळालेले आहेत असे सांगीतले. मोठे नाले २२ आहेत व छोटे नाले १० आहेत असे एकूण ३२ नाल्याची आकडेवारी दिलेली आहे. महापालिका अस्तित्वात येण्याच्या अगोदरची ही आकडेवारी आहे का. ज्यावेळेला अस्तित्वात आली त्यावेळेसची आकडेवारी वेगळी आहे. ही आकडेवारी चुकिची सादर केलेली आहे. ड्रेनेजचे पाणी पवनेमध्ये जाते त्याठिकाणी आपण स्काडाची प्रणाली आणलेली आहे हे काय आहे याबाबतीत सर्व सदस्यांना माहिती दिली पाहिजे ते त्याठिकाणी कशासाठी आणलेले आहे. रावेतच्या बंधा-याची मी पाहणी केली, आपल्याला पत्र दिलेले आहे, मी त्याठिकाणी गेलेलो होतो. त्याठिकाणी बंधा-याला अनेक तडे गेलेले आहेत, त्याठिकाणी बाजुला मैलाशुध्दीकरणाची पाईपलाईन गेलेली आहे. त्याठिकाणी एक दिवसाचा साठा उपलब्ध होईल एवढेच नियोजन आहे. त्या बंधा-याची उंची वाढविलीतर दोन-तीन दिवसाचा साठा निर्माण होईल. तो बंधारा वाहून गेलातर काय परिस्थिती होईल. इंद्रायणी नदीपात्रामध्ये कोल्हापुर पध्दतीचा बंधारा बांधलातर पाण्याची कमतरता कमी होईल. पिंपरी चिंचवड शहर हे औद्योगिक नगरी आहे. याठिकाणी जास्त कर मोठयाप्रमाणात औद्योगिक नगरीच्या माध्यमातून, कामगारांच्या माध्यमातून प्राप्त झालेला आहे त्यामुळे जे आपण कारवाई करतो त्यासाठी सर्वांना विश्वासात घेवून करायला पाहिजे. मा.मुख्यमंत्री यांना सुध्दा आम्ही विनंती केलेली आहे, त्याबाबतीत निश्चित काहीतरी तोडगा निघेल, तरी आपण थोडा वेळ द्यावा आणि आकसपणे कारवाई करु नये एवढीच विनंती करतो. आपण निश्चित हे ऐकूण घेतलेले आहे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, आप्पाचे मी अभिनंदन करतो. ८६ चे एन.आर.शिंदे यांची आठवण येते. नांदगुडे यांनी प्रश्न विचारलेला होता, उपसंचालक यांनी सांगीतले मी माहिती घेवून सांगते. हे चुकिचे उत्तर आहे. उपसंचालक यांच्याकडे तीन ठिकाणचा चार्ज आहे. नाशिक, पुणे आणि याठिकाणचा त्यांच्याकडे चार्ज आहे. नाशीक मध्ये अशी अशी परिस्थिती आहे असे सांगीतले पाहिजे. माहिती घेवून सांगते असे उत्तर बरोबर वाटत नाही. अधिका-यांनी उत्तर देतांना हे सभागृह आहे हे समजून उत्तर द्यावे. रेडलाईन बद्यल गेले अनेक वर्षे चर्चा करतो, प्रशासनाचे धोरण काय आहे हे समजत नाही. नगररचना विभाग सांगते स्थापत्य विभाग आणि स्थापत्य विभाग सांगते नगररचना विभाग. या चार-पाच महिन्यामध्ये रेडलाईन, ब्ल्यू लाईनची माहिती दिलेली नाही. प्रमोटेड आयएएस चर्चा करु म्हणतात आणि डायरेक्ट आयएएस डायरेक्ट निर्णय घेतात. हे अनधिकृत बांधकाम एक दिवसामध्ये होत नाही त्यासाठी एक ते दिड वर्षे लागतात. हे बांधकाम होतांना अधिकारी काय करत होते. १२२ बांधकामाची माहिती दिलेली आहे त्यापैकी चार बांधकामाचे कम्प्लेशन सर्टिफिकेट आहे. बाकीचे बांधकाम झालेले आहेत परंतु कम्प्लेशन सर्टिफिकेट का दिलेले नाही. २००७ ला

परवानगी दिली, २००९ ला रेडलाईन्स आली नंतर बिल्डर्सने नुतनीकरण केलेले आहे का, नुतनीकरण केलेले नसेलतर, बांधकामाचा अवधी एक वर्षे आहे त्यानंतर रेन्युअल करायला पाहिजे असा नियम आहे. आपले अधिकारी सांगतात ते बरोबर बांधकाम करतात, ते त्यांचा फायदा घेणार. आज सुध्दा प्रशासनाचे काय धोरण आहे हे माहिती नाही. तुम्ही सांगावे या रेडलाईन मध्ये आम्ही बांधकाम करु देणार नाहीत, हे करताना कोणालाही विश्वासात घेतलेले नाही. आणि म्हणून याबद्यल पॅालीसी डिसीजन घ्यावे. याबद्यल निर्णय घ्यावा लागेल. आम्हांला कम्युनिकेशन करायला लागेल. रथाची दोन चाके असतात, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी. हे दोन्ही चाके बरोबर चालली पाहिजेत. अनेक ठिकाणी कम्युनिकेशन गॅप असतो. अनधिकृत बांधकाम करण्यासाठी सुरवात केलेली आहे प्राधिकरणामध्ये आम्ही अधिकृत बांधकाम केलेले आहे आता ते रेडझोनमध्ये आलेले आहे त्यावर कोण जबाबदार आहे. त्यावेळेला प्लॅन पास केला आणि आज सांगतात रेडझोनमध्ये आहे, कम्प्लेशन सर्टिफिकेट देणार नाही त्या अधिका-यावर काय कारवाई करणार. त्यांना रेडझोन आहे हे माहिती होते मग प्लॅन पास का केला. गरीबांचे स्वत:चे घर असावे असे स्वप्न असते. शासन आणि प्राधिकरण आपल्या डयुटीमध्ये फेल झालेले आहे म्हणून अनधिकृत बांधकाम झालेले आहे. गरीब नागरीकांनी जागा घेवून बांधकाम केले त्यावेळेला तुम्ही बघितले नाही का. बांधकाम सुरु केल्यानंतर ५०-५० हजार लोकांनी दिले आहे त्यानंतर हे अनधिकृत बांधकाम झालेले आहे. त्यावेळेलाही पदाधिकारी, अधिकारी होते मग ते आता पाडण्यामध्ये काय अर्थ आहे. आपण या नागरीकांचे घर अधिकृत करुन द्यावे. १ लाख ८० हजार लोकांचे घर रेग्युलर करणार असे जाहिरनाम्यामध्ये दिलेले आहे. याना १००-२०० अशी काहीतरी पेनल्टी लावा परंतु हे अधिकृत करा. यातुन मार्ग काढावा. आपण लोकांसाठी काहीतरी करायला पाहिजे. त्यांच्यासाठी काम करताना त्यांना जेवढे वाचविता येईल तेवढे वाचविले पाहिजे. अनधिकृत काम पाडण्यास सुरवात केलेली आहे. इतर गोष्टीत १० टक्के वाटप आहे, टेंडरमध्ये २ टक्के वाटप आहे. तुमच्या अगोदर दोन आयुक्त होते त्यांनी ४० कोटीचे काम व ७३ कोटी वाढीव दिलेले आहे, १४ कोटीचे काम त्याला २८ कोटी वाढीव दिलेले आहे आणि निघुन गेलेले आहेत. मी इन्क्वॉयरी मागीतली ती नील आली त्याचा जीबीला रिपोर्ट आला नाही. ४० चे ७३ कोटी होऊ शकतात का. जे.ई.ला तुम्ही झापता तो रोज बारा तास कामावर उभे राहतो. टक्केवारीमध्ये सुध्दा कमी आहे वरचा अधिकारी जास्त आहे. काही चुक झालीतर कर्मचा-यांना सस्पेन्ड आणि वरच्यांना तसेच ठेवता. जेई ला नोटिस दिलेली आहे असे ऐकण्यात आलेले आहे. ते बांधकाम पाडणार का डेव्हलपमेंटचे काम करणार. इंजिनिअर लोकांचे काम विकास करायचा आहे. अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी स्वतंत्र विभाग करावा. गरीब लोकांचे बांधकाम पाडु नका. गरीब लोक सोने विकून, पीएफ मधील लोन काढून, नातेवाईकाकडून कर्ज घेवून घर बांधतो आणि ते आपण पाडलेतर तो माणुस पुर्ण बरबाद होईल. वरच्या माणसाला पनीशमेंट मिळत नाही, खालच्यांना मिळते. आपल्याकडे चुक झालीतर जे.ई.ला धरायचे असे चालते. मी ९६ ला महापौर होतो मी एक तक्रार केलीतर त्यावेळेला चार जे.ई.ला सस्पेन्ड केले होते ते योग्य नाही.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, आप्पानी चांगल्या विषयाला सुरवात केलेली आहे. यामध्ये अजून दोन-चार प्रश्न विचारले असतेतर त्यामध्ये सत्तारुढ पक्षाची बाजु स्पष्ट झाली असती. ते तुम्ही का विचारले नाही हे समजले नाही. १२२ बांधकामास परवानगी दिलेली आहे, त्याच्यावर ऊहापोह झाला. ९९ नंतर अचानक पुररेषा आली त्याबद्यल बोलले गेले. आणखी दोन-तीन प्रश्न आप्पानी विचारले असतेतर पीतळ उघडे पडले असते. मला विनंती करायची आहे की आपण नगररचनेच्या भदाणे मॅडमला बोलवावे. या महापालिकेचे आयुष्य फार मोठे नाही. थोडया दिवसा मधुन खुप मोठी जबाबदारी अनुभवलेली आहे. या महापालिकेचा ७८ साली पिंपरी चिंचवड नवनगर पालीका म्हणून जन्म झाला त्यावेळेला पाच गांव होते. आकुर्डी, भोसरी, चिंचवडगांव, पिंपरी, कासारवाडी असे गाव होते. त्यानंतर १२ नवीन गांवाचा समावेश झाला. ७८ साली डीपी झाल्यानंतर बीरचशी हद्यवाढ झाली त्यामध्ये १२ गाव आले आणि १९८२ साली महापालिका झाली. त्यानंतर नवीन गाव ॲड झाली व नवीन डीपी करण्याचे महापालिकेनी ठरविले. या शहराचे सिटी इंजिनिअर हे डेव्हलपमेंट होल्डर होते. आताचे सर्व आमदार या सभागृहामध्ये होते. या महापालिकेला ८२ पासून ९१ पर्यंत ९ वर्षे डीपी पब्लिश करण्यासाठी लागले. ९१ ला एमआरटीपी हा प्लॅन ३७ प्रमाणे पब्लिश करुन शासनाला सबमीट केला. ९५ पासून आजपर्यंत १२२ परवानग्या दिलेल्या आहेत. बिल्डींग परमिशन अधिका-यांनी काही चुकिचे काम केलेले नाहीत. नियमाना परवानगी दिली त्यानंतर पुररेषेमध्ये नदीलगत ज्या लोकांनी कोणीच परवानगी घेतलेली नाही, १०० टक्के बांधकाम केले अशाप्रकारचे बांधकाम पाडावेत असा निर्णय मुख्यमंत्र्यांनी दिलेला आहे त्याला आम्ही सुध्दा संरक्षण देत नाहीत. सर्व नियमांने, कायद्याने काम करत असताना आज महापालिकेमध्ये नियम, कायदा धाब्यावर ठेवून काम करतो असा आरोप आहे. डीपी प्लॅनला ३१ प्रमाणे शासनाकडून मंजूरी दिलेली आहे त्यामध्ये मॉडीफिकेशन करायचे असेलतर या महापालिकेची परवानगी घ्यायला पाहिजे ती परवानगी घेतलेली आहे का. जुन्या हद्यीमध्ये अंमलबजावणी करत असताना सभागृहाची परवानगी घेतली का, असे कायद्याने करता येते का. हे कोणत्या कायद्याखाली तुम्ही करता ते कलम सांगावे. कोणत्या कायद्याने तुम्ही आमची परवानगी थांबवली हे सांगावे. जुन्या हद्यीमधील परवानगी कोणत्या कायद्याने थांबविली आहे. नवीन गावचा प्लॅन सबमीट केला आम्ही दादांच्या मागे लागलो, जुन्या गावातील ग्रामपंचायत, नगरपालिका त्यावेळेसचे नियम वेगळे, महापालिकेचे नियम वेगळे त्यामुळे शेतकरी असतील त्यांनी स्वत:च्या जागेमध्ये ग्रामपंचायत, नगरपालिका असताना बांधलेले घर असतीलतर ते आपण बेकायदेशिर म्हणतो. ७० टक्के बांधकाम शहरात अनधिकृत आहे परंतु ते त्यांच्या जागेवर आहेत. नदीपात्रामधील, रस्त्यावरील बांधकाम काढले हे समजू शकतो परंतु आपणतर त्यांच्या जागेवरचे बांधकाम काढतो. सत्ताधा-यांनी काय दिले हे शहर व राज्य पाहते आहे. गरीबांनी घर बांधावेत असे कोणाला वाटत नाही. बिल्डर्सचे पाडलेतर ते पाडा त्यांना संरक्षण कोणी देणार नाही. यासाठी आपण सहा.आयुक्तांची नेमणुक करावी त्यांना वेगळा असा स्टाफ द्यावा. आता चार वॉर्डाचे सहा वॉर्ड करणार आहोत. सहा ठिकाणी सक्षम अधिकारी द्यावेत. या कामामध्ये जे.ई. कार्यकारी अभियंता यांना देऊ नका. हा विभागच वेगळा केला पाहिजे व तो सक्षम करा. तुम्ही आता ॲक्शन घेण्यासाठी सांगीतलेले आहे एक, दोन, तीन मजली गरीबांचे घर पाडले गेलेतर त्यांचे जीवनच उध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही. आमची

आपल्याला, आयुक्तांना विनंती आहे की तुम्ही अधिका-यांना अशाप्रकारच्या सुचना द्या की नवीन अनधिकृत बांधकाम प्लीनथला चालू आहे, कॉलम चालू आहेत ते १०० टक्के पाडा, अनधिकृत बांधकाम करु देऊ नका. आम्ही सुध्दा तेवढेच जबाबदार आहोत जेवढे अधिकारी जबाबदार आहेत. माणूसकीच्या दृष्टिने लाईट, पाणी द्यावे असे आम्हीच ंसागीतलेले आहे. आमची विनंती आहे की येथून पुढे नदीपात्रामधील १०० टक्के अनधिकृत बांधकाम पाडले पाहिजे परंतु वॉर्डामधील लोक येथून पुढे अनधिकृत बांधकाम करत असतीलतर ते तोडा. मागचे काढायला लागलेतर संपुर्ण शहर साफ करावे लागेल. २००९ मध्ये नवीन गावचा डीपी पब्लिश झालेला आहे. शासनाने नवीन हद्दीचा डीपी प्लॅन डिक्लेअर केला. ब्ल्यू लाईन आणि रेड लाईन मधील आरक्षण लोकांना अचानक समजले. हे सर्व रिझर्व्हेशन नवीन अधिकारी नेमून पुन्हा हेअरींग घेतलेले आहे. ते रिपब्लिश करण्याची आवश्यकता का भासली. अर्ध्या अर्ध्या गुंठयाचे प्लॉट असतीलतर व रेड लाईन्स असेलतर १०० टक्के शहर बकाल झाल्या शिवाय राहणार नाही. ग्रामपंचायतीच्या काळात झालेले घरे, नगरपालिकेच्या काळात झालेले घरे, महापालिकेमध्ये आल्यानंतर हे घरे त्या परिस्थितीमध्ये अधिकृत आहेत. जोपर्यंत रेव्हेन्यू विभाग नियमामध्ये बदल करत नाही तोपर्यंत या देशातील कोणतेही आयुक्त अशाप्रकारचे बांधकाम थांबवू शकत नाहीत. इतर जागेचे खरेदीखत होते आणि गोरगरीबांनी अर्धा, एक गुंठा जागा घेतलीतर त्या जागेचा एन.अे. होत नाही. ज्यां लोकांनी निवासी भागामध्ये घर बांधले आहेत त्यांचा एन.अे. होत नाही. त्यापुर्वी वहिवाटीची मोजणी व्हायची ते आता बंद केलेले आहे. एक, दिड गुंठा जागा घेतलीतर पुर्ण हेक्टरचे पैसे भरावे लागतात त्यावेळेला एन.अे. होतो त्यामध्ये त्यांचे पुर्ण घर बांधले जाते. त्यामुळे लोक अनधिकृत बांधकाम करतात. आपला कायदा विचीत्र आहे त्यामुळे लोकांची अशी घरे झालेली आहेत. लोकांचे घर उध्दवस्त करण्यासाठी आपण याठिकाणी आलेलो नाहीत. येथून पुढे अनधिकृत बांधकाम होणार नाही याची काळजी घ्यावी. लोकांना टिडीआर लोडींग करुन देत नाहीत, कम्प्लेशन देत नाहीत हा कोणता कायदा आहे. दोन महिन्यापुर्वी पुणे महापालिकेला खराडी, नवीन हद्दीचा डीपी प्लॅन आलेला आहे. त्यामध्ये ब्ल्यु लाईन आणि रेडलाईन कुठेही नाही. त्याठिकाणी डीपी प्लॅनची अंमलबजावणी होते, आमच्याकडे आमचे अधिकारी घाबरुन काहीच करत नाहीत त्यामुळे आमचे शहर बकाल होते. पहिला इतिहास पाहिलातर नदीच्या काठेवर घर बांधलेले आहेत. पुर्वी २५ ते ३० मी. चा पट्टा असायचा त्याप्रमाणे काहीतरी करा आणि येथून पुढे अनधिकृत बांधकाम होणार नाही हे बघावे. ब्ल्यू लाईन, रेड लाईन नदीपात्रामध्ये किती एफएसआय असावा याबाबत युडी कडून पत्र आले, अविनाश पाटिल यांनी डायरेक्टरला पत्र पाठविले आहे. त्यांनी असे पत्र लिहिलेले आहे, “असे मत आहे” असे त्यात लिहिले. कलम १५४ खाली डायरेक्शन आलेले आहेत का. पुन्हा सभागृहामध्ये येवुन मान्यता घेवून शासनाला पाठवावे लागते तसे न करता ते सगळे धुळीत मिळवून आपले अधिकारी मनमानी कारभार करतात. आम्ही ओरडल्यानंतर जीबी पुढे प्रस्ताव आला. तो प्रस्ताव आम्ही फेटाळून लावला आणि सांगीतले सगळयांना एक एफएसआय द्यावा. एका घरामध्ये तीन भाऊ असतीलतर नदीपात्रामध्ये असेलतर अर्धा त्याच्यानंतर एक आणि त्याच्यानंतर दोन असा एफएसआय देणार आहेत. तुम्ही सामान्य

शेतक-यांचा विचार करावा. ज्यांची दहा ते पाच एक्कर जागा असेलतर डायरेक्टरने पत्र पाठविले आणि तुम्ही त्याची अंमलबजावणी करायला सुरवात केली आहे.

मा.आयुक्त :- मा.महापौर महोदया, सदस्यांनी जे मुद्दे मांडले त्याचे संक्षीप्त उत्तर देतो. तीन ते चार मुद्दे आलेले आहेत. अनधिकृत बांधकाम पाडली जातात त्याबाबतचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या अनुषंगाने वस्तुस्थिती मांडणे आवश्यक आहे. मारुती वंजारी व महाराष्ट्र सरकार यांच्या मधील याचिकेवर शहरातील अनधिकृत बांधकामासंदर्भात ३ फेब्रुवारी २०११ रोजी सहा महिन्यात कार्यवाही करण्याचा उच्च न्यायालयाने निर्णय दिला. दि. १८ मार्च २०११ रोजी याच विषयावर शहरातील सर्व बेकायदा बांधकामे उल्हासनगर महापालिकेच्या धर्तीवर नियमित करण्याचा ठराव या सभागृहाने केला. दरम्यानच्या काळामध्ये आयुक्तांनी, कोर्टाने दिलेली ६ महिन्यांची मुदत संपली असल्यामुळे व ही कारवाई करण्यासाठी मोठा मनुष्यबळ कर्मचारी वर्ग वापरावा लागणार असल्याने त्यामध्ये नियमित कामामध्ये अडथळे होत आहे. याबाबत शासन पातळीवर निर्णय होऊन इकडे कळवावे असे सांगीतले. त्याबाबत शासनाकडून असा अनुकूल निर्णय अद्याप झालेला नाही. माजी महापौर यांनी उल्लेख केला त्याप्रमाणे ती मिटिंग मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली २९ नोव्हेंबर २०११ ला झाली होती. त्या बैठकीस मा.उपमुख्यमंत्री अजित पवार, मा.सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील, मा. आ. विलास लांडे, मा.आ. लक्ष्मण जगताप, मा.आ. अण्णा बनसोडे, तत्कालीन महापौर, विभागीय आयुक्त, तत्कालीन आयुक्त आणि इतर अधिकारी होते. दि. २९/११/२०११ च्या बैठकीमध्ये जो निर्णय झालेला आहे तो मी वाचून दाखवितो.

(दि.२९/११/२०११ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील निर्णयाच्या पत्राचे वाचन केले.) त्यानंतर मार्च १२ मध्ये एमआरटीपी व बीपीएमसी ॲक्ट मध्ये ॲमेन्डमेंट झालेली आहे. अनधिकृत बांधकाम झालेतर संबंधितांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी असा विधी मंडळाने ठराव केलेला आहे. यामध्ये अनेक सदस्यांनी आपल्या बोलण्यामध्ये सांगीतले, ३१ मार्च २०१२ पुर्वी झालेल्या बांधकामाबाबतचा प्रस्ताव शासन दरबारी पाठविलेला आहे त्याचा विचार त्याठिकाणी चालू असल्यामुळे जुन्या बांधकामाबाबत महापालिकेनी निर्णय घेवू नये असे निवेदन सन्मा.सदस्यांनी केलेले आहे. त्याबाबतीत संबंधीत विभागाला जे निर्देश दिलेले आहेत ते मी सांगतो. ३१ मार्च २०१२ पुर्वीचे बांधकाम पाडण्याचे आदेश दिलेले नाहीत कारण तो प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे त्यामुळे ३१ मार्च २०१२ पुर्वीच्या बांधकामाबाबतचा आता निर्णय घेतलेला नाही. त्याबाबत शासन जे निर्णय घेईल त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल. १ एप्रिल २०१२ नंतर आता जे बांधकाम चालू आहे, ज्या इमारतीमध्ये एकही कुटूंब राहिला गेलेले नाही असेच बांधकाम पाडण्याचे आदेश दिलेले आहेत. आता छोटया बांधकामावर कारवाई होते व मोठया बांधकामावर कारवाई होत नाही असे सांगीतले परंतु वस्तुस्थिती तशी नाही. आमच्याकडे मोठे अनाधिकृत बांधकाम पाडण्याची यंत्रणा नाही. तीन दिवसापुर्वी आपण पेपरमध्ये वाचलेले असेल, काळेवाडीमध्ये इमारत पाडली ती पाडताना पोकलेन चालकांस रिस्क पत्कारावी लागली. जी+३ पर्यंतचे बांधकाम आपण पाडू शकतो परंतु आज अनेक ठिकाणी जी+५,६ इमारतीचे बांधकाम चालू आहे. उंच इमारती पाडण्याचा आम्ही अभ्यास केलेला आहे. मुंबई, नागपूर मध्ये अशा इमारती पाडण्यासाठीच्या एजन्सीज आहेत. त्याबाबतचे

टेंडर फायनल करुन ते तंत्र मागविणार आहोत. हे मी ३१ मार्च २०१२ च्या अगोदरचे बोलत नाही. मार्च १२ मध्ये  अनधिकृत बांधकाम झालेतर संबंधीतांना जबाबदार धरण्यात यावे अशी तरतूद केलेली असल्यामुळे  अनधिकृत बांधकाम झालेतर संबंधित अधिका-यावर कारवाई होईल व ते भुषणावह होणार नाही. त्यामुळे यापुढे होणारे अनधिकृत बांधकाम आपल्याला थांबवावे लागणार आणि वाढीव मुदत मागावी लागेल. ३१ मार्च १२ पुर्वीच्या बांधकामाबाबत तत्कालीन महापौर, आयुक्त यांनी प्रयत्न केलेले आहेत त्याबाबतीत आम्हीही प्रयत्न करु परंतु आज जे बांधकाम चालू आहेत ते काढावे लागतील.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, ३० ते ४० हजार मिळकती आहेत त्याची नोंद पुर्वलक्षीत करु शकत नाहीत मग त्या सर्व मिळकती अनधिकृत धरणार का.

मा.आयुक्त :-  मा.महापौर महोदया,  छोटया बिल्डींगच्या बाबत मी सांगत होतो मोठया बिल्डींग पाडण्याचे तंत्र महापालिकेकडे आता  नसल्यामुळे सुरक्षीत तंत्राचा अभ्यास करुन त्याचे टेंडर एक आठवडयात प्रसिध्द करत आहोत. ३१ मार्च १२ नंतरची कारवाई चालू आहे. त्या इमारतीमध्ये कुठलेही कुटूंब वास्तव्यास नाही अशा इमारतीवर कारवाई करणार. पदनिर्देशीत अधिकारी नेमावे असे मार्च १२ ला सांगीतलेले आहे व कायद्यामध्ये तशी तरतूद केलेली आहे, असे अधिकारी महापालिकेस नेमायला पाहिजेत. ठाणे, पुणे महापालिकेनी केलेल्या कारवाईचा सखोल अभ्यास करुन आपल्या येथे तसे अधिकारी नेमलेले आहेत. ज्यांच्या ऐरियामध्ये अनधिकृत बांधकाम झालेतर त्याला जबाबदार वॉर्ड ऑफिसर,एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, डेप्युटी इंजिनिअर, ज्यू.इंजिनिअर हे राहतील. यांनी ही जबाबदारी पार पाडली नाहीतर त्यांच्यावर कारवाई करण्याचे शासनाने आदेश दिलेले आहेत. त्यामुळे प्रशासनाला कारवाई करणे  भाग आहे. महापालिका ही रथाची दोन चाके आहेत ही दोन्ही चाके योग्य पध्दतीने चालणे आवश्यक आहे त्यामुळे ही भूमिका नाईलाजास्तव घेणे आवश्यक आहे. मिळकती बाबत सन्मा.सदस्य बारणे यांनी प्रश्न विचारला. आपण हे तीन-चार दिवसापुर्वी विचारलेले आहे त्याची माहिती काढणे चालू आहे. ३१ मार्च १२ नंतर जे नवीन अनधिकृत कामे चालू आहेत पुर्वी त्या इमारती अस्तित्वात नव्हत्या व ज्याला महापालिकेची परवानगी घेतलेली नाही एवढयाच बांधकामाबाबत निर्णय घेतलेला आहे. मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली त्यात आपले लोकप्रतिनिधी  हजर होते.

मा.धनंजय आल्हाट :- मा.महापौर साहेब, ३१ मार्च १२ नंतर ब-याचशा मिळकतीची नोंद झालेली नाही त्याबाबतीत काय धोरण आहे.

मा.आयुक्त :- मा.महापौर महोदया,  आता ज्यांचे बांधकाम चालू आहे आणि त्यांनी बांधकाम करण्यासाठी महापालिकेची परवानगी घेतलेली नाही एवढयाच इमारतीची यादी केलेली आहे.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहब, हे फक्त आपल्याच महापालिकेत आहे का इतर महापालिकेचे काय धोरण आहे.

मा.आयुक्त :- मा.महापौर महोदया,  ज्या ज्या ठिकाणी अशा पध्दतीची गंभीर परिस्थिती आहे त्याठिकाणी कारवाई करणे भाग आहे. आपल्याकडे जी बाब निदर्शनास आलेली आहे त्याकडे डोळेझाक करणे योग्य नाही.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, राज्यात इतर ठिकाणी होत असेलतर याठिकाणी झाले पाहिजे.

मा.आयुक्त :- मा.महापौर महोदया, आपल्या बाबतीत कोर्टाने स्पेसिफिक डायरेक्शन दिलेले आहेत ती मुदत उलटून गेलेली आहे. ही केस आपल्या महापालिकेपुरती आहे. उच्च न्यायालयाने स्पेसिफिक पिंपरी चिंचवड महापालिकेला दिलेले निर्देश आहेत.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, तुम्ही वाचून दाखविले त्या दोन-तीन मिटिंगला मी सुध्दा होतो. आपल्या येथील लोक कोर्टात गेल्यामुळे आपल्या येथील महापालिकेसाठी हे आदेश दिलेले आहेत परंतु धोरणात्मक निर्णय व्यापक स्वरुपाचा आहे. याच्यामध्ये कटऑफ डेट ३१ मार्च नंतरची दिलेली आहे. आम्ही सुध्दा मदत करतो त्यामुळे हे बांधकाम होत असते ३१ मार्च कटऑफ दिलेली तेव्हा पासूनच हे इम्प्लीमेंटेशन केले असतेतर हे थांबले असते. ३१ मार्च नंतर लोकांनी एक-दोन स्लॅब टाकलेले ते थांबवावे असे म्हणलेतर आम्ही तुमच्या बरोबर आहोत परंतु आता ते लोक प्लास्टर करतात आणि तुम्ही म्हणता हे पाडून टाकातर ते बरोबर होणार नाही. काही लोक हळू हळू काम करत असतात अशा परिस्थितीमध्ये दुसरा मजला केलेला आहे आणि प्लास्टर करतात ते पाडून टाका म्हणलेतर ते लोक आमच्या डोक्यावर बसणार. नवीन बांधकामाना आम्ही सुध्दा मदत करणार नाहीत. आता जे बांधकाम फायनल स्टेजला आहे त्यांच्या बाबतीत थोडेसे शिथिल करा. जुन्या हद्दीमध्ये मॉडीफिकेशन केलेले नाही तरी सुध्दा कोणत्या कायद्यान्वये हा कायदा इम्पोज करतो हे सांगावे.

मा.भदाणे (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, नवीन गावाचा समावेश झालेला आहे त्याच्यामध्ये ८७ डीपी पब्लिश आहे त्याच्यावर शासनाचे निर्णय प्रलंबीत आहे परंतू जुन्या गावामध्ये ब्ल्यू लाईन, रेड लाईन दाखविण्यासाठी ३७ चा प्रस्ताव कार्यान्वित आहे. तो लवकरात लवकर जीबी पुढे येईल. ४६ सैक्शन आहे इनप्रोसेस किंवा त्यासाठी डयूरिगार्ड या शब्दाचा अर्थ असा आहे, टेक्निकली त्याच्यावर सबमिशन असेल (इंग्रजी वाचन केले) यावर जीबी चा ठराव झालेला आहे. जीबी ने ठराव फेटाळला त्यानंतर आम्ही डायरेक्टरच्या मताशी आहोत त्याबद्यल शासनाला रेफर केलेले आहे अशा अशा विषयामध्ये आम्हांला मार्गदर्शन करावे.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, ७/१२ वर एखादे क्षेत्र १० गुंठे असेलतर प्रॅापर्टि कार्ड मध्ये ९ गुंठे असेलतर तुम्ही प्लॅन ९ गुंठयाचा करता. डीसी रुल प्रिव्हिलेज आहेत असे असताना या जीबी ने मान्यता दिली असतीतर प्रिव्हिलेज वापरता आले असते. आज आपली महापालिका कायदा धाब्यावर ठेवून मनमानी कारवाई करते आणि दुस-या बाजूला या सभागृहाचा अपमान करते. ज्या सैक्शन प्रमाणे या सभागृहाने मान्यता दिलेली आहे त्याचा अवमान आहे. शासनाने डीपी मंजूर केला त्यांच्या नंतर लक्षात आले मग तो परत शासनाने रिपब्लिश का केला. त्यांच्या डीपी मधील चुक लक्षात आली. शासनाच्या लक्षात आले आपण चुक केली आहे त्यावेळेला शासनाने अधिकारी नेमले त्याठिकाणी सजेशन, आब्जेकशन घेतले. आमच्या सदस्यांनी २००-२०० ऑब्जेक्शन दिलेले आहे. कायदा धाब्यावर ठेवून जुण्या हद्दीमध्ये लोकांच्या गळयाला सुरी लावून बसलेले आहेत त्यामुळे विरोधकांना असे वाटते खुप काहीतरी चालले आहे.

आम्ही ज्या कायद्याला मान्यता दिलेली आहे डी.पी. रुलला मान्यता आहे त्याप्रमाणे केले पाहिजे. पहिल्याच मिटिंगमध्ये आम्हांला तुमच्याशी वाद करायचा नाही. डायरेक्टर टाऊन प्लॅनींगच साधं पत्र आहे त्याला या जीबी ने मान्यता दिलेली नाही. आपण सगळे केलेले आहे. मी म्हणणार नाही बेकायदेशिर परवानगी द्यावी म्हणून. आम्हांला चुकिच्या गोष्टीवर पांघरुन घालायचे नाही, आम्हांला विकास करायचा आहे. डायरेक्टरचे पत्र आमच्या महापालिका सभेला ओव्हररुल करु शकत नाही. आयुक्त साहेब तुम्ही पुढच्या मिटिंगला याची सर्व विचारपुस करुन निर्णय घ्यावा. जे चुकिचे चालले त्याला ॲडमिनिस्ट्रेशन जबाबदार आहे. तुम्ही याच्यामध्ये अभ्यास करुन निर्णय घ्यावा आपण अंमलबजावणी करता ती शंभर टक्के चुकिची आहे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, या इश्यूवर माझा वाद झालेला आहे. बीपीएमसी ॲक्ट याठिकाणी आहे त्याप्रमाणे करावे आपण एमआरटीपी ॲक्ट सांगता. जी.बी. ने ठराव केलेला आहे. बीपीएमसी ॲक्टप्रमाणे जीबी ची मान्यता पाहिजे. टिडीआरच्या कमिटीमध्ये फक्त अधिकारीच असतात. महापौर, पक्षनेते हे कोणीही नसते. आयुक्त साहेबांना वेळ असेल त्यावेळेला ही मिटिंग होणार. याची चार-चार महिने मिटिंग होत नाही. टिडीआरची मिटिंग झाल्यानंतर ते प्रोसिडींग जीबीला किंवा कुठल्यातरी कमिटीला यायला पाहिजे.

मा.धनंजय आल्हाट :- मा.महापौर साहेब, शहरातील नागरीक अतीशय मानसीक तनावामध्ये आहेत. आयुक्त साहेबांनी खुलासा दिला. विधी मंडळाचा कायदा, कोर्टाचा आदेश आणि मुख्यमंत्र्यां सोबत झालेली बैठक. त्यानुसार ३१ मार्च १२ नंतरच्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करणार आहेत. कायदा हा आपल्याला माहिती आहे, अधिकारी दर्जापर्यंत सर्वांना माहिती आहे परंतु सर्वसामान्य माणुस त्याला कायद्याची माहिती आहे का. असा असा कोर्टाचा निर्णय होता, विधी मंडळामध्ये कायदा झालेला आहे. सर्वसामान्य माणसाना या गोष्टी माहिती नाहीत. असे असताना त्यामध्ये अधिकारी सस्पेन्ड होणार असे असताना आपण ३१ मार्च २०१२ नंतर जागृती केलेली नाही, हे सर्वसामान्य माणसाना का सांगीतले नाही. मार्च २०१२ नंतरचे घर असतीलतर ते पाडले जातील असे वर्तमानपत्रामध्ये बातमी देवून तुम्ही सर्वसामान्य माणसापर्यंत पोहचविली का. अधिका-यांचे सस्पेन्शन वाढेल त्यांच मुंडक जाणार त्यासाठी सर्वसामान्य लोकांच मुंडक उडविणार का. तुम्ही कारवाई तशा पध्दतीने दाखवा परंतु सर्वसामान्य माणुस या गोष्टीपासून अनभिज्ञ आहे. त्यांना काहीही माहिती नसते ते त्यांना माहिती करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे या गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे. सहानुभूती म्हणून याच्यावर विचार करावा अशी विनंती आहे. मार्च २०१२ नंतर ज्या मिळकतीची नोंद झालेली परंतु त्यांनी परवानगी घेतलेली नाही अशा बांधकामाच्या बाबतीत काय धोरण आहे.

मा.सुरेश म्हेत्रे :- मा.महापौर साहेब, आयुक्तांनी सांगीतले अनधिकृत कामे झालीतर अधिकारी सस्पेन्ड होतील. प्राधिकरण आणि म्हाडा यांनी दहा वर्षात काहीही केलेले नाही त्यामुळे लोक अनधिकृत घर बांधणार. अन्न, निवारा हे मुलभूत घटक आहेत.

मा.अनंत को-हाळे :- मा.महापौर साहेब, आताच बहल आणि आल्हाट यांनी सांगीतले. महत्वाचा विषय आहे. तुम्ही आता माहिती दिलेली आहे ३१ मार्च २०१२ नंतरच्या बांधकामावर कारवाई होणार आहे. चार पाच मजली इमारतीसाठी आपल्याकडे साधनसामुग्री नव्हती म्हणून कारवाई थांबविलेली आहे व त्या मशीन्स आपण मागवितो आहोत असे सांगीतले. आता जे पाया पासून अनधिकृत बांधकाम चालू केलेले आहे ते थांबवा परंतु ज्यांनी चार-चार मजल्या पर्यंत बांधलेले आहे त्यांच्यावर कारवाई होऊ नये. आता जो पाया, कॉलम चालू आहेत अशा अनधिकृत बांधकामावर कारवाई करावी व जी काही कारवाई करणार आहेत त्याची पुर्ण माहिती आम्हांला द्यावी. नागरीकांच्या मनामध्ये एकच येते आमचे घर पाडले आणि त्यांचे घर का पाडले नाही. कारवाईचे नियोजन करावे, आपण जे मोठमोठे पोकलेनसाठी टेंडर काढतो त्याचा खर्च थांबेल. जे आजपासून प्लीन्थचे काम करतात त्यांचा विचार करावा.

मा.राहूल जाधव :- मा.महापौर साहेब, हायकोर्टाचा निर्णय होता, ३१ मार्च २०१२ नंतरच्या बांधकामाचा निर्णय झाला व १ एप्रिल नंतर प्रशासनाने बीट निरीक्षक नेमले त्यावेळेला बीट निरीक्षकांनी हे बांधकाम थांबवायला पाहिजे होते ते थांबविलेले नाही. उदया पासून कोणतेही अनधिकृत बांधकाम करु देऊ नका. माझ्या प्रभागातील बांधकामाचे फोटो काढून नेले त्या दिवशी मी महापौरांना भेटलो होतो. गोरगरीबांची काय परिस्थिती आहे हे माहित नाही. एक गुंठयामध्ये प्लॅन पास होत नाही त्यामुळे हे बांधकाम अनधिकृत होणार, तरी आपण यात सहकार्य करुन जनतेला न्याय द्यावा.

मा.संजय काटे :- मा.महापौर साहेब, याठिकाणी पुररेषेबद्यल अनधिकृत बांधकामाबद्यल चर्चा झालेली आहे. माझ्या प्रभागामध्ये खेळाचे मैदान आणि एसटीपीचे आरक्षण आहे हे आरक्षण ताब्यात घेण्यासाठी संबंधीत जागामालक जागा ताब्यात देत होता. त्यांना टिडीआर बीपीएमसी ॲक्टप्रमाणे मिळवून द्यावा आणि प्रभागाचा विकास व्हावा. गोरगरीब जनतेने एक, अर्धा गुंठा जागा घेवून स्वतः राहण्यासाठी घर बांधलेले आहे त्यांना नियमित करावे. परंतु त्याठिकाणी संधीसाधू लोक, डेव्हलपर आलेले आहेत त्यांना मदत करणारे आर्किटेक्ट आहेत त्यांच्यावर कारवाई करावी एवढेच सांगतो.

मा.महापौर :- वर्षाताई मडिगेरी यांचे प्रश्न.

मा.वर्षा मडिगेरी :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वायसीएम येथील कॅथलॅब विभाग मे. रुबी अल केअर सव्हिसेस प्रा.लि. या खाजगी संस्थेस चालविण्यास देण्याच्या गैरव्यवहार झाल्याप्रकरणी बीपीएमसी ॲक्ट १९४९ कलम ४८७ नुसार नोटीस क्रमांक २०१०-११/५४ दि.५/१/२०११ महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे काय, प्राप्त झाली असल्यास कोणत्या तारखेस प्राप्त झाली व त्याच्यावर कार्यवाही करुन उत्तर दिलेले आहे का. त्याचे उत्तर दिलेले आहे की, ही नोटिस मा.आयुक्त कार्यालयास दिनांक ६/१/२०११ रोजी प्राप्त झाली आहे.सदर नोटिसबाबत तत्कालिन आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. श्री नागकुमार कुणचगी यांचा खुलासा घेण्यात आला आहे. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचा खुलासा घेऊन पुढील कार्यवाही सुरु असल्याबाबत सौ. वर्षाताई मडिगेरी यांना दिनांक २८/३/२०१२ च्या पत्राने कळविण्यात आले आहे. सौ.वर्षाताई मडिगेरी व श्री.विलास मडिगेरी यांनी त्यांचे दि. २८/४/२०११ च्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्रमांक

CRPL/१४/२०११ दिनांक २२/३/२०११ दाखल केल्याचे कळविले आहे. यावरुन सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे दिसून येत आहे. मी दुसरा प्रश्न विचारला होता आयुक्त जावक पत्र क्र.प्रशा/१/११६९/१९९७ दिनांक ३/१२/१९९७ या पत्रानुसार संबंधितांना कोणत्या प्रकारचे अधिकार दिले गेले आहेत, कोणकोणत्या अधिका-यास दिले आहेत. त्याचे उत्तर दिले की, आदेश क्र.प्रशा/१/कावि/११६९/१९९७ दि.३/१२/१९९७ अन्वये आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना र.रु. २ लाख ५० हजार व वैद्यकीय अधिक्षक वायसीएम रुग्णालय यांना र.रु. २ लाख रकमेपर्यंतचा खर्च अंतर्भुत असलेल्या कामासंदर्भात कराव्या लागणा-या कार्यवाहीचे संपुर्ण अधिकार प्रदान केलेले आहेत. याठिकाणी चुकिची माहिती दिलेली आहे. मी लेटरहेडवर दिलेले होते की मुंबई हायकोर्टात याचिका दाखल झालेली आहे तरी याठिकाणी खोटी माहिती दिलेली आहे. वायसीएम येथील कॅथलॅब विभाग मे. रुबी अल केअर सव्हिसेस प्रा.लि. या खाजगी संस्थेस भाडेतत्वावर दिलेल्या करारनाम्यावर सही करण्याचे अधिकार बी.पी.एम.सी. ॲक्ट १९४९ नुसार महानगरपालिकेत कोणत्या विभागास व कोणत्या अधिका-यास आहेत या प्रश्नाचे उत्तर असे दिले आहे की, आदेश क्रमांक प्रशा/१/कावि/२८२/१९९२ दिनांक १८/४/१९९२ च्या आदेशान्वये कार्यालयीन कामकाजाच्या सोयीच्या दृष्टिने ज्या त्या विभागाशी संबंधित असलेल्या कामकाजाचे संदर्भात कराव्या लागणा-या करारनाम्यावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार संबंधित विभागप्रमुखांना प्रदान करण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने वायसीएमएच येथील कॅथलॅब विभाग खाजगी संस्थेस भाडेतत्वावर देण्याचा करारनामा वैद्यकीय विभागामार्फत करण्यात आलेला आहे. हे प्रशासनाने दिलेले उत्तर चुकिचे आहे. संबंधित विभागाला, संबंधित अधिकारी यांना करारनाम्यावर सही करण्याचे अधिकार नाहीत, याबाबतीत आयुक्त यांचे भूमि आणि जिंदगीचे २०१० चे पत्र आहे त्याच्यावर स्पष्ट उल्लेख केलेला आहे की, भूमि आणि जिंदगी या विभागाला हे भाडेतत्वावर देण्याचे अधिकार आहेत. याचा अर्थ असा आहे की यांना याठिकाणी सही करण्याचे अधिकार नव्हते तरी सुध्दा तो अधिकार त्यांनी बजावलेला आहे. त्यांनी हे बेकायदेशिर काम केलेल आहे. त्यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर केलेला आहे. त्यांना त्यावर सही करण्याचे अधिकार नाहीत. वायसीएम येथील कॅथलॅब विभाग मे. रुबी अल केअर सर्व्हिसेस प्रा.लि. या खाजगी संस्थेस दिलेल्या भाडेतत्वाच्या करारनाम्यावर सही कोणत्या विभागाच्या अधिका-यांने केली त्यांचे पदनाम व अधिका-यांचे नावासहित माहिती द्यावी. असा प्रश्न होता, वायसीएम येथील कॅथलॅब विभाग मे. रुबी अल केअर सर्व्हिसेस प्रा.लि. या खाजगी संस्थेस भाडेतत्वावर दिलेल्या करारनाम्यावर सही वैद्यकीय विभागाकडील आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी केलेली आहे. त्यांचे नाव व पदनाम डॉ. नागकुमार कुणचगी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी असे आहे.असे उत्तर दिलेले आहे. डॉ.नागकुमार यांनी सही केलेली आहे हे उत्तर बरोबर आहे. माझा मुद्या असा आहे की, त्यांनी जे पाचव्या प्रश्नाचे उत्तर दिलेल आहे आदेश क्र. प्रशा/१/कावि/११६९/१९९७ दि. ३/१२/१९९७ अन्वये आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना २ लाख ५० हजार व वैद्यकीय अधिक्षक वायसीएम रुग्णालय यांना र.रु. २ लाख रकमेपर्यंतचा खर्च अंतर्भुत असलेल्या कामासंदर्भात कराव्या लागणा-या कार्यवाहीचे संपुर्ण अधिकार प्रदान केले आहेत. असे यामध्ये नमुद केलेले आहे. यामध्ये केवळ २ लाख ५० हजार पर्यंतचे तातडीचे औषध खरेदी करण्याचे अधिकार आहेत. एवढे स्पष्ट असताना डॉ.नागकुमार यांनी

करारनाम्यावर सही केलीच कशी. डॉ.नागकुमार यांनी आपल्या पदाचा, आपल्या अधिकाराचा गैरवापर केलेला आहे आणि महापालिकेची फसवणूक केलेली आहे त्यामुळे हा करारनामा बेकायदेशिर आहे. हा करारनामा रद्द केला पाहिजे अशी माझी मागणी आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वायसीएम येथील कॅथलॅब विभाग खाजगी संस्थेस चालविण्यास देण्याच्या निविदा मध्यवर्ती साहित्य भांडार यांचा नोटीस क्रमांक १०/२००८-०९ नुसार मधील मुद्या क्र. ६ नुसार मनपा तर्फे वीज मीटर, पाणी मीटर, नाईटस मीटर ओटू पुरवठा बील, या शिवाय आवश्यक दुरध्वनी खर्च, जनरेटरसाठीचा खर्च व इतर सोयी सुविधासाठीचा खर्च संस्थेस, संचालकास भरावे लागेल, असे उल्लेख आहे. नंतर ही निविदा मे. रुबी अल केअर सर्व्हिसेस प्रा.लि. या खाजगी संस्थेस मंजूर केला. त्यानंतर या खाजगी संस्थेबरोबर केलेल्या भाडेतत्वाचा करारनाम्यामध्ये वरील मुद्या क्र. ६ भाडे करारनाम्यामध्ये उल्लेख आहे का, नसेलतर निविदा नोटीसमध्ये मुद्या क्र. ६ स्पष्ट असतांना करारनाम्यामध्ये उल्लेख का केला गेला नाही. असा माझा प्रश्न होता. याचे उत्तर असे दिले आहे की नोटीस क्रमांक.१०/२००८-२००९ नुसार मधील मुद्या क्रमांक ६ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका तर्फे वीज मीटर, पाणी मीटर नायट्रस मीटर, ओटू मीटर बसविण्यात येईल त्याकरिता येणारा खर्च व विद्युत बील, पाणी बील, नायट्रस बील, ओटू पुरवठा बील या शिवाय आवश्यक दुरध्वनी खर्च, जनरेटरसाठीचा खर्च व इतर सोयी सुविधांसाठीचा खर्च संस्थेस, संचालकास भरावे लागेल. असा उल्लेख आहे. नंतर ही निविदा मे. रुबी अलकेअर सव्हिसेस प्रा. लि. या खाजगी संस्थेस मंजूर केली. पिंपरी चिंचवड महानगरपालिका व मे. रुबी अलकेअर सर्व्हिसेस प्रा.लि. यांचेमध्ये दिनांक २१/१/२००९ रोजी करारनामा करण्यात आला आहे. सदर करारनाम्यात निविदेतील सर्व अटी-शर्ती मान्य असलेचे नमुद केले आहे. परिच्छेद क्र. १७.५ पान क्रमांक ८ वर उल्लेख करण्यात आलेला आहे. सदर परिच्छेद खालीलप्रमाणे-

१७.५)The Company has agreed to abide by all the terms and conditions of the tender of this agreement period.

हा जनतेचा पैसा आहे त्यामुळे हे बेकायदेशिर काम आहे. जानुन बुजून कुठल्यातरी ठेकेदाराला डोळयासमोर ठेवून हे केलेले आहे असे माझे ठाम मत आहे त्यामुळे हा करारनामा रद्द करण्यात यावा. मेडीकल शॅाप आणि पॅथॉलॉजी लॅब हे निविदेमध्ये नसताना ॲग्रीमेंट मध्ये उल्लेख केलेला आहे आणि ते रुबी अलकेअरला चालविण्यासाठी दिलेले आहे त्यामुळे हे फसवणूकीचे काम केलेले आहे त्यामुळे महापालिकेच्या करोडो रुपयाचे नुकसान झालेले आहे. निविदा काढताना त्यामध्ये स्पर्धा होणे गरजेचे आहे त्यामध्ये दोन निवीदा आल्या तीन निवीदा असाव्या लागतात. दोन निवीदा असताना रुबी अलकेअरला का दिलेले आहे. रिटेडरींग केलेले नाही त्यामुळे हे महापालिकेचे नुकसान झालेले आहे. यामध्ये गैरव्यवहार झालेला आहे. तरी हा करारनामा रद्द करावा असे सांगते.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, माझ्या चार प्रश्नांचे उत्तर याठिकाणी दिलेले आहे. यामध्ये अर्धे उत्तर बरोबर आहे आणि बाकिचे उत्तर असे का दिले याची माहिती द्यावी. दिनांक ३/९/२०११ च्या वर्तमान पत्रातील जाहिरात नुसार मनपा प्रशासनाने किती बीएएमएस वैद्यकीय अधिकारी भरले आहेत असा प्रश्न होता,

दि.३/९/२०११ रोजीचे जाहिरातीनुसार एकूण ८ बीएएमएस वैद्यकीय अधिकारी सरळसेवा प्रवेशाने भरलेले आहेत असे उत्तर दिलेले आहे परंतु यामध्ये मनपा सेवेत असलेले किती अधिकारी घेतलेले आहेत. त्यातील मनपा मधील दवाखान्यात सेवेत असणारे किंवा मानधनावरील किती डॉक्टर अधिकारी म्हणून घेतले आहेत. यामध्ये दि.३/९/२०११ चे जाहिरातीनुसार घेण्यात आलेल्या ८ बीएएमएस वैद्यकीय अधिका-यांपैकी एकही वैद्यकीय अधिकारी मनपा मधील दवाखान्यात मानधनावरील सेवेत नव्हते. असे उत्तर दिलेले आहे. यामध्ये २०११ ला भरती झाली त्यामध्ये दोन निकष लावलेले होते आणि नंतर तीन निकष लावलेले होते. दोन वेळा भरती झाली त्या दोन्ही वेळेला निकष कसे काय बदलले आहेत आणि कुठल्या नियमांच्या आधारे हे पद भरलेले आहेत.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ही जी जाहिरात निघाली ती दोन वेळेला निघाली. पहिली जाहिरात २००९ मध्ये जाहिरात क्र. २५० व दुसरी जाहिरात २०११ ला जाहिरात क्र. १७२ आपण बारकाईने पाहिलेतर दोन जाहिरातीमध्ये वैद्यकीय अधिकारी बीअेमएस या पदाची शैक्षणिक पात्रता व अनुभव असा दिलेला आहे. मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.ए.एम.एस पदवी उत्तीर्ण. इंटर्नशिप पूर्ण व राज्य मेडिकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक. दुस-या जाहिरातीमध्ये बदल का झाला हे समजावून घ्यावे लागेल. २००९ साली काढलेल्या जाहिरातीमध्ये मानधनावरील लोक त्यामध्ये बसावेत म्हणून डॉ.नागकुमार यांनी शिफारस केली की वैद्यकिय अधिकारी बीएएमएस या पदांकरिता अर्ज करणा-या उमेदवारांना शासकीय/निमशासकीय रुग्णालयातील ७ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे, त्याप्रमाणे प्रशासनाने ही अट घातली त्यामुळे ती अट त्यावेळेस समाविष्ठ झाली. व २०११ साली शासनाने जी अट टाकलेली आहे ती कायद्याप्रमाणे आहे.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, २०११ सालच्या अटिप्रमाणे हे आहे असे तुमचे म्हणणे आहे.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, दोन्ही जाहिराती एकच आहेत. २००९ सालच्या अटिमध्ये वैद्यकीय अधिकारी बीअेमएस या पदांकरिता अर्ज करणा-या उमेदवारांना शासकी/निमशासकीय रुग्णालयातील ७ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे असे आहे.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, त्यानंतर विधी समितीमध्ये काही ठराव मंजूर केलेला आहे का. जीबी मध्ये ठराव मंजूर केलेला आहे का. ११.३.२०११ ला महापालिकेनी नियमावली मंजूर केलेली आहे त्या पध्दतीने हे भरणार, का शासनाच्या नियमाप्रमाणे.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शासन ज्यावेळेला कोणतेही पद मंजूर करते त्यावेळेला त्या मंजूर आदेशामध्ये त्या पदाची अर्हता मंजूर होती. त्यात बदल करायचा असेलतर रिक्रूटमेंट रुल्स आपण तयार करायचे त्याच्यावर ऑब्जेक्शन मागवून त्यावर महापालिका सभेची मंजूरी घ्यायची नंतर ते शासनाने मंजूर

करायचे त्यानंतरच मुळ अर्हतेमध्ये बदल होतो. नवीन अर्हता होणार नाही तोपर्यंत जुन्या अर्हतेप्रमाणे जाहिरात काढावी लागेल. नवीन अर्हतेचे प्रोसेस चालू आहे. ते प्रशासन आणि आयुक्त बसुन फायनल करुन जीबी पुढे येईल त्याला दोन महिने लागतील.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, आठ वैद्यकिय अधिकारी भरलेले आहेत. काही अधिकारी असे आहेत की त्यांच्याकडे महाराष्ट्र राज्य मेडिकल कौन्सिलकडचे नोंदणी प्रमाणपत्र घेतले नाही तरी सुध्दा त्यांना घेतलेले आहे.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, स्नेहा पावसे या उमेदवारांला सुरवातीला परिक्षेचे पत्र दिलेले नव्हते, ते आयुक्तांना भेटले. ८६५ गावे महाराष्ट्र शासनेने आमच्याकडे समाविष्ट करावेत त्यातील हे उमेदवार आहेत. ८६५ गावा बाबतचा शासनाचा निर्णय आहे तो मी वाचून दाखवितो. (महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागा मधील ८६५ गावाचा समावेश महाराष्ट्रात करण्याबाबतच्या निर्णयाचे वाचन केले) बीअेएमएस चे सर्टिफिकेट त्यांनी दाखविले, इटर्नशिप पुर्ण करतात याचा विचार करुन आणि राज्याची अट पुर्ण करतात. कर्नाटकचे रजिस्ट्रेशन असलेतरी या गावामध्ये राहणा-या नागरीकांना महाराष्ट्र शासनाच्या नौकरीमध्ये घेणेबाबतचे १० जुलै २००८ चे परिपत्र आहे.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, सीमा भागातील लोकांना घेतलेले आहे हे बरोबर आहे परंतु कर्नाटक स्टेटचे पत्र आपल्याकडे चालत नाही. आयुक्त साहेबांनी मुदत कशी काय दिली. शासनाने सांगीतलेले आहे सीमा भागातील अमुक लोकांना सेवेत घेतलेले आहे. त्यांच्याकडे महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे प्रमाणपत्र नाही तरी त्यांचे सिलेक्शन कसे काय होऊ शकते. याठिकाणी वेळोवेळी वैद्यकीय अधिका-यांची भरती वायसीएममध्ये झालेली आहे प्रत्येक वेळेला निकष बदलले जातात, नियम बदलले जातात. काही लोकांच्या जवळचे डॉक्टर असतीलतर त्यांना यामध्ये घेता येईल असे केले जाते आणि नंतर नियम बदलले जातात. डॉक्टर आपल्याकडे ९ ते १० वर्षे काम करतात, पहिल्या नियमामध्ये सात वर्षाचा अनुभवाची अट होती. त्यामध्ये हे डॉक्टर बसले नाहीत व नंतरच्या जाहिरातीमध्ये त्यांनी अर्ज केलातर अनुभवाची अट रद्य केली. मानधनावरचा एक सुध्दा डॉक्टर घेतलेला नाही. त्यांचे फॅार्म बाद कसे काय होतात. एकदा अनुभवाची अट टाकून बाद करायचे आणि एकदा अनुभवाची अट न टाकता बाद करायचे. ठराविक लोकांची भरती करण्यासाठी हे चालले आहे. याठिकाणी पावसे डॉक्टरांचा उल्लेख केलेला आहे, नियमाची तोडमोड करुन कसेतरी करुन त्या पदावर घ्यायचे. परंतु यामुळे त्या गरीब माणसांचा संसार उध्दवस्त होऊ शकतो. असे अनेक डॉक्टर्स आहेत की त्यांना जानुनबुजून डावलले गेलेले आहे. पावसे यांना कसे काय घेतले म्हणून त्या डॉक्टरांनी पत्रकारपरिषद घेतली होती तर त्या तीन्ही डॉक्टरांना निलंबीत केलेले आहे. २३ डॉक्टर मानधनावर नियुक्त केलेले आहेत, त्यांची जुलै पर्यंतची मुदत होती त्यांना तसेच ठेवता आणि या तीन डॉक्टरांना कामावरुन काढता का तर त्यांनी पत्रकार परिषद घेतली म्हणून. जे आठ ते नऊ वर्षे काम करतात त्यांना डावलले जाते. त्यांनी कोणाला जाब विचारायचा. आपण नियम करतो त्यामध्ये असे म्हणायला पाहिजे होते की कुठल्याही स्टेटचे मेडीकल कौन्सिलकडील सर्टिफिकेट चालेल किंवा सिमा भागातील कोण असतीलतर कर्नाटकचे मेडीकल कौन्सिलचे सर्टिफिकेट चालू शकेल. ही जी भरती आहे ती नियमात बसत नाही, नियम तोडून ही

भरती केलेली आहे. उमेदवार डोळयासमोर ठेवून केलेली आहे ही भरती रद्य करावी नाहीतर आम्हांला कायदेशिर भांडावे लागेल. डॉ.नागकुमार यांनी नियम केला, तेथील डॉक्टर बसावेत म्हणून मग तोच नियम कन्टीन्यु पुढे करायला पाहिजे. जोपर्यंत नियमावली अधिकृत होत नाही तोपर्यंत भरती करु नका. आपले जे नियम आहेत त्यामध्ये सुध्दा ३५ वय असेल, ३७ वयाचे लोकांना, डॉ. अय्यरच्या मिसेसचे ३५ वर्षे दाखवून भरती केलेली आहे असे सहा ते सात डॉक्टर्स आहेत. कोणालातरी जवळच्या माणसाला घ्यायचे म्हणून असे करायचे का. ९६ पासून २०१०-११ पर्यंत हे चालले आहे. बोगस पध्दतीने डॉक्टरांची भरती याठिकाणी चालू आहे. जे डॉक्टर मानधनावर काम करतात त्यांचे रेकॉर्ड बघा त्यांना परमनन्ट करा ते याठिकाणी दहा-दहा वर्षे काम करतात. त्यांच्या वयाची अट संपलेली आहे. आपल्या माणसासाठी इतरांचे संसार गेलेतरी चालतील, असे चालले आहे. अशा पध्दतीचे चुकिचे धोरण वापरुन वैद्यकीय अधिका-यांची नौकरभरती झालेली आहे  ही डॉक्टरांची भरती रद्य करण्यात यावी.

मा.कैलास कदम :- मा.महापौर साहेब,  सावंत साहेबांना प्रश्न विचारायचा आहे की वैद्यकीय अधिकारी पदासाठी घेणेत आलेल्या लेखी परिक्षेचा पेपर कोणत्या अधिका-यांनी व कधी आणि कुठल्या दिवशी काढलेला आहे. स्नेहा पावसे यांचे मेडीकल सर्टिफिकेट कर्नाटकचे आहे त्याच्यावर ई असा शब्द आहे. आयुर्वेदीक भरती केलेली असेलतर वायसीएमएच मध्ये आतापर्यंत किती रुग्णांना तपासले आहे. वायसीएमएच मध्ये आयुर्वेदिक हॉस्पिटल आहे का व आतापर्यंत किती रुग्णांना त्यांनी तपासले आहे आणि औषधोपचार काय केलेले आहे याचे उत्तर द्यावे.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, बीएएमएस ची भरती झालेली आहे त्याचे पेपर साहेबराव गायकवाड यांनी एमपीएससीच्या प्रमाणे मेडीकलचे पेपर काढलेले आहेत. ९.३० ला पेपर काढला जातो १०.३० ला पॅक करुन परिक्षा हॉलमध्ये जातो व ११ वाजता परीक्षा चालू होते.

मा.कैलास कदम :-  मा.महापौर साहेब, साहेबराव गायकवाड, सहा.आयुक्त यांनी त्यांच्या माध्यमातून लेखी पेपर काढला असेलतर त्याला काय महत्व आहे.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, एमपीएससीचे मेडीकलचे जे प्रश्न असतात त्यामधुन पेपर काढला जातो ते स्वत: बनवत नाहीत.

मा.उल्हास शेट्टी :-  मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण डॉक्टर आहात. पिंपरी चिंचवड शहरात वायसीएममध्ये बीएएमएस डॉक्टरांची किती गरज आहे. ॲलोपॅथी जमान्यात बीएएमएसचा किती उपयोग होतो.  पुण्यासारख्या ससून मध्ये बीएएमएस डॉक्टर्स नाहीत.  आपल्याकडे घेण्याची काय गरज पडली. सीएमओची गरज आहे त्यांना याठिकाणी न घेता बीएएमएस शासनाकडून पत्र देवून मागवून का घेतलेले आहेत. बीएएमएस यांच्या औषधाने ताबडतोब फरक पडत नाही. त्यांनी किती औषधोपचार केलेले आहेत हे विचारलेले नाही.  आम्ही त्याठिकाणी जात असतो त्याठिकाणी आम्हांला प्रोफेशनल डॉक्टर्स खुप कमी वेळा सापडलेले आहेत. हाऊस किपींगसाठी सुध्दा डॉ. जगदाळे यांना फोन करावा लागतो. काहीही छोटे मोठे काम असू द्यात, सकाळी ९ वाजता झालेला डिसचार्ज संध्याकाळी ४ पर्यंत पेशंटला सोडले जात नाही किंवा त्याची डिसचार्ज प्रक्रिया पुर्ण झालेली नसते. दोन-तीन दिवसापुर्वी

प्रायव्हेट ॲम्ब्युलन्सला तेथील प्रिमायसेस मधुन बाहेर काढण्यात आलेले आहे. वर्षनुवर्ष त्याठिकाणी ॲम्ब्युलन्स कार्यरत आहेत. पिंपरी चिंचवड शहराच्या बाहेर आपल्या ॲम्ब्युलन्स पाठवित नाहीत. आपल्याकडे ॲम्ब्युलन्स कमी आहेत. पिंपरी चिंचवड शहरात १७-१८ लाख लोकसंख्या आहे. याठिकाणी जिल्हयाच्या बाहेर राहणारे ५० टक्के लोक येतात. त्याना बॉडी बाहेर न्यायची असेलतर प्रायव्हेट ॲम्ब्युलन्स करावी लागते. नागरीकांच्या सोईसाठीच बाहेरच्या ॲम्ब्युलन्स तेथे असतात. मला विनंती करायची आहे की, संबंधीत नगरसेवकांच्या, पदाधिकारी किंवा सदस्यांच्या ॲम्ब्युलन्स आहेत त्या त्याठिकाणी उभे राहण्यासाठी द्याव्यात. पिंपरी चिंचवडला रस्त्यामध्ये कितीतरी ट्रक उभ्या असतात. मग फक्त आठ ते दहा ॲम्ब्युलन्स आपल्या प्रिमायसेसमध्ये उभ्या राहतात त्यांना काढणे योग्य नाही. वायसीएम हॉस्पिटलमध्ये प्रॉपर सिस्टीम नाही ती सिस्टीम त्याठिकाणी करणे गरजेचे आहे. सीएमओसाठी वेगळी अशी नियोजन पध्दत वायसीएममध्ये केलीतर त्याठिकाणी गोरगरीब जनता जात असते, व्हेन्टीलेटर नसते. बीएएमएस किती लागतात याची शहनिशा करावी. पोस्टमार्टेम विभागामध्ये सफाई कामगार म्हणून नेमणेत आलेले होते त्यांच्याकडून पोस्टमार्टेम करत होते. त्याठिकाणी सफाई कामगार लोकांना पोस्टमार्टेम करण्याची वेळ आलेली आहे. पोस्टमार्टेमचे कर्मचारी वर्षानुवर्ष मानधनावर काम करतात त्यांना तुम्हांला वेतनश्रेणीमध्ये घेता आलेले नाही. डॉक्टरांना वयाची अट नसते वयाच्या शेवटपर्यंत ते प्रॅक्टीस करत असतात. मग काम करण्यासाठी वयाची अट का पाहिजे. शासनाचे नियम असतीलतर त्यामध्ये पळवाटा करुन घ्याव्यात.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, निवड समिती ही मुलाखतीच्या वेळेला नियुक्त केली जाते. त्याचे अध्यक्ष मा.आयुक्त असतात. एमपीएससीचे मेडीकल पुस्तक असते त्यातून पेपर काढत असतात हा पेपर चुकिचा आहे अशी कोणाची तक्रार आलेली नाही.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, बीएएमएस डॉक्टर आपल्या वायसीएम मध्ये घ्यावे किंवा असा शासनाचा जीआर आहे का याचे उत्तर द्यावे.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, शासनाचा जीआर आहे. एकूण पदापैकी २५ टक्के पद बीएएमएस मधुन भरावीत त्यापैकी ८४ पदे २००९ ला भरलेली आहेत व उरलेली पदे २०११ ला भरलेली आहेत.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, बीएएमएस, बीएचएमएस डॉक्टरांनी ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करु नये असे चालले आहे हा विरोधाभास दिसतो. आपल्याकडे बीव्हीजी म्हणून संस्था आहे ती वायसीएम मध्ये काम करते. कोणाच्यातरी नावावर ही संस्था चालते. त्या संस्थेचे ४० विद्यार्थी आपल्या विभागामध्ये प्रॅक्टीस करतात. ते आपली सेवा विनामोबदला देतील असा करारनामा आहे तसे सांगावे. तसे असेलतर त्यांना आपण आता मानधन देतो का. हे लोक बीएएमएस असलेतरी ते ॲलोपॅथीची चिठ्ठी कशी लिहून देतात. असे असेलतर तालेरा, जिजामाता याठिकाणी बीएएमएस डॉक्टर सर्जरी करतात. असा एखादा पेशंट क्रिटीकल असेलतर वायसीएम मध्ये पाठविले जाते. त्याठिकाणी रुग्णवाहिका नाहीत त्याठिकाणाहून रिक्षामध्ये वायसीएमला जाताना एक महिला प्रसूती झालेली आहे. संध्याकाळी ६ वाजता एका झोपडपट्टीमधील पेशंटला

बघण्यासाठी मी मागच्या दोन महिन्यामध्ये वायसीएमला गेली होती. त्या पेशंटला आदल्या दिवशी संध्याकाळी सांगीतले उदया सकाळी सीजर आहे, आदल्या दिवसापासून त्याचे खाणेपिणे बंद केले, दुसरा दिवस पुर्ण गेला. ऑपरेशन थेअटरच्या बाहेर वेटिंग रुम आहे त्याठिकाणी ती होती. त्याठिकाणी सगळे शिकाऊ डॉक्टर्स आहेत २४ तास ती बाई बीना अन्नपाण्यावाचून होती. याविषयी मी डॉक्टरांना विचारलेतर त्यांनी सांगीतले सलाईन लावलेले आहे. प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये सांगतात एक तासात सिजर करावे लागेल आणि याठिकाणी २४ तास सीजर होत नाही. त्याठिकाणी आपले डॉक्टर नसतात हे सीजर बीएएमएस आणि शिकाऊ डॉक्टर्स करतात.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, वैद्यकीय अधिकारी किती पेशंट तपासतात, कोणाला तपासतात याची माहिती प्रशासनाकडे नाही, डॉ.जगदाळे देतील. हे डॉक्टर हॉस्पिटलमध्ये पेशंट तपासतात का नाही याची माहिती माझ्याकडे नाही.

मा.डॉ.जगदाळे :- मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह बीएएमएस पदावर नियुक्त झालेले डॉक्टर वायसीएम हॉस्पिटलमध्ये मेडीसीन विभागात काम करतात. सोमवारी आणि गुरुवारी त्यांची ओपीडी असते. बाकीच्या वॉर्डमध्ये एमडी डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली काम करत असतात.

मा.कैलास कदम :- मा.महापौर साहेब, डॉ.जगदाळे यांची सून डॉक्टर आहे त्यांनी उत्तर दिले नाही पाहिजे. आतापर्यंत किती रुग्णांची तपासणी केलेली आहे त्याची माहिती पाहिजे. ही माहिती तुम्ही दिली नाही पाहिजे. सावंत साहेबांनी दिली पाहिजे.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, आता जे स्नेहा पावसे संदर्भात विरोधी पक्षनेते कैलास कदम यांनी प्रश्न विचारला याबाबतची माहिती आता प्रशासनाकडे नाही पुढच्या मिटिंगला डेप्युटी सुप्रिटेंन्डंट डॉ.गायकवाड साहेब हि माहिती देतील.

मा.कैलास कदम :- मा.महापौर साहेब, याठिकाणी परिक्षेचा पेपर गायकवाड, सहा.आयुक्त यांनी काढला हे चुकिचे आहे असा माझा आरोप आहे. स्नेहा पावसे यांची आयुर्वेदिकची डिग्री असेलतर आतापर्यंत किती रुग्णांना तपासलेले आहे. ही भरती प्रक्रिया रद्द करावी अशी विनंती आहे. अपात्र डॉक्टर १०७ आहेत अपात्र उमेदवारांना अपात्र असलेबाबत पत्र पाठविलेले आहे ते पोस्टाने पाठविले का डायरेक्ट माहिती दिलेली आहे याची माहिती द्यावी.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, या नौकरभरतीमध्ये जे अर्ज आलेले होते त्याच्या जाहिरातीच्या निकषा प्रमाणे पात्र उमेदवाराना लेखी स्वरुपातील परिक्षेसाठी बोलावले होते. परिक्षेमध्ये जे उमेदवार पास झालेले आहेत त्यांना दुस-या दिवशी मुलाखतीसाठी बोलावलेले होते. यामध्ये अपात्र उमेदवारांना कळविलेले नाही.

मा.कैलास कदम :- मा.महापौर साहेब, स्नेहा पावसे यांना कसे काय समजले ते अपात्र होते म्हणून.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, आपण हे कॉल्स पाठवितो. दोन तीन कॅण्डीडेट एकत्र आल्यानंतर चर्चा चालते, विचारतात मला कॉल आला, तुम्हांला कॉल आला का. असे स्नेहा पावसे यांना इतर उमेदवार त्याठिकाणी वायसीएममध्ये काम

करतात त्यामुळे त्यांनी सांगीतले असेल त्यावरुन त्यांना समजले असेल. तुला कॉल आला मला कसा काय आला नाही असे त्यांना समजले असेल.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, हे चुकिचे उत्तर आहे. ते अपात्र आहेत नंतर पात्र होतात. रजिस्ट्रेशन होते व सिलेक्ट होतात व वैद्यकिय अधिकारी म्हणून येतात, त्यांच्यासाठी स्पेशल कायदा आहे का.

मा.अनंत को-हाळे :- मा.महापौर साहेब, ही जी भरती झालेली आहे ती रद्य व्हावी. महाराष्ट्र नवनिर्माण सेने तर्फे अंदोलन होईल. जे सर्वसामान्य माणस आहेत त्यांच्या मनामध्ये ही गोष्ट राहिल की अधिका-यांची मुल घेण्यासाठी नियमाला बगल दिली जाते. महापालिकेचे नाव बदनाम होईल तरी याचा विचार करावा.

मा.आयुक्त :- सन्मा.महापौर महोदया, याठिकाणी चार-पाच मुद्ये उपस्थित केलेले होते त्या संदर्भात माहिती देतो. बीएएमएसच्या रिक्रुटमेंटच्या बाबतीत तक्रार विरोधी पक्षनेते यांनी केलेली होती. ते चर्चेसाठी आलेले होते त्यावेळेला मी शासनाची नियमावली पाहिली. दोन्ही जाहिरातीच्या बाबतीत सोनकांबळे यांनी प्रश्न विचारलेला आहे. त्यात मान्यता प्राप्त विद्यापीठाची बीएएमएस पदवी उत्तीर्ण व इंटर्नशिप पुर्ण व राज्य मेडिकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक अशी शासनाने परवानगी दिलेली होती. २००९ मध्ये बीएएमएस पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांना शासकीय, निमशासकीय रुग्णालयातील ७ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे अशी अट टाकलेली होती ती अट ३/९/२०११ च्या जाहिरातीमध्ये नव्हती. त्यावेळेस ही अट स्वतःच्या मर्जीनुसार टाकलेली आहे ती चुकिची झालेली आहे. आताच्या भरतीमध्ये बीएएमएस आणि राज्य मेडिकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक आहे असे आपण शासनाकडे दिलेले आहे ते योग्य आहे. रिक्रूटमेंट रुल सभागृहामध्ये फायनल करावे लागतील ते शासनाकडे पाठवावे लागतील. अगोदरची टाकलेली अट चुकची होती नंतरच्या भरतीची अट बरोबर आहे. साहेबराव गायकवाड हे बीएएमएस भरतीचे पेपर काढू शकतात का असे विचारले. रिक्रूटमेंट ही सेन्सीटिव्ह प्रक्रिया असते त्याच्यामध्ये पेपर काढण्याची जबाबदारी सक्षम अधिका-यांकडे असते. त्यामध्ये विवीध प्रशासकीय कॅडरची भरती होत असेलतर तेवढया प्रवर्गाचे सक्षम अधिकारी आयुक्तांच्या विश्वासातले असतीलच असे नाही. थेअरी पेपर सह आयुक्त यांनी सांगीतल्याप्रमाणे त्या रेडीमेड प्रश्नपत्रिका असतात त्यामुळे जे प्रश्न काढले जातात त्यासाठी वैद्यकीय तज्ञ बोलावले जातात. काल लॉ ची मुलाखत घेतली त्यावेळेलाही दोन लॉ अधिकारी बोलावले होते. त्यामुळे थेअरी पेपरच्या वेळेस काही गैर होते असे वाटत नाही. तत्कालीन आयुक्तांनी घेतलेला निर्णय योग्य आहे. बीएएमएस डॉक्टर वायसीएममध्ये आहेत. वायसीएम हे ॲलोपॅथी हॉस्पिटल आहे त्याठिकाणी ॲलोपॅथी डॉक्टर असणे आवश्यक आहे. त्याठिकाणी आयुर्वेदाची ओपीडी आहे तेथे स्पेशल ट्रिटमेंट दिली जात नाही त्यामुळे २५ टक्के पेक्षा जास्त भरती केली जाऊ शकणार नाही. तेथील कोर्सेसच्या बाबतीत विचारले, माझे डॉक्टर म्हणून असे स्पष्ट म्हणणे आहे की वायसीएम हॉस्पिटल हे ॲलोपॅथी हॉस्पिटल आहे त्याठिकाणी कुठल्याही संस्थेला कोर्सेस चालवायचे असेलतर मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडिया यांच्या मान्यतेशिवाय कुठलाही कोर्स चालविता येणार नाही. तसे नसेलतर तो कोर्स ताबडतोब बंद केला पाहिजे. नवीन ॲम्ब्युलन्स खरेदीची प्रक्रिया चालु आहे. चार-पाच ॲम्ब्युलन्स येत आहेत

त्यावेळेला हा प्रश्न सुटणार आहे. पात्र आणि अपात्र उमेदवारांना कळविले पाहिजे. अपात्र का याचे कारण सुध्दा कळविले पाहिजे यापुढे ही सुधारणा करण्याबाबत प्रशासनाला सांगीतलेले आहे. १५ दिवस अगोदर पात्र अपात्र यांची यादी वेबसाईटला सुध्दा द्यावी असे सांगीतलेले आहे. यापुढील भरती १०० टक्के मेरीटप्रमाणे भरण्याचा आमचा प्रशासनाचा मनोदय आहे त्यास आपण सहकार्य करावे. आता बीएएमएस उमेदवारांची झालेली भरती मला रद्द करता येणार नाही. अन्याय झाला असे वाटत असेलतर उमेदवार न्यायालयात जाऊन योग्य दाद मागू शकतात.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, कर्नाटक स्टेटचे मेडीकल सर्टिफिकेट महाराष्ट्र बोर्डाला दिलेले आहे ते नियमात बसते का. आरोग्यप्रमुखाने त्यावेळेस अट बदलली आहे. तेव्हा सात वर्ष अनुभवाची अट होती ते आज पात्र झालेले नाहीत ज्यांना वगळले गेले त्यांच्या वयाचे आज ४० वर्षे पुर्ण झालेले आहे ते अटिमध्ये बसत नाहीत त्यांची काही चुक नाही त्यांच्याबाबतीत काय करणार आहेत, जे आज आपल्या मनपा सेवेत आहेत.

मा.आयुक्त :- मा.महापौर महोदया, जे कर्नाटक मेडीकलच्या बाबतीतील मुद्दा आहे त्याबाबतीत तो अर्ज संबंधीत उमेदवारांनी केलेला आहे.तो मी पाहिलेला आहे. त्यांनी तत्कालीन आयुक्तांकडे मदत मागीतलेली होती. ८६५ गावचा जीआर जोडलेला आहे. तत्कालीन आयुक्तांनी नंतर प्रमाणपत्र सादर करण्याची परवानगी दिलेली आहे ते नंतर सादर केलेले आहे. कोणा उमेदवारास काही हस्तक्षेप असेलतर ते न्यायालयात जाऊ शकतील, न्यायालय जो निर्णय देईल त्यावर प्रशासन १०० टक्के अंमलबजावणी करेल.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, आपल्या सेवेत असे डॉक्टर असतीलतर वयाची अट शिथिल करता येते.

मा.आयुक्त :- मा.महापौर महोदया, २००९ मध्ये भरती झाली त्यावेळेला एकच रुल अस्तित्वात होता. बीएएमएस पदवी उत्तीर्ण व मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया कडील रजिस्ट्रेशन, त्यावेळेला वयाची अट नव्हती, त्यावेळेला वयाची अट टाकली ती चुकिची होती त्यावेळेस संबंधीत उमेदवारांनी निदर्शनास आणुन द्यायला पाहिजे होते. त्याविरुध्द न्यायालयात सुध्दा दाद मागता येऊ शकते. त्यावेळेला संबंधीत उमेदवारानी दाद मागीतली असतीतर ती दुरुस्ती झाली असती. या उमेदवारांना अट शिथिल करता येणार नाही. बीएएमएस आणि आयुर्वेदिक कॉलेजचे रजिष्ट्रेशन ही अट आहे.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, विधी समितीने ठराव केलेला आहे त्याच्यामध्ये वयाची अट शिथिल करणार म्हणून आहे. मनपाच्या सेवेत असतीलतर एकच नियम लावावा.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, महापालिकेची भरतीची जाहिरात निघते त्यात अट असते, महापालिका सेवेमध्ये असलेले कर्मचारी ती अर्हता धारण करीत असतीलतर वेतनश्रेणीतील नेमणूकीला सेवेची अट राहणार नाही. त्यांना अर्ज करता येतो त्यावेळेला ३३/३८ वयाची अट लागू होत नाही.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, तेव्हा आरोग्य प्रमुखाने सात वर्षाचा अनुभवाची अट घातली म्हणून त्यांचे नुकसान झाले, त्यांना पुन्हा सेवेमध्ये घ्यावे नसता न्यायालयात जाऊन दाद मागणार.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, आपल्याकडे सीपीएस डिप्लोमा चालवितात त्यास परमिशन घेतले आहे का. पठाणताईनी आता मुद्या मांडला त्याप्रमाणे त्याठिकाणी एमबीबीएस डॉक्टर कधी गेले होते. त्याठिकाणी एमबीबीएस डॉक्टर नसतात बीएएमएस डॉक्टर काम करतात. हॉस्पिटल मधील बीव्हीजी संस्थेच्या कोर्समुळे तेथील पेशंट सांभाळले जातात. रोजची ओपीडी दिड ते दोन हजार असते आणि ७०० ते ८०० ॲडमिट पेशंट असतात. आपल्याला जागा नसते त्यामुळे या हॉस्पिटलच्या बाबतीत कुठलाही निर्णय घेताना व्यवस्थीत घ्यावा. प्रॅक्टीकली काय शक्य आहे हे बघणे आवश्यक आहे. परंतु त्या संस्थेमुळे आपल्या नागरीकांना मदत होत असेलतर चांगले आहे. तरी याचा विचार करावा. कोर्टात जाऊन न्यायालय जो निर्णय देईल त्याप्रमाणे करता येईल असे सांगीतले आहे ते योग्य आहे.

मा.आयुक्त :- मा.महापौर महोदया, मी मुद्या नमुद केलेला आहे. वायसीएम हॉस्पिटल हे ॲलोपॅथी हॉस्पिटल आहे. त्याठिकाणी ॲलोपॅथी डॉक्टरांनी ट्रिटमेंट केली पाहिजे. कुठल्याही संस्थेचे कोर्स चालवायचे असतीलतर मेडीकल कौन्सिल ऑफ इंडिया यांचे परमिशन लागते. सीपीएसला महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलची मान्यता आहे. हे डॉक्टर महाराष्ट्र राज्यात प्रॅक्टीस करु शकतात महाराष्ट्र राज्याच्या बाहेर करु शकत नाहीत. जी संस्था आपल्याकडे काम करते, त्यांना वायसीएम मध्ये काम करायचे असेलतर मेडीकल कौन्सिलची परवानगी लागेल. ती नसेलतर हे सर्टिफिकेट कोर्स करता येणार नाहीत. पिंपरी चिंचवड मधील १८ लाख नागरीकांचा विचार करता आपले अतीशय नावाजलेले रुग्णालय आहे. ट्रेनिंग व्यवस्थीत न घेतलेल्या माणसाच्या हातामध्ये तेथील पेशंट गेलेतर आपल्याला त्याचे उत्तर द्यावे लागेल त्यामुळे तज्ञ डॉक्टरांकडून तेथील उपचार मिळाले पाहिजेत. मी १९९० ला एमबीबीएस केलेले आहे मी सुध्दा वायसीएम मध्ये आलेलो आहे. २००७ पर्यंत बीएएमएसचे कोर्सेस वायसीएम मध्ये चालू नव्हते. ॲलोपॅथी डॉक्टरांनी वायसीएम चालविलेले होते, हे डॉक्टर उपलब्ध होत असतीलतर इतर डॉक्टरांकडे वायसीएम दिलेतर ते योग्य होणार नाही.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, उत्तर व्यवस्थीत दिलेले आहे. आतापर्यंत प्रशासनाने भरती प्रक्रिया केलेली त्याबाबत तक्रार नाही. आमचे मित्र विरोधी पक्षनेते यांच्या शंकेचा खुलासा केलेला आहे. एमबीबीएस डॉक्टर गेली कित्येक वर्षे वायसीएम मध्ये आहेत. परिस्थिती अशी आहे की, जुने डॉक्टर चांगल्या पध्दतीने पेशंट हाताळतात. आपल्याकडे काम भरपुर आहे. आपल्याकडे मंजूर पदे नाहीत. मानधनावर डॉक्टर्स काम करतात. हा नर्सेस आणि डॉक्टर्स यांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. ते दहा-बारा वर्षे तेथे काम करतात त्यांचे वय झालेले आहे ते चांगले काम करतात. ते मानधनावर असलेतरी कायम त्यांना नाईट शिफ्टमध्ये काम करावे लागते. आपण आरआर (R.R.) करतो त्यामध्ये अशा लोकांचा समावेश करावा. अशा लोकांच्या वयामध्ये सुट मिळून त्यांना न्याय देणेत यावा. नर्सेसमध्ये विशेष बाब म्हणून हे करावे. जीबीची मान्यता घेवून हे करावे. दोनवेळा जो बदल झालेला आहे ते एमओएचने

केलेले नाही तर त्याला सभागृहाने मान्यता दिलेली आहे. माजी पदाधिका-यांच्या मुलाला त्याठिकाणी घ्यायचे हाते म्हणून ठराव केलेला होता व नियमात बदल केलेला होता.

मा.महापौर :- प्रश्नोत्तराचा कालावधी समाप्त करणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, १५ डिसेंबर २०११ रोजी बेळगाव महानगरपालिका कर्नाटक सरकारने बेकायदेशीरपणे बरखास्त केली. कर्नाटक राज्य स्थापनेचा १ नोव्हेंबर हा दिवस बेळगाव आणि संपूर्ण सीमाभागात काळा दिन म्हणून पाळला जातो. मराठी बहुभाषिक भाग अन्यायाने कर्नाटकात डांबला गेल्याचा निषेध करण्यासाठी हा काळा दिन पाळला जातो. त्यात सर्व मराठी नगरसेवक सहभागी होतात. त्याचप्रमाणे मराठी महापौर, उपमहापौर व सर्व नगरसेवक त्यात सहभागी झाले. याचा बदला घेण्यासाठी महानगरपालिका बरखास्त केली गेली. दुसरे कारण असे झाले की, कन्नड साहित्यिक डॉ.चंद्रशेखर कंबार यांना ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले. ते मिळाल्यावर सत्काराला उत्तर देताना डॉ. कंबार म्हणाले की, सर्व भाषिकांना (मराठीसह) कन्नड भाषा हे शिक्षणाचे माध्यम सक्तीचे करावे आणि ज्यांना कन्नड शिकायचे नसेल त्यानी कर्नाटकातून चालते व्हावे अशा भाषाद्वेष्टया व्यक्तीचे अभिनंदन का करावे असा प्रश्न महानगरपालिकेत उपस्थित झाला. डॉ. कंबार यांच्या साहित्यिक योगदानाबद्यल अभिनंदनाचा ठराव करण्याची मराठी नगरसेवकांची तयारी होती. पण त्यांच्या वरील वक्तव्यासाठी त्यांचा निषेध करावा लागला. या कारणावरुन कर्नाटक सरकारने बेळगाव महानगरपालिका बरखास्त केली. पण ही कारणे देता येत नाहीत. म्हणून काही प्रशासकीय थातूर मातूर कारणे देऊन बरखास्तीचा बडगा उचलला. मराठी नगरसेवकांनी या बरखास्तीला न्यायालयात आव्हान दिले. कर्नाटक उच्च न्यायालयाच्या धारवाड खंडपीठाने ही बरखास्ती बेकायदेशीर ठरविली. पण सरकारने नगरसेवकांचे म्हणणे ऐकून घ्यावे. असा आदेश दिला. सर्वच्या सर्व ५८ नगरसेवकांनी बरखास्ती विरोधात मत मांडले. पण तरीही नगरसेवकांचे म्हणणे ऐकून घेतल्याचा फार्स करुन कर्नाटक सरकारने अन्यायाची पुनरावृत्ती केली आहे. न्यायालयाचा आदेश न मानणे आणि हेकेखोरपणे आपलेच घोडे पुढे दामटणे हा कर्नाटक सरकारचा स्थायीभाव झाला आहे. कर्नाटक तामिळनाडू कृष्णा पाणी वाटप प्रकरणात न्यायालयाचा निकाल विरुध्द जाऊनही तामिळनाडूला पाणी देण्यास कर्नाटक सरकार तयार नाही. त्याचप्रमाणे कर्नाटक गोवा यांच्यातील म्हादई नदीवर धरण बांधून पाणी अडविण्यास न्यायालयाने मनाई केली असतानाही कर्नाटक सरकारने दडपून बांधकाम सुरुच ठेवले आहे. वादग्रस्त मराठी सीमाभागात तर गेली ५६ वर्षे दडपशाही, मराठीचे खच्चीकरण, मराठी लोकांना सापत्न वागणूक, अन्याय, दंडुकेशाही चालू आहे. रोजच्या रोज येथे लोकशाही पायदळी तुडविली जाते. अशा त-हेचे लोकशाही विरोधी राज्य सरकार जे भ्रष्टाचारात आखंड बुडाले आहे ते बरखास्त का करु नये, अशी आमची केंद्र सरकार पुढे मागणी आहे. एवढेच नव्हे तर अशा अन्यायी, लोकशाही तुडवणा-या राज्य शासनाचे अनुदानही केंद्र सरकारने बंद करावे, अशी आमची मागणी आहे तरी या बाबतीत आपण पुढाकार घेऊन केंद्र सरकारपुढे हे लोकशाहीचे गा-हाणे मांडावे ही विनंती व कर्नाटक शासनाचा जाहिर निषेध करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर सूचनेस अनुमोदन देते.

मा.महापौर :- बेळगांव महापालिका दोन वेळा बरखास्त केल्यामुळे कर्नाटक सरकारचा सभागृहात जाहिर निषेध करणेत येत आहे.

मा.शमीम पठाण:- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :- १
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचा दि.२८/४/२०११चा प्रस्ताव
२) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १४१००दि.३/५/२०११
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४ दि.२०/३/२०१२ अन्वये

आळंदी हे तीर्थक्षेत्र असल्याने वर्षातून दोनदा मोठ्या यात्रा भरतात. तसेच इतर दिवशी सुध्दा भाविकांची गर्दी असते. आळंदी नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती अतिशय नाजुक असलेने पिं.चिं.म.न.पा. हद्दीत ज्या दराने पाणीपुरवठा केला जातो त्या दराने पाणी देणेबाबत त्यांनी विनंती केलेली आहे. त्यानुसार आळंदी न.पा.स दररोज ५.० लक्ष लि. पिंचिंमनपा हद्दीतील दराप्रमाणे म्हणजेच र.रू.२=५० प्रति हजारी इतका पाणीपुरवठा उपलब्ध साठ्यातून करता येईल त्यासाठी आळंदी न.पा.हद्दीत मनपाच्या जलवाहिनीवर ज्या ठिकाणी आषाढी व कार्तिकी यात्रेसाठी १५० मि.मी.चा नळजोड दिला जातो त्याच ठिकाणाहून सदर पाणीपुरवठा जलमापक बसवून करता येणे शक्य आहे सदर पाणीपुरवठा पिं.चिं.म.न.पा.हद्दी बाहेर करावयाचा असल्याने त्यास तसेच सदर र.रू.२=५० प्रति हजारी दरास मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, विषय क्र.१ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सुचना मी मांडतो.

मा.सुरेश म्हेत्रे :- मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :-५९ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचा दि.२८/४/२०११चा प्रस्ताव
२) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १४१००दि.३/५/२०११
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४ दि.२०/३/२०१२ अन्वये

विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-६८ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.शमीम पठाण:- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :- २

दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भूजि/सर्व्हे-१/कावि/११९/२०१२दि.३०/४/१२
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.४६८ दि. ८/५/२०१२

मनपाचे JNNURM अंतर्गत BSUP प्रकल्पासाठी विद्युत स्वीचिंग स्टेशन उभारणेकरीता EWS project चिखली से.क्र.१७ व १९ मधील ५००० चौ.फुट जागा म.रा.वि.वितरण कंपनी यांना विनामोबदला हस्तांतरीत करणेस व त्यापोटीचे मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क मनपाने भरण्यास व त्यास येणाऱ्या खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

मा.सुमन नेटके :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, या विषयाच्या अनुषंगाने प्रशासनाकडून माहिती हवी आहे. या प्रकल्पावर विद्युत विभागाकडून किती खर्च केलेला आहे. EWSच्या निविदा काढल्या, त्यावेळी विद्युत विभागाच्या खर्चाबाबत माहिती हवी आहे. घरकुल योजनेसंदर्भात ५ कि.मी. ची भूमिगत केबल टाकण्याचा विषय कधी झाला. प्रशासनाने विषय कधी मांडला याचे उत्तर पाहिजे आहे.

मा.कपिले (कार्य.अभियंता) :- मा.महापौर साहेब, मूळ टेंडरमध्ये हा विषय नव्हता. विद्युतसाठी २३ निविदा काढण्यात आल्या आहेत. उच्च दाबाच्या केबलच्या २ निविदा काढण्यात आल्या होत्या.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, या घरकूल योजनेची ५ कि.मी. केबल आणण्यासाठी मनपाकडून कोणती कार्यवाही चालू आहे का. महासभेकडून मंजूर झालेले आहे का. प्रशासनाकडून असा विषय ठेवलेला आहे का.

मा.कपिले (कार्य.अभियंता) :- मा.महापौर साहेब, टोटल ६ कोटींची केबल टाकण्याचे सँक्शन केलेले आहे. टेल्कोमधून १२ KVA लोडचे ३ सप्लाय आहेत. या योजनेमध्ये

२,००० घरांना वीजपुरवठा लागणार आहे. तूर्त १ केबल टाकून घेणार आहोत. त्यासाठी मंजूरी घेणार आहोत. पूर्ण प्रोजेक्टला ५२ कोटींची मंजूरी आहे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, हा ट्रान्सफॉर्मर उभा करण्यासाठी विनामोबदला जागा देतोय. MSEB आपल्याकडून पैसे भरुन घेत होते. एकीकडे मनपा क्षेत्रात अंडरग्राऊंड केबलचे काम केले ही जबाबदारी महापालिकेची नव्हती. आपली जबाबदारी नसताना मनपाच्या वतीने २५० कोटी खर्च केले. एकीकडे पैसे मिळणार हे माहित होते ते मिळाले नाही. दुसरीकडे ट्रान्सफॉर्मर उभारण्यासाठी जागा देतो. जागांच्या किंमती बाजारभाव किती आहे त्याप्रमाणे पैसे उभारतो, पैसे स्वत: टाकतो. खर्च करायचा का या संस्थेला देखील ही जागा देत असताना काही प्रमाणात पैसे वाचतील. जवळपास ५ कि.मी. केबल आणायची. ४.५ कोटी रुपये मनपाला भरावे लागले. आपण त्यांना विनामोबदला ५,००० चौ.फूट जागा देतोय. दानशूरता किती दाखवायची हे पाहिले पाहीजे. या दृष्टीकोनातून विचार करा.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, आत्ता ट्रान्सफॉर्मरचा विषय आलेला आहे. सेक्टर २२ मध्ये पुनर्वसनाचा प्रकल्प राबवित आहोत. त्या भागातील नागरिकांना लाईटची सोय व्हावी, अडचणी सोडवाव्यात म्हणून आपण सुद्धा त्या परिसरात कार्यरत झालेलो आहे. केबल लाईन टाकली आहे. अधिकाऱ्यांनी सगळी कामे बंद केलेली आहेत. सेक्टर २२मध्ये कामे चालू आहेत. काम बंद पडले आहे. लोकांचे पुनर्वसन केलेले आहे. लोकांना सुविधा देणे क्रमप्राप्त आहे. मध्यंतरी काही सदस्य, खासदार गजानन बाबर, सिमाताई सावळे यांनी कोर्टात जाऊन या कामासंदर्भात बरेचसे विषय उपस्थित केले. ते या प्रकल्पाची चौकशी करत होते. प्रत्येक ठिकाणी रेडझोनचा विषय आला. सदस्य कोर्टात गेले असताना परिसरातील गोरगरीबांना घरे मिळत आहेत. मनपाचे धोरण चांगले आहे. केंद्र सरकारने पैसे दिले. राज्य सरकार ३०% रक्कम देत आहे. सर्व नगरसेवक, सर्व खासदार, अधिकारी सर्वांच्या प्रयत्नांतून पैसे आले. पुनर्वसनाचा प्रकल्प चालू असताना विरोध करण्याच्या हेतूने खासदार गजानन बाबर यांनी कोर्टाकडून स्टे आणला. त्या लोकांना हद्द कळवा म्हणून सांगितले. त्या हद्दीत देहूरोड पर्यंत त्या भागात शाळा आहे,सिद्धिविनायकाचे मंदीर आहे, कॅनबे आय.टी. कंपनी आहे, एम.आय.डी.सी. असताना झोपडपट्टी पुनर्वसनाची १०० एकर जागा घेतली. मनपाने पुनर्वसन करावे म्हणून ओटे बांधले गेले त्यावेळी आत्ताचे खासदार हे मनपामध्ये नगरसदस्य होते, आमदारदेखील झाले. नगरसेवक असताना त्यांनी त्यावेळी हा विषय का मांडला नाही. ब्ल्यू लाईन, रेड लाईन संदर्भात श्रीरंग बारणे यांनी प्रश्न उपस्थित केला. त्यावेळी त्याठिकाणी त्यांना कळाले का नाही. प्रोजेक्ट कशाला करायचा. गावाच्या बाहेर झोपडपट्टी विकसित करण्यात आली. गुण्यागोविंदाने संसार करत आहेत. हेच लोक यांची मते मागण्यासाठी इथे येतात त्यावेळी त्यांना कळत नाही हे रेड झोनमध्ये येते. त्यावेळी विरोध का केला नाही. मग म्हणाले नाही आम्हाला कळकळ आहे. मी त्या भागातील रहिवासी आहे. काम थांबले आहे. पावसाळ्यात झोपडपट्टीतील रहिवाश्यांची घरे गळत आहेत. स्पाईन रोडवर बिल्डींग बांधून तयार आहेत. ड्रॉ काढला गेला आहे. घरे देण्याचे ठरवले आहे. अचानक रेड झोनचे ॲफीडेव्हीट घेतले. आपल्या भागातील खासदार व सिमा सावळे सदस्य यांच्यामुळे सेक्टर १५, २७ पर्यंत काम बंद झालेले

आहे. विकास थांबला आहे. कर्ज केलेले आहे. ठेकेदाराने काम करण्याचे थांबवले आहे. ठेकेदार म्हणतो, यांच्याकडून होत नसेल तर पैसे परत करा. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना घर मिळणार नसेल ते कुठे जाणार. रुपीनगर, यमुनानगर प्राधिकरण येथे हद्दीपासून आपला सेक्टर येथे रेड झोन विकसित करण्यात आला. निगडीतला सगळा भाग हद्दीपासून आज विकसित होऊ शकत नाही. लोक घाबरले आहेत. घरे रहायला देण्याऐवजी बिल्डींग पाडली. या लोकांच्या बिल्डींग तयार आहेत. कामे चालू आहेत. कधीतरी स्वत:च्या घरात जाऊ अशी त्यांना आशा आहे. गरीबांना घरे मिळण्यासाठी उशीर होतो आहे. खासदार बाबर यांचा मतदारसंघ कुठे, खासदार आढळराव पाटील यांचा शिरुर मतदारसंघ कुठे, त्यांच्यात आपापसांत काही भेदभाव असेल तर आमच्या लोकांचा दोष काय? मा.सिमा सावळे या झोपडपट्टीतल्या लोकांचे निर्मुलन करीत आहेत. आम्ही सुद्धा त्यांच्या अडीअडचणी सोडवण्याचा निश्चित प्रयत्न करतोय. शासन त्यांना सहकार्य करीत आहे. ५०,००० लोक तिथे राहतात. बिल्डींग तयार आहेत. लोकांना तिथे रहावयाचे आहे. अधिकाऱ्यांनी केबल टाकायचे काम बंद केलेले आहे. हॉस्पीटल तयार करण्याचे काम कोणीतरी आकसापोटी थांबवले आहे. त्या भागातील लोकांच्या समस्यांचे नेतृत्व करण्यासाठी लोकांनी मला निवडून दिलेले आहे. आधी आपले घर सांभाळा, नंतर दुसऱ्याच्या घरात बघा. स्वत:चे ठेवा झाकून, दुसऱ्याचे बघा वाकून. आज मी याचा निषेध करतो.

मा.जितेंद्र ननावरे:-मा.महापौर साहेब, मा.तानाजी खाडे यांनी जी सूचना मांडली त्याला अनुमोदन आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत JNNURM/BSUP अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविताना मा.महापालिका ठराव क्र.१४८ दि.६/१०/२००७ नुसार दि.१/१/२००० पर्यंतचे रहिवासी पुरावे ग्राह्य धरणेबाबत पात्रतेकरीता जे निकष ठरविणेत आलेले आहे. सदर निकषाप्रमाणे पिंपरी चिंचवड लिंकरोड पत्राशेड, पुनर्वसन प्रकल्पातील रहिवाश्यांसाठी लागु करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी वाघेरे येथील मिलिंदनगर व विठ्ठलनगर, नेहरुनगर या ठिकाणच्या एस.आर.ए. प्रकल्पासाठी महावितरण कंपनीस स्वीचींग स्टेशनसाठी जागा विनामोबदला देण्याचे प्रस्तावित आहे. तरी पिंपरी वाघेरे, मिलिंदनगर स.नं.१२/१ व २ पैकी ५००० चौ.फु. आणि पिंपरी वाघेरे स.नं.१०० पैकी (विठ्ठलनगर) येथील ५००० चौ.फु. जागा महावितरण कंपनी, पुणे यांना विनामोबदला हस्तांतरित करणेस मान्यता देणेत यावी. मनपाच्या क प्रभागअंतर्गत प्रभाग क्र.३७ मधील एमआयडीसी प्लॉट क्र. टी-२०१ येथे लघुउद्योजक पुनर्वसन प्रकल्पासाठी गाळ्यांचे बांधकाम चालु आहे. सदर गाळे धारकांना वीजपुरवठा करणेसाठी महावितरण कंस २२ केव्ही उपकेंद्र बांधावे लागणार आहे. यासाठी आवश्यक ५,००० चौ.फुट जागा त्याच प्लॉटमधील जागा महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. पुणे, यांस विनामोबदला हस्तांतरीत करणेस मान्यता देणेत यावी.

मा.जितेंद्र ननावरे - उपसुचनेस अनुमोदन आहे.

मा.सिमा सावळे :-मा.महापौर साहेब, मी ज्यावेळी कोर्टाच्या दारात न्याय मागितला, कोर्टाने निर्णय दिला होता. हा निर्णय सिमा सावळे किंवा श्री. बाबर यांनी दिलेला नाही. व्यक्तिश: मी कोर्टात कंटेम्ट ऑफ कोर्ट दाखल करु शकते. हा साधा नियम सगळ्यांना माहित नाही. माझ्या नावाचा उल्लेख करता. २.५ FSI ठेवला आहे. खाडे यांच्यापेक्षा जास्त कालावधीत मी झोपडपट्टीतून निवडून आलेले आहे. झोपडपट्टीच्या पुनर्वसनाकरिता मतदारांकडून मी एकही रुपया मोबदला आजपर्यंत घेतलेला नाही. गरीबांना ७००/- रुपये मानधन होते ते रु.१४००/- करुन घेतले आहे. मी नोटा छापल्या असतील हे बोलताना सदस्यांना लाज वाटत नाही. एखाद्या सदस्याला सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करण्याची परवानगी नाही. या सभागृहासमोर चार दिवसांत कंटेम्ट ऑफ कोर्ट दाखल करणार आहे. तुम्हाला खायला मिळत नाही म्हणून गरीबांच्या नावाखाली खाता. लाज वाटायला पाहीजे. माझे व्यक्तिश: नाव घेऊन बोललेले आहेत. आम्हाला नियम सांगता, आम्हीच नियम पाळायचे कशासाठी. आधीचे आयुक्त शर्मा यांना विनंती करुन दमलो. ज्यावेळी प्रयत्न संपले त्यावेळी हायकोर्टाची दारे वाजवली. सभागृहात छातीठोकपणे सांगते त्यादिवशी भले भले अधिकारी गजाआड होणार. माझ्या नावाचा बोभाटा करुन काही होणार नाही. ४० वर्षे झाली देशावर सत्ता करताय. सदस्यांच्या भाषणातून सगळा खोटारडेपणा चालला आहे. त्यांचा खोटारडेपणा मी न्यायालयात उघड केला आहे. सभागृहात माझ्यावर दबाव आणला जातो, मानहानी होते. ही कृती पुढे आणली, हा विषय आणला नाही. याचा परिणाम पुढे काय होऊ शकतो हे सदस्यांना कळेल. एखाद्या विषयी कोर्टाने संधी दिलेली आहे तुम्हाला काय म्हणायचे आहे. शहाणे आहात, गरीबांचा कळवळा आहे. बांधकाम थांबले आहे, त्यांना घरे मिळाली पाहीजेत. त्यांना माहित नाही काय? १९९५ सालच्या झोपडपट्टीधारकांना घरे द्यायला पाहीजेत. मी पुरावा देऊ शकते. ज्यांचे मतदार यादीत नाव नाही, १९९५ आधीचे रहीवासी आहेत. असे किती लोक याठिकाणी बांग्लादेशातून येऊन इथे राहतात. झाकून ठेवण्यासाठी सिस्टीम पाळतो. दीड-दीड लाख रुपये तिथे घेतात. पात्र करुन घेतले जात नाही. पैसे दिल्याशिवाय हे झोपडपट्टीधारक पात्र होत नाहीत. काय चालले आहे. सगळ्यांनी हायकोर्टात न्याय मागितला. रेडझोनचा विषय कधीतरी होणार. देहूरोडला बॉम्ब/दारुगोळा असताना देशाची सुरक्षेपेक्षा तुमची घरे महत्वाची आहेत का. देशाची सुरक्षितता पहिली. राजन पाटील यांना विचारा काय पळापळ झाली. कोर्टाने प्राधिकरणालासुद्धा, मनपाला सुद्धा काय झापले होते. त्यावेळी माझे ऐकले गेले नाही.  आपण या देशाचे प्रामाणिक नागरिक आहोत. माझ्या देशावर संकट येत असेल तर मी कोर्टाची दारे वाजवू शकते, कोणी अडवायचे कारण नाही. माझ्यावर दबाव आणला जातो. माझी बदनामी करण्यात येते. आरोप केले जातात. अशा व्यक्तव्यांना मी भीक घालणार नाही, त्याचबरोबर कोर्टाच्या सुद्धा निदर्शनास आणून देणार आहे.

मा.श्रीरंग बारणे :-मा.महापौर साहेब, या सभागृहाच्या मर्यादा सर्वांनी पाळल्या पाहीजेत. येथे एवढ्यासाठीच सांगतो, सभागृहात असताना मनपाची शिस्त सर्व सदस्यांनी लक्षात घेतली पाहीजे. हात वर केल्याशिवाय, परवानगी दिल्याशिवाय बोलू नये. दोन सदस्य एकमेकांवर आरोप करतात. याला प्रशासन जबाबदार आहे. हा मुद्दा मी ही स्कीम चालू होताना उपस्थित केला होता. सेक्टर २२ मध्ये हा परिसर  रेडझोनमध्ये येतो. बी.जी.

शिर्के यांना काम देण्यात आले, त्यांनी मनपाला ताबा दिलेला नाही. हा प्रकल्प ठेकेदाराने मनपाला हस्तांतरीत केलेला नाही. त्यांनी मुख्य प्रकल्प थांबवू नये असे सांगितले आहे. विठ्ठलनगरच्या प्रकल्पात क्रिडांगणासाठी रिझर्वेशन दाखवले व झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रकल्प मंजूर केला. ज्यावेळी निविदा प्रसिद्ध झाली, त्यावेळी सगळ्या त्रुटी दाखवल्या. मिलिंदनगरचा प्रकल्प पूर नियंत्रण रेषेत येतो. प्रशासनाने रेटून नेले, त्यामुळे झोपडपट्टीवासियांना अडचणी, हाल सोसावे लागत आहेत. प्रशासनाने चूक मान्य करावी, ते मान्य करत नाहीत. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या नावाखाली घरे मिळतात. चार ठेकेदारांना काम देऊन ४७ ते ५३% जादा दराने निविदा स्विकृत केल्या. मनपाला कोट्यावधी रुपयांचा भूर्दंड सहन करावा लागला. निविदेतील फरक मनपाला घाट्यात घालतो हे सुद्धा पाहिले पाहीजे. सभागृहात सावळे ताईंनी सांगितले की, व्यक्तिशः कायदा तुमचा त्यांचा नाही. अंगावर ओढून घेऊ नये. बोलताना सदस्यांनी भान ठेवून बोलावे. सभागृहात आपण देखील सभाशाखेचे नियम पाळावेत. जेणेकरुन सभागृहात गोंधळाचे वातावरण होणार नाही.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ६० विषय क्रमांक :- २
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भूजि/सर्व्हे-१/कावि/११९/२०१२दि.३०/४/१२
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.४६८ दि. ८/५/२०१२

मनपाचे JNNURM अंतर्गत BSUP प्रकल्पासाठी विद्युत स्वीचिंग स्टेशन उभारणेकरीता EWS project चिखली से.क्र.१७ व १९ मधील ५००० चौ.फुट जागा म.रा.वि.वितरण कंपनी यांना विनामोबदला हस्तांतरीत करणेस व त्यापोटीचे मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क मनपाने भरण्यास व त्यास येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत JNNURM/BSUP अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविताना मा.महापालिका ठराव क्र.१४८ दि.६/१०/२००७ नुसार दि.१/१/२००० पर्यंतचे रहिवासी पुरावे ग्राह्य धरणेबाबत पात्रतेकरीता जे निकष ठरविणेत आलेले आहे. सदर निकषाप्रमाणे पिंपरी चिंचवड लिंकरोड पत्राशेड, पुनर्वसन प्रकल्पातील रहिवाश्यांसाठी लागु करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी वाघेरे येथील मिलिंदनगर व विठ्ठलनगर, नेहरुनगर या ठिकाणच्या एस.आर.ए. प्रकल्पासाठी महावितरण कंपनीस स्वीचींग स्टेशनसाठी जागा विनामोबदला देण्याचे प्रस्तावित आहे. तरी पिंपरी वाघेरे, मिलिंदनगर स.नं.१२/१ व २ पैकी ५००० चौ.फु. आणि पिंपरी वाघेरे स.नं.१०० पैकी (विठ्ठलनगर) येथील ५००० चौ.फु. जागा महावितरण कंपनी, पुणे यांना विनामोबदला हस्तांतरित करणेस मान्यता देणेत येत आहे. मनपाच्या क प्रभागअंतर्गत प्रभाग क्र.३७ मधील एमआयडीसी प्लॉट क्र. टी-२०१ येथे लघुउद्योजक पुनर्वसन प्रकल्पासाठी गाळ्यांचे बांधकाम चालु आहे. सदर गाळे धारकांना वीजपुरवठा करणेसाठी महावितरण कंस २२ केव्ही उपकेंद्र बांधावे लागणार आहे. यासाठी आवश्यक ५,०००

चौ.फुट जागा त्याच प्लॉटमधील जागा महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. पुणे, यांस विनामोबदला हस्तांतरीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-६८ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व उपसूचनेप्रमाणेचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, किती मुद्रांक शुल्क भरतोय ते सांगा. आम्ही जागेच्या वतीने शंभर रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर सिलडीड करतोय.

मा.कपिले (कार्य.अभियंता) :- मा.महापौर साहेब, २९ वर्षांचा करार करुन र.रु.१३,६५०/- भरतोय. सिलडीड करतोय.

----

मा.शुभांगी बोऱ्हाडे :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक :- ६१ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.५१४ दि १५/५/२०१२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाअंतर्गत येणारे दवाखाने/ रुग्णालये व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथील भंगार साहित्य व हायपोसोल्युशन विक्रीकरीता मे गॅब ॲडव्हरटायझींग संत तुकाराम नगर यांना या पुर्वीच्या मंजुर निविदा दराने थेट पध्दतीने सदरच्या कामाची मुदत संपल्या तारखेनंतर पुढील ३ वर्षाकरीता मुदत वाढ देण्यास व त्याकामी करारनामा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.विमल जगताप :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, वाय.सी.एम. रुग्णालयातील भंगार साहित्य घेण्यासंदर्भात विषय आहे. आपण निविदा मागितली तर काय फरक पडणार आहे. जवळपास १० वर्षे आपण यांना काम देतोय. निविदा काढण्यास काय हरकत आहे. २००६ पासून तेच दर आहेत, वाढवले नाहीत. अशा परिस्थीतीत निविदा मागवून काम करावे अशी विनंती आहे. रेटमध्ये इतका फरक असताना सुद्धा निविदा का काढत नाहीत हा मोठा प्रश्न आहे. भंगारवाला कुठेतरी असतो, त्याला त्यांची निविदा पद्धत ठाऊक नसते. १०-११ वर्षांमध्ये ३२ टन २२५ इतका पेपर, ३५ टन भंगार विकले गेले आहे. हायपोसोल्युशन २७ लिटर विकले गेले आहे. ही संस्था हायपोसोल्युशन रु.४२/-

दराने घेते. बाजारात त्याची किंमत रु.८२/- आहे. टोटल फरक आहे. एवढ्या कमी दराने का देताय. मनपाचे उत्पन्न वाढले आहे. गेली ९ वर्षे बिनाबोभाट काम देतोय. याठिकाणी पूर्णपणे दिवसाढवळ्या लूट होते आहे. आपण या विषयी निविदा काढाव्यात तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवावा.

मा.अनंत कोऱ्हाळे :- मा.महापौर साहेब, निविदा काढायला विरोध आहे तरी निविदा काढल्या पाहीजेत. थेट पद्धतीने काम देण्याचे कारण नाही. मनपाचा भरपूर फायदा होईल अशी अपेक्षा वाटते. हा विषय फेटाळण्यात यावा.
मा.मंगला कदम :- मा.महापौर साहेब, हा विषय मंजूर करावा अशी विनंती आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-६८ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.विनय गायकवाड :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ४
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.५२५ दि १५/५/२०१२

स्काय ब्ल्यू मल्टीमिडीया स्त्री शिक्षणाच्या जनक सावित्रिबाई फुले चित्रपट निर्मितीसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे अनुदान मिळणेकामी अर्ज केला आहे. तरी त्यास मनपातर्फे र.रु.दहा लाख अनुदान मंजूर करणेस मान्यता देणेत (३० लाखाचे मर्यादे व्यतिरिक्त शासन मान्यतेच्या अटीवर) येत आहे.

मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देतो.

मा.शमिम पठाण :- मा.महापौर साहेब, विषय क्र.४ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सुचना मी मांडते.

मा.शुभांगी बोऱ्हाडे :- मा.महापौर, सुचनेस अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ६२ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.५२५ दि १५/५/२०१२

विषय क्रमांक ४ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-६८ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सूचनेप्रमाणेचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ६३ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.आरती चोंधे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव..
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.५५३ दि २२/५/२०१२

श्री.विशाल जगन्नाथ कुंभार यांस संत तुकाराम व्यापारी संकुल C-१० हा गाळा १५ वर्षे कालावधीसाठी द.म.र.रु.१५,०००/- दराने व योग्य त्या अटी शर्तीनुसार भाडयाने देण्यास व त्याकामी करारनामा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाक्णेत आला असता -

अनुकूल-६८ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.आशा सूर्यवंशी :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक :- ६४ विषय क्रमांक :-६
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.आरती चोंधे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव..
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.५५५ दि २२/५/२०१२

मोशी जकात नाका येथील नारायण रामभाऊ बोराटे यांची मोशी जकात नाका इमारत द.म.र.रु. दहा हजार भाडयाने ५ वर्षे कालावधीकरीता भाडयाने घेण्यास व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.झामाबाई बारणे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

मा.मंगला कदम :- मा.महापौर साहेब, या विषयाचा खुलासा करावा.

मा.मुंढे :- (सहा.आयुक्त,जकात) हा सदस्य ठराव आहे. याबाबतीत इमारतीच्या मालकांनी भाडे वाढवून देण्यासाठी अर्ज केला होता. त्याअनुषंगाने हा अर्ज उपसंचालक, नगररचना यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. उपसंचालक नगररचना यांच्याकडून पत्र आल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-६८ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.शमीम पठाण:- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :-७

दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/ड-२/१४५/२०१२दि.२९/५/१२

२) मा.स्थायी समिती ठ.क्र.५६७ दि २९/५/२०१२

प्रस्तावात नमुद प्रमाणे संरक्षण विभागास एकुण र.रु.६०.५२६४ कोटी अदा करणे आवश्यक आहे. नगररचना विभागाच्या सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकातील ३७.०० कोटी तरतुदींपैकी तरतुद र.रु.३६,९९,२८,०००/- सद्यस्थितीत शिल्लक आहे. संरक्षण विभागास अदा करावयाची रक्कम व नगररचना विभागाच्या इतर भुसंपादन प्रकरणांसाठी र.रु.५.०० कोटी रक्कमेची तरतुद वर्ग करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार नगररचना विभागाच्या भुसंपादन या लेखाशिर्षावर वाढीव र.रु.२९.०० कोटी वर्ग करणे आवश्यक आहे. सदरची वाढीव तरतुद र.रु.२९.०० कोटी सन २०१२-२०१३ चे अंदाजपत्रकातील विकासनिधीतील पाणी पुरवठा टप्पा क्र.१ साठी (मुख्य अंदाजपत्रक पुस्तक १ पान क्र.१९१ वरील) करण्यात आलेल्या र.रु.१००.०० कोटी मधुन वर्ग करण्यात आल्यावर या लेखाशिर्षावर एकुण रक्कम रु.६६.०० कोटी येईल. वरीलप्रमाणे नगररचना विभागाच्या भूसंपादन निधी या लेखाशिर्षावर वाढीव तरतुद वर्ग करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

पिंपळे निलख येथील रस्त्याच्या जागाही संरक्षण विभागाकडुन ताब्यात घेणे गरजेचे आहे. रक्षक सोसायटी ते पिंपळे निलख रस्त्यासाठी र.रु.१५.२० कोटी व वाय जंक्शन ते विशालनगर रस्त्यासाठी र.रु.७.५० कोटी असे एकुण र.रु.२२.७० कोटी र.रु.१००.०० कोटी मधुन वर्ग केल्यावर या लेखाशिर्षावर एकुण र.रु.८८.७० कोटी येईल. वरीलप्रमाणे नगररचना विभागाच्या भूसंपादन निधी या लेखाशिर्षावर वाढीव तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

मा.विलास नांदगुडे :- मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

मा.शमीम पठाण :- उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ६५ विषय क्रमांक :-७
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/ड-२/१४५/२०१२दि.२९/५/१२
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.५६७ दि २९/५/२०१२

प्रस्तावात नमुद प्रमाणे संरक्षण विभागास एकुण र.रु.६०.५२६४ कोटी अदा करणे आवश्यक आहे. नगररचना विभागाच्या सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकातील ३७.०० कोटी तरतुदींपैकी तरतुद र.रु.३६,९९,२८,०००/- सद्यस्थितीत शिल्लक आहे. संरक्षण विभागास अदा करावयाची रक्कम व नगररचना विभागाच्या इतर भुसंपादन प्रकरणांसाठी र.रु.५.०० कोटी रक्कमेची तरतुद वर्ग करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार नगररचना विभागाच्या भुसंपादन या लेखाशिर्षावर वाढीव र.रु.२९.०० कोटी वर्ग करणे आवश्यक आहे. सदरची वाढीव तरतुद र.रु.२९.०० कोटी सन २०१२-२०१३ चे अंदाजपत्रकातील विकासनिधीतील पाणी पुरवठा टप्पा क्र.१ साठी (मुख्य अंदाजपत्रक पुस्तक १ पान क्र.१९१ वरील) करण्यात आलेल्या र.रु.१००.०० कोटी मधुन वर्ग करण्यात आल्यावर या लेखाशिर्षावर एकुण रक्कम रु.६६.०० कोटी येईल. वरीलप्रमाणे नगररचना विभागाच्या भूसंपादन निधी या लेखाशिर्षावर वाढीव तरतुद वर्ग करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. पिंपळे निलख येथील रस्त्याच्या जागाही संरक्षण विभागाकडुन ताब्यात घेणे गरजेचे आहे. रक्षक सोसायटी ते पिंपळे निलख रस्त्यासाठी र.रु.१५.२० कोटी व वाय जंक्शन ते विशालनगर रस्त्यासाठी र.रु.७.५० कोटी असे एकुण र.रु.२२.७० कोटी र.रु.१००.०० कोटी मधुन वर्ग केल्यावर या लेखाशिर्षावर एकुण र.रु.८८.७० कोटी येईल. वरीलप्रमाणे नगररचना विभागाच्या भूसंपादन निधी या लेखाशिर्षावर वाढीव तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-६८ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व उपसूचनेप्रमाणेचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :-८
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र. भूजी/सर्व्हे२/कावि/७५६/११, दि.१९/११/११
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.२४ दि.२९/१२/२०११
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.४६ दि.१९/०५/२०१२ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नविन हद्दवाढीच्या भागशः मंजूर विकास योजनेतील मौजे च-होली येथील स.नं.४०८ (जुना ४६४ पै) व ४०९ पै ( ४६५ पै) मधील भागशः मंजूर विकास योजनेतील आ.क्र.२/८३ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी योजना या आरक्षणाखालील महापालिकेच्या ताब्यात आलेले क्षेत्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, पुणे यांचेकडे राजीव आवास योजनेचा पायलट प्रोजेक्ट राबविण्याकामी र.रु.३,२००/- प्रती चौ.मी. दराने हस्तांतरीत करण्यास मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांजकडून करणेत आली असली तरी महापालिकेच्या ताब्यात असलेल्या उपरोक्त क्षेत्राचे मनपाचे इडब्लूएस प्रोजेक्टसाठी प्रयोजन करणेस व कुठल्याही परिस्थिती मध्ये म्हाडा पुणे यांस न देणेस व जोपर्यंत या विषयावर निर्णय मा.सभेमध्ये होत नाही तोपर्यंत कुठलीही कार्यवाही ठ.क्र.१२४६ दि.१४/१२/२०११ प्रमाणे न करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.सुरेश म्हेत्रे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब,या विषयातील जागा इडब्लूएस प्रोजेक्टसाठी राखीव जागा आहे. आपल्यासाठीच राखिव राहिला आहे. आपण प्रोजेक्टसाठी जागा दिलेली आहे. म्हाडाने पात्र धारकांना कळवले आहे, तिथे राजीव निवास प्रोजेक्ट राबवणार नाही. आपण पैसे घेतले असतील परंतू आपल्याला कारण आहे. त्या ठिकाणी कारण राहिले नाही मग आपण त्यांना जागा देऊन काय करणार. घरकुल योजनेला जागा कमी पडत आहे. खाण होती अशा ठिकाणी पैसे परत करुन ही जागा या ठिकाणी EWS च्या लोकांसाठी करावी अशी सूचना करते.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, खालीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

महानगरपालिका नविन हद्दवाढ क्षेत्रातील तळवडे ते चऱ्होली पर्यंत इंद्रायणी नदीलगत मुख्य जलनिःसारण नलिका टाकणेचे काम चालू असुन बहुतांशी काम पुर्ण

करणेत आलेले आहे. यामध्ये मौजे तळवडे व चिखली भागातील मैलापाणी सदर नलिकेमध्ये घेण्यासाठी मौजे चिखली येथे ग.नं.३३८ पैकी येथे संप व पंप हाऊस बांधणे आवश्यक आहे. त्यासाठी विकास योजनेमध्ये आरक्षण नसल्यामुळे मौजे चिखली ग.नं.३३८ पैकी मधील इंद्रायणी नदीलगत २ आर जमिन, तेथील मिळकत धारकांशी खाजगी वाटाघाटीने मनपाने आगाऊ ताब्यात घेण्यात आली आहे. सबब सदर जागा रितसर भूसंपादन प्रक्रियेद्वारे मनपाचे ताब्यात घेऊन मिळकत धारकास जागेचा मोबदला अदा करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.आशा सूर्यवंशी :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

मा.जितेंद्र ननवरे :-मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.मंगला कदम :- मा.महापौर साहेब, म्हाडाकडून ५ कोटी घेण्यात आले ते परत करावेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :-६६ विषय क्रमांक :-८
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र. भूजी/सर्व्हे२/कावि/७५६/११, दि.१९/११/११
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.२४ दि.२९/१२/२०११
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.४६ दि.१९/०५/२०१२ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नविन हद्दवाढीच्या भागशः मंजूर विकास योजनेतील मौजे च-होली येथील स.नं.४०८ (जुना ४६४ पै) व ४०९ पै ( ४६५ पै) मधील भागशः मंजूर विकास योजनेतील आ.क्र.२/८३ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी योजना या आरक्षणाखालील महापालिकेच्या ताब्यात आलेले क्षेत्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, पुणे यांचेकडे राजीव आवास योजनेचा पायलट प्रोजेक्ट राबविण्याकामी र.रु.३,२००/- प्रती चौ.मी. दराने हस्तांतरीत करण्यास मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांजकडून करणेत आली असली तरी महापालिकेच्या ताब्यात असलेल्या उपरोक्त क्षेत्राचे मनपाचे इडब्लूएस प्रोजेक्टसाठी प्रयोजन करणेस व कुठल्याही परिस्थिती मध्ये म्हाडा पुणे यांस न देणेस व जोपर्यंत या विषयावर निर्णय मा.सभेमध्ये होत नाही तोपर्यंत कुठलीही कार्यवाही ठ.क्र.१२४६ दि.१४/१२/२०११ प्रमाणे न करणेस मान्यता देणेत येत आहे. महानगरपालिका नविन हद्दवाढ क्षेत्रातील तळवडे ते चऱ्होली पर्यंत इंद्रायणी नदीलगत मुख्य जलनिःसारण नलिका टाकणेचे काम चालू असुन बहुतांशी काम पुर्ण करणेत आलेले आहे. यामध्ये मौजे तळवडे व चिखली भागातील मैलापाणी सदर नलिकेमध्ये घेण्यासाठी मौजे चिखली येथे ग.नं.३३८ पैकी येथे संप व पंप हाऊस बांधणे आवश्यक आहे. त्यासाठी विकास योजनेमध्ये आरक्षण नसल्यामुळे

मौजे चिखली ग.नं.३३८ पैकी मधील इंद्रायणी नदीलगत २ आर जमिन, तेथील मिळकत धारकांशी खाजगी वाटाघाटीने मनपाने आगाऊ ताब्यात घेण्यात आली आहे. सबब सदर जागा रितसर भूसंपादन प्रक्रियेद्वारे मनपाचे ताब्यात घेऊन मिळकत धारकास जागेचा मोबदला अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-६८ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व उपसूचनेप्रमाणेचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :-९
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.नरवि/कावि/ ड-१ /२६५/२०१२, दि.३०/०४/२०१२
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.११ दि.२/५/२०१२
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.५० दि.१९/०५/२०१२ अन्वये.

मौजे वाकड येथील पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील स.नं.२११ पैकी क्षेत्र जलाशय विभागाऐवजी निवासी विभागात समाविष्ट करणेकामी जाहिर नोटीशीचे अनुषंगाने ३० दिवसाचे विहित मुदतीत इकडील विभागास एकही हरकत प्राप्त झाली नाही. त्यामुळे सदरचे प्रस्तावास म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेकामी मान्यता व प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.शुभांगी बोऱ्हाडे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.राजेंद्र जगताप :- मा.महापौर साहेब, विषय क्र.९चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.सुरेश म्हेत्रे :- मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६७ विषय क्रमांक :-९
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.नरवि/कावि/ ड-

१/२६५/२०१२, दि.३०/०४/२०१२
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.११ दि.२/५/२०१२
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.५० दि.१९/०५/२०१२ अन्वये.

विषय क्रमांक ९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-६८ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सूचनेप्रमाणेचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :-१०

दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. भोसले हनुमंतराव भिमराव यांचा दि.०३/०८/२०११ चा प्रस्ताव -
२) मा. क प्रभाग समिती सभा दि. ०७/०९/२०११ ठ.क्र. ४७
३) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१४ दि.१६/५/२०१२

सिटी सर्व्हे नं.५०३५ जागामालक गुडसे सिटी सर्व्हे नं.५०३६ रियाज जहागीर पिरजादे सिटी सर्व्हे नं.५०३७ रियाज जहागीर पिरजादे, सिटी सर्व्हे नं. ५०३३ मैनुद्दीन पिरजादे या सर्व जागामालकांकडून त्यांना समजून सांगून त्यांच्याकडे सात मीटर रस्त्याकरीता विनंती करुन खडीमुरुमाचा रस्ता केलेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २०५ प्रमाणे झालेल्या रस्त्याला मान्यता देऊन मनपाच्या नियमाप्रमाणेवरील सर्व जागामालकांना टी.डी.आर.चा मोबदला मिळावा तसेच सदरचा रस्ता डी.पी.प्लॅनमध्ये नागरिकाच्या घरावरुन जात असून त्या नागरिकांचे घरे वाचवण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ आधार घेऊन सदरचा रस्ता बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.नितीन लांडगे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.मंगला कदम :- मा.महापौर साहेब, विषय क्र.१० कामी प्रशासनाकडून विषयपत्र येणे अपेक्षित असल्याने प्रशासनाकडून विषयपत्र प्राप्त झालेनंतरचे सभेचेवेळी विषय क्र.१० चा विचार करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

मा.आशा सूर्यवंशी :- मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :-६८ विषय क्रमांक :-१०
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. भोसले हनुमंतराव भिमराव यांचा दि.०३/०८/२०११ चा प्रस्ताव -
२) मा. क प्रभाग समिती सभा दि. ०७/०९/२०११ ठ.क्र. ४७
३) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१४ दि.१६/५/२०१२

विषय क्र.१० कामी प्रशासनाकडून विषयपत्र येणे अपेक्षित असल्याने प्रशासनाकडून विषयपत्र प्राप्त झालेनंतरचे सभेचेवेळी विषय क्र.१० चा विचार करणेत यावा.

अनुकूल-६८ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सूचनेप्रमाणेचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :-११
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. प्रशांत शितोळे मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव-
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१७ दि.१६/५/२०१२

चिंचवड स.नं. १५८ व १६३ येथील जागा एम.आय.डी.सी.चे पाणीपुरवठा पंपींग स्टेशन/जलशुध्दीकरण केंद्र आहे. सदर केंद्राची जागा वगळता उर्वरित जागा मोठया प्रमाणावर शिल्लक आहे. सदर जलशुध्दीकरण केंद्राचे विस्तारिकरण करण्यास वाव दिसून येत नाही. मौजे चिंचवड येथील स.नं. १५८ व १६३ पैकी एम.आय.डी.सी.च्या ताब्यातील जागा म.न.पा.उपयोगासाठी ताब्यात घ्यावी मनपा उपयोग अंतर्गत येणारी आरक्षणे उदा. १) प्रायेगिक व हौशी तसेच बालनाटय रंगभूमीसाठी सांस्कृतीक हॉल, २) महात्मा गांधी विचार धारा प्रस्तारचे दृष्टीने शिल्प व उद्यान, ३) महात्मा गांधी , विनोबा भावे, रविंद्रनाथ टागोर, साने गुरुजी, संत वाड्.मय, शाहू फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विषयी पुस्तक ग्रंथालय.

सबब सदर उर्वरित जागेच्या विकास आराखडयामधील वापरात बदल करुन या जागेवर वरील पैकी कोणतेही असे आरक्षण ठेवून सदर जागा महानगरपालिकेने संपादित करणेस व यासाठी एम.आर.टी. पी. ॲक्ट कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करणेस (तसेच सर्व्हे नं. १९२ मधील आरक्षण शाळा व सर्व्हे नं.१९३ मधील

आरक्षण प्रसुतीगृह व दवाखाना सदरील आरक्षण कायम ठेवावे.) मान्यता देणेत येत आहे.

मा.सुरेश म्हेत्रे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देतो.

मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब, मी खालीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

महात्मा फुलेनगर वॉर्ड क्र.२६ मधील एम.आय.डी.सी.च्या सर्वे नं.T१८९/२ मोकळ्या जागेत मैदान विकसित करण्यासाठी मनपाकडे हस्तांतरीत करणेस मान्यता देणेत यावी. सद्यस्थितीत वॉर्ड क्र.२६ महात्मा फुलेनगर येथे एकही उद्यान नाही. आपल्या मनपाचे एक वॉर्ड एक मैदान असे धोरण असताना सदर वॉर्डात एकही मैदान नाही. सदर भागातील खेळाडुंना क्रिडागुणात वाव मिळावा म्हणून सदर जागा लवकरात लवकर हस्तांतरीत करणेस मान्यता देणेत यावी. वॉर्ड क्र.२६ मधील लांडेवाडी जवळील मोकळी जागा क्र.४४ अ मध्ये अग्निशमन केंद्र साठी आवश्यक ते स्थापत्यविषयक कामे करणे. (निविदा क्र.G 4A/37/04/04/2011-12) अन्वये काम काढण्यात आलेले आहे. परंतु एम.आय.डी.सी.ने भोसरी एम.आय.डी.सी एफ.२ ब्लॉक येथील मोकळी जागा क्र.२२ व २३ मधील ४००० चौ.मी. जागा फायर स्टेशनसाठी दिली आहे. त्यामुळे सदरचे काम (निविदा क्र.G 4A/37/04/04/2011-12) हे मोकळी जागा क्र.२२ व २३ मध्ये करण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेत यावी.

मा.विनय गायकवाड :- मा.महापौर, सदर सूचनेला अनुमोदन देतो.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, विषय क्र.११ मध्ये सर्व्हे नं.१९२ ऐवजी आरक्षण नं.१९२, सर्व्हे नं.१९३ ऐवजी आरक्षण नं.१९३ अशी दुरुस्ती करणेत यावी.

मा.शुभांगी बोऱ्हाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मा.शमीम पठाण,मा.शुभांगी बोऱ्हाडे व मा.जितेंद्र ननवरे, मा.विनय गायकवाड यांच्या उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :-६९ विषय क्रमांक :-११
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. प्रशांत शितोळे मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव-
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१७ दि.१६/५/२०१२

चिंचवड स.नं. १५८ व १६३ येथील जागा एम.आय.डी.सी.चे पाणीपुरवठा पंपींग स्टेशन/जलशुध्दीकरण केंद्र आहे. सदर केंद्राची जागा वगळता उर्वरित जागा मोठया प्रमाणावर शिल्लक आहे. सदर जलशुध्दीकरण केंद्राचे विस्तारिकरण करण्यास वाव

दिसून येत नाही. मौजे चिंचवड येथील स.नं.१५८ व १६३ पैकी एम.आय.डी.सी.च्या ताब्यातील जागा म.न.पा.उपयोगासाठी ताब्यात घ्यावी मनपा उपयोग अंतर्गत येणारी आरक्षणे उदा. १) प्रायेगिक व हौशी तसेच बालनाटय रंगभूमीसाठी सांस्कृतीक हॉल, २) महात्मा गांधी विचार धारा प्रस्तारचे दृष्टीने शिल्प व उद्यान, ३) महात्मा गांधी, विनोबा भावे, रविंद्रनाथ टागोर, साने गुरुजी, संत वाड्.मय, शाहू फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विषयी पुस्तक ग्रंथालय.

सबब सदर उर्वरित जागेच्या विकास आराखडयामधील वापरात बदल करुन या जागेवर वरील पैकी कोणतेही असे आरक्षण ठेवून सदर जागा महानगरपालिकेने संपादित करणेस व यासाठी एम.आर.टी.पी. ॲक्ट कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करणेस (तसेच आरक्षण नं.१९२ मधील आरक्षण शाळा व आरक्षण नं.१९३ मधील आरक्षण प्रसुतीगृह व दवाखाना सदरील आरक्षण कायम ठेवावे.) मान्यता देणेत येत आहे. महात्मा फुलेनगर वॉर्ड क्र.२६ मधील एम.आय.डी.सी.च्या सर्वे नं.T१८९/२ मोकळ्या जागेत मैदान विकसित करण्यासाठी मनपाकडे हस्तांतरीत करणेस मान्यता देणेत येत आहे. सद्यस्थितीत वॉर्ड क्र.२६ महात्मा फुलेनगर येथे एकही उद्यान नाही. आपल्या मनपाचे एक वॉर्ड एक मैदान असे धोरण असताना सदर वॉर्डात एकही मैदान नाही. सदर भागातील खेळाडुंना क्रिडागुणात वाव मिळावा म्हणून सदर जागा लवकरात लवकर हस्तांतरीत करणेस मान्यता देणेत येत आहे. वॉर्ड क्र.२६ मधील लांडेवाडी जवळील मोकळी जागा क्र.४४ अ मध्ये अग्निशमन केंद्र साठी आवश्यक ते स्थापत्यविषयक कामे करणे. (निविदा क्र.G 4A/37/04/04/2011-12) अन्वये काम काढण्यात आलेले आहे. परंतु एम.आय.डी.सी.ने भोसरी एम.आय.डी.सी एफ.२ ब्लॉक येथील मोकळी जागा क्र.२२ व २३ मधील ४००० चौ.मी. जागा फायर स्टेशनसाठी दिली आहे. त्यामुळे सदरचे काम (निविदा क्र.G 4A/37/04/04/2011-12) हे मोकळी जागा क्र.२२ व २३ मध्ये करण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-६८ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व उपसूचनेप्रमाणेचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :-१२

दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१८ दि.१६/५/२०१२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विकास योजनेव्यतिरिक्त कलम २०५ नुसार घोषित केलेल्या सध्या बाधीत मिळकत धारकांना एफ.एस.आय. देणेत येतो. परंतु सदर बाधीत मिळकत धारकांना सदर जागेचा टी.डी.आर. देण्यात यावा. सदर बाधीत जागेचा

फक्त एफ.एस.आय. न देता टी.डी.आर. किंवा एफ.एस.आय. देणेत यावा यास कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.सुरेश म्हेत्रे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.मंगला कदम :- मा.महापौर साहेब, विषय क्र.१२चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

मा.आशा सूर्यवंशी :- मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :-७०	विषय क्रमांक :-१२
दिनांक :- ०९.०७.२०१२	विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१८ दि.१६/५/२०१२

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-६८	प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सूचनेप्रमाणेचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :-१३
दिनांक :- ०९.०७.२०१२	विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१९ दि.१६/५/२०१२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने रस्ता व आरक्षणे ताब्यात घेऊन खाजगी जागामालकांच्या मिळकतीवर विकास कामे केली आहेत. सदर जागांचे रितसर भूसंपादन करण्यात आलेले आहे व अवॉर्ड सुध्दा जाहीर झालेले आहे. परंतु ज्या जागामालकांनी त्याचा मोबदला भूसंपादनाने घेतलेला नाही अशा सर्व बाधीत मिळकतींना टी.डी.आर. किंवा एफ.एस.आय. देणेत यावा. यास कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.मंगला कदम :- मा.महापौर साहेब, विषय क्र. १३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.
मा.आशा सूर्यवंशी :- मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :-७१ विषय क्रमांक :-१३
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१९ दि.१६/५/२०१२

विषय क्र.१३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-६८ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सूचनेप्रमाणेचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-७२ विषय क्रमांक :-१४
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.२० दि.१६/५/२०१२

मौजे पिंपळेनिलख येथे स.नं. २८ मध्ये १२ मीटर रुंद रस्ता विकास योजनेमध्ये मंजूर आहे. सदर रस्ता आरक्षण क्र.३८८ व ३८९ शॉपिंग सेंटर पासून वाकड २४ मी. रुंद रस्त्यापर्यंत आहे. स. नं. २८ मध्ये पिंपळे निलख गावाकडे जाणारा २४ मी. रुंद रस्त्याला मिळणा-या रस्त्याचा चौक आहे. वरील १२ मी. रुंद रस्त्याची आखणी स.नं. २७ व २८ च्या हद्दी लगत परंतु संपूर्ण रस्ता रुंदी स.नं. २८ मधून घेऊन सदरचा रस्ता आरक्षण क्र. ३८८ पासून २४ मी. रस्त्याचे चौकापर्यंत अशी आखणी केल्यास वाकड कडे जाणा-या २४ मी. रुंद रस्त्यास दोन वेगवेगळे जंक्शन न होता सध्या असलेल्या चौकामध्ये येऊन मिळेल व त्यामुळे होणारा वाहतूकीचा अडथळा कमी होईल. कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.झामाबाई बारणे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-६८ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :-१५

दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.२१ दि.१६/५/२०१२

चिंचवड आरक्षण क्र. २७५ प्राथमिक शाळा प्रयोजनार्थ आरक्षित जमीन टी.डी.आर.च्या बदल्यात महापालिकेच्या ताब्यात आलेली आहे. या परिसरात आवश्यकतेपेक्षा जास्त शाळेची आरक्षणे आहेत. सबब या आरक्षणाचे प्रयोजनात बदल करुन सदर जागेचा वापर सांस्कृतिक भवन व उद्यान या प्रयोजनार्थ करणेकामी विकास योजनेत म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ च्या अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस व उक्त जमीन मनपाचे ताब्यात असल्याने शासनाचे उमेद मान्यतेवर सदर जागेचा वापर उक्त प्रयोजनार्थ सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.आशा सूर्यवंशी :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.शुभांगी बोऱ्हाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्र.१५ दप्तरी दाखल करण्यात यावा अशी सूचना मी मांडते.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :-७३ विषय क्रमांक :-१५

दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.२१ दि.१६/५/२०१२

विषय क्रमांक १५ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-६८ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सूचनेप्रमाणेचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :-१६

दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.नारायण बहिरवाडे ,मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव

२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.२३ दि.१६/५/२०१२

मा.महापालिका सभा ठराव क्र.५३५ दि.२०/१०/२००८ नुसार मौजे सांगवी स.नं.१ व २ मधील आरक्षण क्र.३२९ अ मैलाशुध्दीकरण केंद्राबाबत ठराव मंजूर करणेत आला होता.सदर ठरावात मैलाशुध्दीकरण केंद्राबाबत चार पर्याय देणेत आले होते.सदर प्रकल्प दापोडी येथे महानगरपालिकेने जागा ताब्यात घेऊन बांधकाम चालू केलेले आहे त्यामूळे सांगवी येथील आरक्षीत जागेची आवश्यकता राहीलेली नाही. तसेच सदर मैलाशुध्दीकरण केंद्राचे काही जागेवर नागरीकांनी घरे बांधलेली आहेत त्यामूळे सदरचा मा.महापालिका सभा ठराव क्र.५३५ दि. २०/१०/२००८ रद्द करुन त्या ऐवजी सदरचे मैलाशुध्दीकरण केंद्राचे आरक्षण पूर्णपणे रद्द करुन त्याचा समावेश निवासी विभागात करणेची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.सुरेश म्हेत्रे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, खालीलप्रमाणे उपसूचना मांडत आहे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे दापोडी येथील सर्व्हे नंबर ८५ मधील आरक्षण क्रमांक ३/२८, रिटेल मार्केटचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतूदीन्वये भूसंपादन करणेस तसेच दापोडी सर्व्हे नं.८५ वरील आरक्षण क्रमांक ३/२७ फायर स्टेशन करीता दर्शवलेली जमीन संपादनास मान्यता देणेत यावी.

मा.विनय गायकवाड :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.अनंत कोऱ्हाळे :- मा.महापौर साहेब, मैलाशुद्धीकरण केंद्राची जागा निवासी विभागात करणेऐवजी या जागेत सार्वजनिक प्रयोजन असावे. हा ठराव तहकूब करण्यात यावा.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, खरेतर हा सदस्य प्रस्ताव आहे. मैलाशुद्धीकरण प्रकल्प पूर्णपणे पूररेषेत येतो. त्यामुळे तिथे निवासी विभागाचे आरक्षण करणे योग्य होणार नाही. कायदेशीर मान्यता मिळणार नाही. हा विषय फेटाळून लावण्यात यावा.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, सदर उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :-७४ विषय क्रमांक :-१६
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.नारायण बहिरवाडे,मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.२३ दि.१६/५/२०१२

मा.महापालिका सभा ठराव क्र.५३५ दि.२०/१०/२००८ नुसार मौजे सांगवी स.नं.१ व २ मधील आरक्षण क्र.३२९ अ मैलाशुध्दीकरण केंद्राबाबत ठराव मंजूर करणेत आला होता.सदर ठरावात मैलाशुध्दीकरण केंद्राबाबत चार पर्याय देणेत आले होते.सदर प्रकल्प दापोडी येथे महानगरपालिकेने जागा ताब्यात घेऊन बांधकाम चालू केलेले आहे त्यामूळे सांगवी येथील आरक्षीत जागेची आवश्यकता राहीलेली नाही. तसेच सदर मैलाशुध्दीकरण केंद्राचे काही जागेवर नागरीकांनी घरे बांधलेली आहेत त्यामूळे सदरचा मा.महापालिका सभा ठराव क्र.५३५ दि.२०/१०/२००८ रद्द करुन त्या ऐवजी सदरचे मैलाशुध्दीकरण केंद्राचे आरक्षण पूर्णपणे रद्द करुन त्याचा समावेश निवासी विभागात करणेची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे दापोडी येथील सर्व्हे नंबर ८५ मधील आरक्षण क्रमांक ३/२८, रिटेल मार्केटचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतूदीन्वये भूसंपादन करणेस तसेच दापोडी सर्व्हे नं.८५ वरील आरक्षण क्रमांक ३/२७ फायर स्टेशन करीता दर्शवलेली जमीन संपादनास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-६८ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व उपसूचनेप्रमाणेचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक :-७५ विषय क्रमांक :-१७
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

मा.विधी समिती

दि.७/५/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.शुभांगी बोऱ्हाडे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-६८ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक :-७६ विषय क्रमांक :-१८

दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

मा.महिला व बालकल्याण समिती

अ) दि.२५/४/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.९/५/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.शुभांगी बोऱ्हाडे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-६८ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक :-७७ विषय क्रमांक :-१९

दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

मा.शहर सुधारणा समिती

दि.२/५/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.शुभांगी बोऱ्हाडे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-६८ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २०वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक :-७८ विषय क्रमांक :-२०
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

मा.क्रिडा समिती

अ) दि.२/५/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.१६/५/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.शुभांगी बोऱ्हाडे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-६८ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-७९ विषय क्रमांक :-२१
दिनांक :- ०९.०७.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/वाकड/३५१/२०१२
विषय - मौजे वाकड येथील ३० मी. व १८ मी.रुंदरस्त्याकरीता जमिनीचे भूसंपादन करणेबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. टीपीएस-१८०५/१०५०/प्र.क्र.-७९५/०५ नवि-१३, दिनांक ९ जुलै २००८ अन्वये भागशः मंजूर विकास योजना शासनाने मंजूर केलेली आहे. त्याप्रमाणे भागशः मंजूर विकास योजनेतील खालील तक्त्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्त्यांचे भूसंपादन त्वरित करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | रस्तारुंदी | रस्त्याचे नांव | स.नं. | बाधित होणारे एकूण सुमारे क्षेत्र चौ.मी. | मनपाच्या ताब्यात आलेले क्षेत्र चौ.मी. | संपादन करावयाचे एकूण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १८.०० मी. | स.नं.९१ पासून सं.नं. १०८ ताथवडे | १०८,१०९, ११०,११२, ११३,११४, | १४५१०.३७ | १३३६.०० | ११२५६.३७ (गायरान जमीन स.नं. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | हद्दीपर्यंत ३० मी.रुंद रस्त्याला मिळणारा दक्षिणोत्तर रस्ता | ९१ व ९५ | | | १०९ चे क्षेत्र ६१२.०० चौ.मी. सोडून) |
| २. | ३०.०० मी. रुंदरस्त्यापैकी मौजे वाकड हद्दीतील १५.०० मी. रुंदीचा रस्ता | मौजे वाकड-मौजे ताथवडे हद्दीवरील मुंबई-बेंगलोर महामार्ग ते हिंजवडी हद्दीपर्यंत पूर्वपश्चिम रस्ता | १२२,१११, १०९, व १०८ | १९२६४.९३ | ३९७.७५ | १६१२५.६८ (गायरान जमीन सं.नं. १०९ चे क्षेत्र २७४१.५० चौ.मी. सोडून) |

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये तातडीने संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.सुरेश म्हेत्रे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-६८ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

मा.महापौर :- सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/१०४७/१२
दिनांक :- २७/०७/२०१२

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.